ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

वर्ष ४२ | अंक ८ | पाने ७६ | मार्च २०१५ | मूल्य २० रु.



विशेषांक

## भारतीय अर्थसंकल्प २०१५-१६

**बदलते उत्तरदायित्व- महिलांच्या दृष्टिकोनातून अर्थसंकल्प**
नीता एन.

**चौदावा वित्त आयोग : राजकोषीय संघीयवाद**
संजय बाबुराव महाजन

**विशेष लेख**
**चलनवाढ लक्ष्य प्रणाली**
भावना गोखले

**फोकस**
**भारताचे रुपांतर जागतिक उत्पादन केंद्रात करताना...**
अमिताभ कांत

मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | १०.०० रुपये |
| विशेषांक | २०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | १००.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | १८०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | २५०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केन्द्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी.

वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव व पत्ता कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४२ ❖ ❖ अंक ८ ❖ ❖ मार्च २०१५ ❖ ❖ मूल्य २० रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कांचल**

संपादक
**भावना गोखले**

मुखपृष्ठ
**जी.पी. धोपे**


**'योजना' हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.**

**योजना वर्गणीचे नवे दर**

| | | |
|---|---|---|
| **वार्षिक** | : | रू. १०० |
| **किरकोळ किंमत** | : | रू. १० |
| **शेजारी राष्ट्रे (एअरमेल) वार्षिक** | : | रू. ५३० |
| **युरोप व अन्य राष्ट्रे (एअरमेल) वार्षिक** | : | रू. ७३० |

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| **अर्थसंकल्प २०१५-१६ : विकासाभिमुख आणि सर्वसमावेशक** | - डॉ. नितिन ज्ञानदेव चौधरी | ५ |
| **अंदाजपत्रक: संकल्पना आणि अन्वयार्थ** | - प्रा. शिवकुमार ल. बिरादार | १० |
| **भारताचे रुपांतर जागतिक उत्पादन केंद्रात करताना...(फोकस लेख)** | - अमिताभ कांत | १७ |
| **चलनवाढ लक्ष्य प्रणाली (विशेष लेख)** | - भावना गोखले | २४ |
| **दृष्टीक्षेपात अर्थसंकल्प** | | ३२ |
| **प्रगतीच्या दिशेने मार्गक्रमण करणारा रेल्वे अर्थसंकल्प** | - जी. श्रीनिवासन | ३४ |
| **बदलते उत्तदायित्व- महिलांच्या दृष्टिकोनातून अर्थसंकल्प** | - नीता एन. | ३९ |
| **दृष्टीक्षेपात आर्थिक सर्वेक्षण** | | ४६ |
| **चौदावा वित्त आयोग : राजकोषीय संघीयवाद** | - संजय बाबुराव महाजन | ४८ |
| **गुंतवणुकीला चालना देणारा अर्थसंकल्प** | - अरविंद जोशी | ५८ |
| **तेलाच्या आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत किंमत निश्चितीच्या प्रेरकशक्ती** | - हिरण्मय रॉय, अनिल कुमार, विजय शेखावत | ६२ |
| **दृष्टीक्षेपात रेल्वे अर्थसंकल्प** | | ६६ |
| **कृषीप्रधान भारतात स्वतंत्र कृषी अर्थसंकल्पाची गरज** | - डॉ.दीपक भुसारे | ६९ |



योजनेसाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

# संपादकीय

नव्या केंद्र सरकारचा बहुप्रतीक्षित पहिलाच संपूर्ण सर्वसाधारण अर्थसंकल्प अखेर संसदेत सादर झाला. या अर्थसंकल्पाविषयी अनेकांनी अंदाज ,अपेक्षा व्यक्त केल्या होत्या. मात्र,अपेक्षित लोकप्रिय घोषणा टाळून गुंतवणूक आणि विकासाला पोषक अशा छोट्या मात्र प्रभावी तरतुदी आणि प्रस्ताव या अर्थसंकल्पात मांडले गेले आहेत. दीर्घकाळासाठीचा शाश्वत विकास आणि सकल राष्ट्रीय उत्पादनाचा ८ टक्के विकासदर असे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी काही मूलभूत मुद्यांचा विचार या अर्थसंकल्पात केलेला जाणवतो. भारताला जगातली सर्वाधिक वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था बनविण्याच्या दृष्टीने यात काही प्रस्ताव मांडण्यात आले आहेत.

सरकारच्या सर्वसामावेशक विकासाच्या दृष्टीकोनाशी सुसंगत असलेल्या या अर्थसंकल्पात देशाच्या विकासातील जनतेचे योगदान लक्षात घेतले आहे. जनतेला आर्थिकदृष्ट्या सक्षम करत त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी यात अनेक तरतुदी आहेत .जनतेला एका बाजूला त्यांचा रोजगार आणि गुंतवणुकीच्या संधी देत जीवनस्तर वाढवण्याची संधी तर दुसऱ्या बाजूला त्यांच्यासाठी सुरक्षित सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पात जाणवतो.

नव्या निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत कर सवलतीची मर्यादा दीड लाख रुपयांपर्यंत वाढवणे, आरोग्यविमा योजनेच्या हप्त्यावरील करसवलत २५००० रुपयांपर्यंत वाढवणे, किरकोळ रकमेचे हप्ते असलेली आणि मृत्युपश्चात कुटुंबाला दोन लाख रुपयाचे विमाकवच देणाऱ्या प्रधानमंत्री बिमा सुरक्षा योजना आणि प्रधानमंत्री जीवन ज्योती बिमा योजना या योजनांची घोषणा अशा तरतुदी, जनतेच्या सामाजिक सुरक्षिततेला दिलेले महत्व अधोरेखित करतात. महिला सुरक्षा, जागृतीसाठी सुरु असलेल्या कार्यक्रमासाठी २०१५-१६ या वर्षात निर्भया निधीत १००० कोटी रुपयांची भर घालण्यात आली आहे.

देशातील युवाशक्तीमध्ये असलेल्या प्रचंड कौशल्याला वाव देण्यासाठी आणि त्यांच्या रोजगारात वाढ करण्यासाठी , या अर्थसंकल्पात अनेक उपक्रमांचा प्रस्ताव आहे . देशाच्या विविध भागात शिक्षणसंस्था, मग त्यात प्रत्येक पाच किलोमीटर अंतरावर एक उच्च माध्यमिक शाळा, उच्च तंत्रशिक्षण आणि कौशल्य विकास संस्था यांचा समावेश आहे . अल्पसंख्य युवकांचे एकात्मिक शिक्षण आणि रोजगारासाठी '' नई मंझिल'' ही योजना तर अनुसूचित जाती-जमातीच्या युवकांना सूक्ष्म व लघु उद्योगांसाठी प्राधान्याने वित्तपुरवठा करण्यासाठी सूक्ष्म उद्योग विकास पुनर्वित्तपुरवठा संस्था म्हणजेच मुद्रा बँकेची घोषणा या अर्थसंकल्पात आहे. स्वयंरोजगार आणि कौशल्य उपयुक्तता कार्यक्रम (सेतू) च्या माध्यमातून नव्याने सुरु करण्यात आलेले व्यवसाय , स्वयंरोजगार, विशेषत: तंत्रकुशल क्षेत्रातील व्यवसायांना सर्वतोपरी सहाय्य केले जाईल. राष्ट्रीय कौशल्य अभियाना अंतर्गत अनेक मंत्रालयांच्या अखत्यारीत येणाऱ्या कौशल्य विकास उपक्रमांना एका छताखाली आणले जाईल आणि त्याच्या सर्व प्रक्रिया सूत्रबद्ध व तर्कसंगत केल्या जातील.

''मेक इन इंडिया'' उपक्रमाला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने या अर्थसंकल्पात भारतात उत्पादन प्रकल्प सुरु करण्याच्या प्रक्रिया सुलभ आणि स्वस्थ करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ''गार'' कायद्याला दोन वर्षासाठी पुढे ढकलणे, येत्या चार वर्षात कार्पोरेट करात ३० टक्क्यांवरून २५ टक्क्यां पर्यंत कपात करणे, कर सुसुत्रीकरणाचे प्रस्ताव, या सगळ्यामुळे भारतात स्थिर आणि निश्चित करव्यवस्था आहे, असा संदेश जगातील व्यावसायिकांना गेला आहे. जी एस टी म्हणजेच वस्तू आणि सेवा कराची एक एप्रिल २०१६ पासून सार्वत्रिक समान अंमलबजावणी सुरु झाली की देशातील कर आकारणीतील दोष दूर होतील आणि ती अधिक प्रभावीपणे सकल राष्ट्रीय उत्पादनवाढ होण्यास मदत होईल . भारतात उद्योग सुरु करण्यासाठीच्या प्रक्रिया अधिक सरळ, सुसंगत आणि ऑनलाईन करून उद्योजकांना सुविधा देण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पात आपल्याला दिसतो.

देशात उद्योग सुरु होण्यासाठी विपुल पायाभूत सुविधा उभारणे गरजेचे आहे, हे लक्षात घेत या अर्थसंकल्पात या क्षेत्रासाठी तब्बल ७० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्याशिवाय, २० हजार कोटी रुपये वार्षिक भांडवल पुरवठा असलेला राष्ट्रीय पायाभूत गुंतवणूक निधी ची स्थापना आणि रेल्वे, रस्ते व सिंचना क्षेत्रासाठी करमुक्त पायाभूत रोखे उभारणे हे उपक्रमही या अर्थसंकल्पात आहेत.

काही सुप्त स्वरुपातील स्त्रोतांमधून येणारा निधी लक्षात घेउन तो मुख्य आर्थिक प्रवाहात आणण्याचे कामही या अर्थसंकल्पाने केले आहे. देशात सुप्त स्वरूपातली मोठी संपत्ती असलेल्या सोन्यासाठी गोल्ड मोनेटायझेशन योजना, सोन्याचे स्वतंत्र रोखे आणि भारतीय बनावटीच्या सोन्याच्या नाण्यांची निर्मिती या उपायातून तिजोरीचे धन असलेले सोने अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात येईल. काळा पैसा रोखण्यासाठी १० वर्षांची शिक्षा आणि ३०० टक्के दंडाची तरतूद असलेला सर्वंकष कायदा आणण्याचा स्वागतार्ह प्रस्ताव या अर्थसंकल्पात आहे. तसेच, संपत्ती कर पूर्णपणे रद्द करणे आणि त्या ऐवजी ११० कोटीपेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या अति श्रीमंत व्यक्तींवर २ टक्के अधिभार लावणे या तरतुदी या अर्थसंकल्पात आहेत.

वितीय तूट कमी करण्यासाठी वित्तमंत्र्यांनी सेवा कर १२.३६ टक्क्यांवरून १४ टक्के करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. . ही घोषणा लोकांना आवडणारी नसली तरी अर्थव्यवस्था रुळावर आणण्याच्या दृष्टीने ती महत्वाची आहे.

अखेरचा अतिशय महत्वाचा मुद्दा म्हणजे संघराज्य व्यवस्थेत राज्यानाही पुरेसे महत्त्व देत या अर्थसंकल्पात सरकारने १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारसी मान्य केल्या आहेत. त्यानुसार केंद्राच्या अखत्यारीतील करातल्या महसुलात राज्याचा वाटा ३२ टक्क्यांवरून ४२ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आला आहे. यामुळे राज्यात असलेल्या स्त्रोतांवर राज्य सरकारांचा अधिकार तर वाढेलच, त्याशिवाय राज्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी, आवश्यक त्या योजना प्राधान्यक्रमाने राबवण्यासाठी निधी वापरण्याची लवचिकता आणि स्वातंत्र्य राहील.

सारांश मांडायचा तर, ह्या अर्थसंकल्पात जनतेच्या दूरगामी कल्याणासाठी अनेक आशादायी पावले उचलली आहेत. देशाला विकासाच्या दिशेने नेण्यासाठी तसेच प्रत्येक भारतीयाच्या आयुष्यात बदल घडवण्यासाठी एक आराखडा दिला आहे. हा अर्थसंकल्प एक दृढ इच्छाशक्ती असलेला आणि उज्ज्वल भविष्याची वाटचाल करणारा आहे.

# अर्थसंकल्प २०१५-१६ : विकासाभिमुख आणि सर्वसमावेशक

- डॉ. नितिन ज्ञानदेव चौधरी



**जगातील अनेक देशात मंदी सदृश्य स्थिती असताना भारतात विकासासाठी पोषक वातावरण आहे. तसेच भारतातील सध्याचे सरकार विकासासाठी आशावादी असल्याचे दिसून येते. देशात पंतप्रधानांनी सुरू केलेल्या जन धन योजनेमध्ये बॅंकेत १२.५ कोटी लोकांनी खाते उघडले हे त्याचे फलित आहे. याचा आधार शासनाला JAM (जनधन, आधार, मोबाईल) योजना सुरू करण्यासाठी हेईल. या योजनेद्वारे खातेधारकांच्या खात्यात सरळ अनुदान जमा होईल. शासनाने स्वतःचा प्रशाकीय खर्च कमी करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. तसेच राजकोषीय घाटा ४.१ टक्क्यांपर्यंत खाली आणण्याचे उदिष्ट असुन पुढील तीन वर्षात लक्ष आहेत तर तो ३ टक्के कमी करण्याचे लक्ष आहे.**

'बजेट' हा इंग्रजी शब्द मूळ फ्रेच ''लहानशी थैली'' या शब्दावरून आला आहे. बजेट या शब्दाचा मराठीत अर्थ अर्थसंकल्प होतो. अर्थ पैसा आणि संकल्प ध्येय या दोन शब्दावरून आपणास असे लक्षात येते की, पैशाची उभारणी आणि वापर, तसेच वापरातून उभारणी असा या अर्थसंकल्पाचा अर्थ काढता येतो. विशिष्ट आर्थिक परिस्थितीने लादलेल्या आर्थिक मर्यादानुसार जमा-खर्चाची तोंडमिळवणी करण्याची कला म्हणजे अर्थसंकल्प होय.

अर्थसंकल्पामध्ये प्रामुख्याने तीन क्रिया महत्त्पूर्ण आहेत. १. शासनाने करावयाची निरनिराळ्या उद्दिष्टांची निश्चिती उदा : शिक्षण, संरक्षण, दळणवळण, शांतता व सुरक्षा, न्यायव्यवस्था, लोककल्याण योजना इत्यादी. २. ठरविलेल्या उद्दिष्टांची पूर्ती करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाचा अंदाज आणि ३. शासनाने निश्चित केलेल्या कार्यक्रमासाठी आवश्यक तेवढा पैसा उभा करण्याची जनतेची इच्छा आणि शक्ती यांचे मूल्यमापन.

देशात नव्याने स्थिर सरकार स्थापन झाल्याने धोरणात्मक निर्णय घेताना आता कोणत्याही प्रकारच्या अडचणी निर्माण होणार नाही. तसेच शासनाने सत्तास्थापने बरोबर विविध योजनांची आखणी करून अंमलबजावणी करण्यास सुरवात केली. त्याच बरोबर संपूर्ण देशात सर्वच क्षेत्रांना विकासात्मक कार्यामध्ये समावेश करण्यासाठी **राष्ट्रीय भारत परिवर्तन संस्था** (निति आयोग) यांची १ जानेवारी २०१५ रोजी स्थापना केली. त्याच बरोबर जागतिक पातळीवर भारताचे स्थान एक मजबूत अर्थव्यवस्था म्हणून प्रकर्षाने समोर येऊ लागले. याच आधारावर म्हणजेच विकासाचा पाया उभारणी करून विकासाला योग्य दिशा देऊन गती देण्याकरिता २०१५-१६ करिता अर्थसंकल्प तयार करण्यात आला आहे. या अर्थसंकल्पामुळे प्रत्येक भागाच्या विकासाला प्रेरणा प्राप्त करून देणे याचे प्रमुख उद्दिष्ट असणार आहे. यासाठी शासन स्तरावर शासनाला काही कठोर पावलेही उचलावी लागलेली आहेत.

या अर्थसंकल्पाची सविस्तर चर्चा खाली प्रकारे करण्यात आली आहे.

### रेल्वे अर्थसंकल्प २०१५-१६ :

२६ फेब्रुवारी २०१५ रोजी संसदेत केंद्रीय रेल्वे मंत्री सुरेश प्रभू यांनी रेल्वे अर्थसंकल्प मांडला. केंद्रीय अर्थसंकल्पात रेल्वे करिता १० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. देशात १९२०-२१ मध्ये **ॲकवर्थ समितीने** प्रथम रेल्वे अर्थसंकल्प मांडण्याची कल्पना मांडली. केंद्रिय अर्थसंकल्पातून १९२४ पासून रेल्वे अर्थसंकल्प वेगळा काढण्यात आला. प्रस्तुत अर्थसंकल्प मांडत असतांना त्यांनी रेल्वे ही देशाची नाळ असून रेल्वेच्या विकासाशिवाय देशात विकासाला गती प्राप्त करणे कठीण आहे असे मत व्यक्त केले. त्यामुळे २९ वर्षानंतर प्रथमच यावेळी कोणतीही नवीन गाडी सुरू न करता, आहे त्यातच नवनवीन

तंत्रज्ञानाची जोड देऊन सुधारणा करण्यावर भर दिला आहे. देशात रेल्वे अतिश्रीमंता पासून तर अतिगरीब व्यक्ती पर्यंत वापर करण्यात येणारा प्रवासी वर्ग, शेतकरी, उद्योजक, कारखानदार, व्यावसायिक, नोकरदारवर्ग इत्यादींच्या वापरात येणारा हा प्रकल्प आहे. देशात १६१ पूर्वी सुरू झालेल्या रेल्वेचे १९५१ मध्ये राष्ट्रीयीकरण झाले होते. भारतीय रेल्वेची यंत्रणा मोठी असून जगातील दुसरी मोठी रेल्वे यंत्रणा आहे. एकूण ११५००० किमी लांबीचे रेल्वेमार्ग आहेत व एकूण १२६१७ रेल्वे गाड्य २३ दशलक्ष प्रवाश्यांची रोज ५९७१३ प्रवासी डब्यातून वाहतूक करतात. देशात एकूण ७१७१ रेल्वे स्थानक आहेत.

मालवाहतुकीच्या बाबतीत रोज ७४२१ मालगाड्या ३० लक्ष टन माल वाहून नेतात. यासाठी रेल्वेकडे २३९२८१ मालडबे असून ९५४९ इंजिने आहेत. प्रस्तुत रेल्वे अर्थसंकल्पात जरी प्रवासी भाडेवाढ करण्यात आली नसली तरी माल वाहतूकीत किंचित वाढ करण्यात आली आहे. त्याचा परिणाम काही प्रमाणात वस्तूच्या किंमतीत नक्कीच वाढ होईल. परंतु रेल्वे क्षेत्रात ८.५० लाख कोटी रुपयांच्या केले जाणाऱ्या प्रस्तावित गुंतवणुकीमुळे तसेच माल वाहतुकीच्या दरांची रचना बदलल्याने वस्तूंची मागणी वाढण्यास सहकार्य होईल अशी आशा आहे.

देशातील रेल्वेला नवीन तंत्रज्ञानाची जोड देऊन रेल्वे सर्वांसाठी सुलभ तसेच महिला वर्गाची सुरक्षा यावर आणि रेल्वेमधील होणाऱ्या गैरप्रकारावर या रेल्वेसंकल्पामुळे नक्कीच वचक बसेल. एकंदरित रेल्वे अर्थसंकल्पामध्ये सर्वसामान्य व्यक्तीचे हित डोळ्यासमोर ठेऊन तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर रेल्वेमध्ये सुधारणा करण्यास प्रोत्साहन देणारा हा अर्थसंकल्प आहे.

**केंद्रीय अर्थसंकल्प २०१५-१६ :**

२८ फेब्रुवारी २०१५ रोजी केंद्रिय वित्तमंत्री श्री. अरुण जेटली यांनी संसदेत वर्ष २०१५-१६ करिता अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पामध्ये सरकारी तिजोरीतील प्रत्येक रुपया हा रोजगारनिर्माण, गरिबी उच्चाटन व आर्थिक वेगाच्या माध्यमातून देशवासीयांचे जीवनमान उंचावण्यासाठी खर्च होईल अशी तरतूद करण्यात आली आहे. हा अर्थसंकल्प सहकारी संघवाद तसेच सशक्तीकरण प्रक्रियेची सुरवात आहे. या अर्थसंकल्पाची वैशिष्ट्ये म्हणजे देशाचा विकास घडवून आणण्यासाठी राज्यांच्या विकासाला महत्त्व देण्यात आले आहे. त्याकरिता केंद्रशासनाने राज्यांची मजबूत ''टिम इंडीया'' तयार करण्यावर भर देण्यात आला आहे. प्रस्तुत अर्थसंकल्पात देशातील विविध योजना व विकासकार्यावर खर्च करण्यासाठी ४,६५,२७७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

प्रस्तुत अर्थसंकल्पात विकासाच्या वृध्दीचे लक्ष वर्ष २०१५-१६ करिता ७.४ टक्के निर्धारित करण्यात आले असून २०१६-१७ करिता ८ ते ८.५ टक्के व त्यानंतरच्या वर्षात दोन अंकी राहण्याची अपेक्षा करण्यात आली आहे.

| **रुपया असा येईल** | | |
|---|---|---|
| कर्जे आणि इतर स्त्रोत | २४ | पैसे |
| कर्जेतर भांडवली उत्पन्न | ४ | पैसे |
| करांव्यतिरिक्त उत्पन्न | १० | पैसे |
| सेवाकर व इतर कर | ९ | पैसे |
| उत्पादनशुल्क | १० | पैसे |
| सीमाशुल्क | ९ | पैसे |
| प्राप्तिकर | १४ | पैसे |
| कंपनीकर | २० | पैसे |
| एकूण | १०० | पैसे |

| **रुपया असा खर्च होईल** | | |
|---|---|---|
| करातील राज्यांचा वाटा | २३ | पैसे |
| राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना योजनाबाह्य खर्च | ५ | पैसे |
| राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना योजना साथ | ९ | पैसे |
| केंद्रीय योजना | ११ | पैसे |
| व्याज | २० | पैसे |
| संरक्षण | ११ | पैसे |
| अंशदान | १० | पैसे |
| योजनाबाह्य इतर खर्च | ११ | पैसे |
| एकूण | १०० | पैसे |

**कृषी :**

प्रस्तुत अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी ''अच्छे दिन'' ची प्रचीती असल्याचे दिसून येते. केंद्र सरकार **नीति आयोगाद्वारे शेतीचा विकास** करणार आहे याकरिता कृषी कर्जाची मर्यादा ५० हजाराने वाढवून ८.५ लाख कोटी रु. करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी तीन लाखापर्यंत ७ टक्के व्याज दराने कर्जपुरवठा केला जाणार आहे, तसेच कर्जाची वेळेत परतफेड करणाऱ्यांकरिता ४ टक्के व्याजदर आकारण्यात येईल. अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना सुलभ कर्ज वितरित करता येईल या दृष्टीने लक्ष केंद्रित करण्यावर भर देण्यात येईल. कृषी उत्पादनात वाढ होण्यासाठी सिंचन आणि जमिनीची पोत सुधारण्यासाठी आर्थिक मदत दिली जाणार आहे. तसेच

शेतमालाला योग्य मोबदला मिळावा म्हणून राज्यांनी एकत्र येऊन **राष्ट्रीय कृषी बाजाराची निर्मिती** करण्याची शिफारस करण्यात आली आहे. नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधीसाठी २५ हजार कोटी रु.ची तरतूद केल्याची घोषणा करण्यात आली.

कृषी उत्पादन वाढविण्यासाठी जमीन आणि पाण्याचे महत्त्व लक्षात घेऊन शासनाने आपला अर्थसंकल्प तयार केला आहे. सूक्ष्मसिंचन व जलसंधारण यावर भर देणाऱ्या योजनांना निधी वाटपात प्राधान्य देण्यात आले. कृषी मंत्रालयाच्या सेंद्रिय खतांवर आधारित परंपरा **कृषी विकास योजना व प्रधानमंत्री ग्रामसिंचाई योजनेसाठी** ५३०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

## संरक्षण

संरक्षण क्षेत्राचा विचार केल्यास हा अर्थसंकल्प सुधारणावादी आहे. **मेक इन इंडिया** च्या माध्यमातून सरकारने देशात संरक्षण उद्योगाला प्रोत्साहन देण्याचे धोरण अवलंबले आहे. देशात संरक्षण उत्पादन झाल्यास रोजगार निर्मिती वाढण्याबरोबर परकीय गंगाजळी बाहेर जाण्याचा ओघ कमी होणार आहे. संरक्षण क्षेत्रासाठी या अर्थसंकल्पात २,४६,७२७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मागील वर्षीच्या तूलनेत १०.९५ टक्के तरतूद अधिक आहे. यावरून संरक्षण क्षेत्र हे स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करण्याच्या दिशेने वाटचाल करीत असून आगामी काळात संरक्षण सामग्रीची भारतातून निर्यात होऊ शकेल.

## आरोग्य

शासनाच्या हा पूर्ण अर्थसंकल्प आरोग्याच्या दृष्टीने समाधान कारक आहे. कारण या अर्थसंकल्पात आरोग्याकरिता खर्च करण्यात येणारा निधी मागील वर्षीपेक्षा कमी असून तो ३३,१५२ कोटी रुपये एवढा आहे. तसेच एड्स, आयुष, वैद्यकीय संशोधन, आरोग्य आणि कुटुंब कल्याणाच्या निधीमध्ये घट करून ती ३३,२८२ कोटी रुपये करण्यात आली आहे. मात्र आरोग्य सुविधांच्या बाबतीत विचार केल्यास सर्वसामान्य नागरिकांना मोठ्याप्रमाणात ह्या सुविधा पुरविण्यावर भर देण्यात आला आहे. जेष्ठ नागरिकांना या अर्थसंकल्पात मोठ्या प्रमाणत सुट देण्यात आली आहे. **अटल पेन्शन योजनेच्या** माध्यमातून प्रत्येकाला निवृत्तवेतन दिल्या जाणार आहे. याकरिता सरकार भागीदारीच्या तत्त्वावर गुंतवणूक करणार आहे. कर्मचारी भविष्य निधी आणि सार्वजनिक भविष्य निधीमधील आजवर दावा न केलेल्या रकमेचा वापर **सीनिअर सिटीझन वेल्फेअर** योजनेसाठी करण्यात येणार आहे. ८०सी, ८०डी इत्यादी सर्व उपलब्ध सवलतींचा विचार केल्यास जेष्ठ नागरिकांना सुमारे पाच लाख रुपयापर्यंत उत्पन्न असल्यास प्राप्तिकर भरावा लागणार नाही. तसेच **वरिष्ठ पेन्शन विमा** योजनेवरील सेवाकर रद्द करण्यात आला आहे.

## ग्रामीण

अर्थसंकल्पाला विकासची जोड देण्यासाठी प्रस्तुत अर्थसंकल्पात ग्रामीण भागातील मागासवर्गीय उद्योजकतेला प्रोत्साहन देण्याची घोषणा व त्यासाठी **मुद्रा बँकेची** घोषणा करण्यात आली आहे. भारतात १,५४,००० पोस्ट ऑफिस असून ग्रामीण भागात याचे मोठे जाळे आहे. त्याकरिता पोस्ट ऑफिस व शासनामार्फत चालविण्यात आलेली **जन धन योजना** यांचा समन्वय साधून पोस्ट बँकींग सुरू करण्याचा मानस आहे. शासनाला वर्ष २०२२ पर्यंत **प्रत्येकाला घर** याकरिता ग्रामीण भागात ४ कोटी तर शहरी भागात २ कोटी घर बांधण्याचे लक्ष ठेवण्यात आले आहे. या घरात २४ तास वीजपुरठा, पिण्याचे स्वच्छ पाणी, शौचालय व्यवस्था आणि रस्ते जोडणी या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. २०२० पर्यंत उर्वरित २० हजार गावांचे विद्युतीकरण करण्याचे उद्दिष्ट पूर्ण केले जाईल. रुर्बन क्लस्टर योजनेच्या माध्यमातून जीवनमान उंचवण्याचा प्रयत्न याद्वारे होणार आहे. गरीब आणि वंचित घटकांसाठी हा अर्थसंकल्प असल्याचे दिसून येते. या अर्थसंकल्पात एकंदरित ग्रामीण विकासाकरिता ७९,५२६ कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली आहे.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अर्थात मनरेगासाठी** आतापर्यंतची सर्वाधिक तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांतील कुणीही रोजगाराशिवाय राहणार नाही याची काळजी घेतली जाईल. याकरिता मनरेगा करिता ३४,६९९ कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली असून याच आर्थिक वर्षाकरिता ५००० कोटी रुपयाची अतिरिक्त तरतूदही करण्यात आली आहे.

## पायाभूत सुविधा

प्रस्तुत अर्थसंकल्प हा पायाभूत सुविधांचाच आहे असे म्हणायला हरकत नसावी. या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधासाठी ७० लाख कोटींच्या तरतूदीसह रेल्वे आणि रस्ते विकासासाठी करमुक्त बाँड्सची घोषणा करण्यात आली

आहे. म्हणजेच पयाभूत सुविधांच्या निर्मितीमुळे रोजगारात मोठ्या प्रमाणात वाढ होण्याचे संकेत आहेत. २० हजार गावापर्यंत वीज नेण्याचे उद्दिष्ट असून पाच मोठे वीज प्रकल्प विचाराधीन आहेत. तसेच सहा कोटी शौचालये उभारण्याचे ध्येय आहे. पायाभूत सुविधासांठी खाजगी गुंतवणुकीची व बांधकाम व्यवसायात गुंतवणुकीची आवश्यकता असल्याचे जेटलींनी सांगीतले. तसेच संशोधन आणि विकासाकरिता १५० कोटींची तरतूद करण्यात आली.

लघु व उद्योग हा भारतीय उत्पादन व प्रक्रिया उद्योगाचा कणा आहे. कारण वस्तूंची स्पर्धात्मक किंमत राखण्यासाठी लघु उद्योगांचे सक्षमीकरण गरजेचे आहे. या अर्थसंकल्पात सूक्ष्म व लघु उद्योगांना भांडवल पुरवठा सुलभ करण्यासाठी मुद्रा बँकेची घोषणा करण्यात आली आहे. व पहिल्या वर्षी ३००० कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. आयटी उद्योग भारताचे शक्तिस्थान आहे. याचे अधिक सबलीकरण करण्यासाठी १००० कोटी रुपयाचा निधी घोषीत करण्यात आला आहे.

यामध्येच शिक्षण क्षेत्रासाठी ६८,९६८ कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये उद्योजकता, रोजगार, कौशल्य विकास, तसेच वेगवेगळ्या राज्यात शिक्षणासाठीच्या सार्वजनिक संस्थांच्या माध्यमातून प्रत्येक पात्र व्यक्तीसाठी शिक्षणावर भर दिला गेल्याचे स्पष्ट होते. आयटी उद्योगांसाठी **सेतू (सेल्फ एम्प्लॉयमेंट टॅलेंट युटिलायझेशन)** योजना स्थापन करण्यात येणार असून त्याकरिता १००० कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे. सेतू च्या माध्यमातून **टेक्नो-फायनान्शियल, इनक्युबेशन तसेच फॅसिलिटेशन प्रोग्रामवर** भर देणारा हा उपक्रम नवोदितांसाठी उत्तम आहे. पायाभूत सुविधा तसेच उत्पादनावर भर देणारा हा अर्थसंकल्प तरुणवर्गासाठी एक वरदानच आहे. वाढत्या उद्योगामुळे त्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध होऊ शकतील. देशात नव्या शैक्षणिक संस्था आणि उच्च शिक्षणासाठी सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे कुशल मनुष्यबळ तयार होईल.

देशाच्या प्रगतीत उर्जा क्षेत्राचे महत्त्व जाणून अर्थसंकल्पात १,६७,३४२ कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली आहे विशेषत: अपारंपरिक उर्जा निर्मितीवर भर देण्यात आला आहे. देशातील अणुऊर्जा प्रकल्पासाठी १५,१०६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. यामुळे शासनाचे प्रत्येक घरापर्यंत वीज हे उद्दिष्ट पूर्ण होईल.

भारतात पर्यटन व्यवसाय मोठ्या प्रमाणात यशस्वी झालेला आहे. त्याद्वारे शासनाला मोठ्या प्रमाणात उत्पन्न प्राप्त होते. या अर्थसंकल्पात सेवा क्षेत्र आणि हॉटेल उद्योगाच्या अपेक्षा पूर्ण केल्या आहेत. १५० देशातील पर्यटकांना भारतात व्हिसा ऑन अरायव्हल देण्याची घोषणा सेवाक्षेत्राला तेजी प्राप्त करवून देईल अशी आशा आहे. त्यामुळे ह्या व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी २५ हेरिटेज साईटची दुरूस्ती करण्याचे आयोजिले आहे.

## महिला

महिलासांठी या अर्थसंकल्पात विशेष तरतूद असलेली स्पष्टपणे दिसून येत नाही. मात्र महिलांच्या सुरक्षेसाठी **निर्भया फंडात** केलेली १००० कोटींची वाढ, उच्च शिक्षणाच्या वाढलेल्या संधी, **पंतप्रधान विद्यालक्ष्मी योजनांचा** लाभ, मुलींचे उच्च शिक्षण आणि विवाहासाठी उघडलेल्या **सुकन्या समृध्दी** खात्याला कर वजावाटीची दिलेली जोड, अल्पसंख्यांक विद्यार्थीनींना मिळणारा **नयी मंजिल योजनेचा** लाभ यांचा वेगळा विचार केल्यास हा अर्थसंकल्प महिलांना दिलासा देणारा ठरू शकतो. असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या महिला दरमहा १ रुपया म्हणजे वर्षाला १२ रुपये भरून दोन लाखापर्यंतच्या अपघाती विम्याचा लाभ मिळवू शकतील. म्हणजेच महिलांच्या सामाजिक सुरक्षा व वैयक्तिक सुरक्षेवर भर देण्यात आला आहे.

## करप्रणाली

केंद्रातील नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारची महत्त्वाकांक्षी योजना असलेल्या **स्वच्छ भारत** मोहिमेसाठी अर्थसंकल्पात शिक्षणाप्रमाणेच तरतूदी करण्यात आल्या आहेत. तसेच स्वच्छ भारत मोहीमेसाठी देणगी दिल्यास आणि भारतीय नागरिकांनी **गंगा स्वच्छता मोहिमेसाठी** देणगी दिल्यास त्यांना ८० जी अंतर्गत १०० टक्के करसवलत मिळणार आहे. तसेच पगारदार, सामान्य करदाते यांच्यासाठी महत्त्वपूर्ण असणाऱ्या करांची स्थिती स्थिर ठेवण्यात आली आहे. प्राप्तिकरमुक्त उत्पन्नाची सवलत ४,४४,२०० रुपयापर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे करदात्यांना अधिकाधिक करमुक्त उत्पन्नाचे लाभ प्राप्त करता येणार आहे. आरोग्य विम्याचा हप्ता भरल्याबद्दल करातून सूट मिळण्याची मर्यादा १०,००० रुपयांनी वाढविली आहे. वाहतूक भत्यावरील कर सवलतीची वार्षिक मर्यादा दुप्पट करून १९,२०० इतकी केली आहे.

ही मर्यादा मासिक ८०० वरून १६०० वर नेली. नागरिकांची सामाजिक सुरक्षा सुनियोजित करण्यासाठी नव्या पेन्शन योजनेत गुंतवणुक करणाऱ्याना ८० सीसीडी कलमाखाली ५०,००० रुपयांची मर्यादा करण्यात आली आहे. १ कोटीपेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या अतिश्रीमंतांना लागू असलेला संपत्ती कर रद्दबातल ठरविला आहे. संपत्तीकरा ऐवजी अतिश्रीमंत व्यक्तीकडून २ टक्के (१२ टक्के) अधिभार घेण्यात येणार आहे. तसेच ५०,००० ऐवजी आत १ लाखाच्या खरेदीवर पॅन आवश्यक केले आहे.

सेवा करात सरसकट २ टक्के वाढ करून तो १२.३६ टक्क्यांवरून १४ टक्के केला आहे. त्यामुळे काही प्रमाणात महागाई वाढण्यास प्रोत्साहन मिळणार हे नक्कीच. याचा परिणाम सरळ ग्राहकांच्या खिशावर होणार आहे.

सोन्याची सर्वाधिक आयात करणाऱ्या या देशात सुमारे २००० टन सोन्याचा साठा आहे. त्यामुळे शासनाने **गोल्ड मॉनेटायजेशन योजना** तयार केली आहे. या योजनेत सहभागी होणाऱ्या खातेधारकाला सोन्यावर व्याज तर सराफी व्यावसायिकांना कर्ज मिळणार आहे. बँका तसेच अन्य सुवर्ण व्यापार्यांना सोन्याचे रोख रकमेत परिवर्तन करण्याची सवलत या योजनेत आहे. सोन्याच्या खरेदीला पर्याय म्हणून सुवर्ण बाँड आणण्यात येणार आहेत. या बाँडवर स्थिर दराने व्याज दिले जाणार आहे. विदेशातून सोन्याच्या नाण्यांची मोठ्या प्रमाणात आयात होते. हे लक्षात घेऊन देशांतर्गतच सुवर्णनाणे तयार करण्यात येणार असून त्यावर अशोक चक्र असेल.

## काळापैंसा

भारताच्या मालकीची असलेली, परंतु काळ्या पैशाच्या रुपाने विदेशात असलेली संपत्ती परत आणणे, हे आपल्या सरकारचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे सांगत अर्थमंत्र्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. यासाठी संसदेत नव्याने विधेयक मांडणार असून या नव्या कायद्यानुसार विदेशातील मालमत्तेबाबत करचुकवेगीरी केल्यास दहा वर्षापर्यंत सक्तमजुरीची शिक्षा होण्याची तरतूद आहे. तसेच ३०० टक्के दंडाचाही समावेश करण्यात येणार आहे.

## निष्कर्ष :

जगातील अनेक देशात मंदी सदृश्य स्थिती असतांना भारतात विकासासाठी पोषक वातावरण आहे. तसेच भारतातील सध्याचे सरकार विकासासाठी आशावादी असल्याचे दिसून येते. देशात पंतप्रधानांनी सुरू केलेल्या जन धन योजनेमध्ये बँकेत १२.५ कोटी लोकांनी खाते उघडले हे त्याचे फलित आहे. याचा आधार शासनाला JAM (जनधन, आधार, मोबाईल) योजना सुरू करण्यासाठी हेईल. या योजनेद्वारे खातेधारकांच्या खात्यात सरळ अनुदान जमा होईल. शासनाने स्वत:चा प्रशाकीय खर्च कमी करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. तसेच राजकोषीय घाटा ४.१ टक्क्यावर आणण्याचे लक्ष आहे तर पुढील ३ वर्षापर्यंत तो ३ टक्के कमी करण्याचे लक्ष आहे.

प्रस्तुत अर्थसंकल्प हा जरी दृष्य स्वरूपात उद्योजक वर्गाला प्रोत्साहन देणारा दिसत असला तरी कृषी, सेवा, व उद्योग याबरोबरच देशाच्या सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन देणारा हा अर्थसंकल्प आहे. उद्योगासाठी पोषक वातावरण तयार करणारा अर्थसंकल्प आहे. देशातील प्रत्येक घटकांचा विकास कसा साध्य करता येईल यासाठी ही योजना आहे. अर्थशात्रीय भाषेत संतुलित विकास आणि असंतुलित विकास यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न अर्थमंत्र्यांनी केला आहे. प्रामुख्याने देशातील गरीबी २०२२ पर्यंत नष्ट करण्यासारख्या भूमिका ह्या अर्थसंकल्पाला शासनाच्या दीर्घकालीन भूमिकेचे दर्शन घडवित आहे. या अर्थसंकल्पाचे परिणाम आपणास काही प्रमाणात अल्पावधीत मात्र काही योजनांचा परिणाम दीर्घावधीत दिसून येईल. त्यामुळे या अर्थसंकल्पाला धोरणात्मक आणि विकासात्मक अर्थसंकल्प म्हणता येईल.

## संदर्भ सूची :


१. आर्थिक सर्वेक्षण २०१४-१५, भारत सरकार
२. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण ५५४ ६ग८/१०/१ वी फेरी, भारत में रोजगार एंव बेरोजगार की स्थिती, राष्ट्रीय प्रतिदर्श सर्वेक्षण कार्यालय, सांख्यिकी एवं कार्यक्रम कार्यन्वयन मंत्रालय भारत सरकार, जानेवारी २०१४
३. दैनिक लोकसत्ता दि. ०१:०३:२०१५
४. दैनिक सकाळ दि. ०१:०३:२०१५
५. दैनिक महारष्ट्र टाईम्स ०१:०३:२०१५



*__डॉ. नितीन चौधरी__ हे अकोला (महाराष्ट्र) येथिल सिताबाई कला महाविद्यालय येथे अर्थशास्त्र विभागात कार्यरत असुन अर्थशास्त्र विषयावर सातत्याने लिखाण करतात.*

# अंदाजपत्रक : संकल्पना आणि अन्वयार्थ

प्रा. शिवकुमार ल. बिरादार




| | 2013-14 Actuals (Prov.) | 2014-15 Budget Estimates | 2014-15 Revised Estimates | 2015-16 Budget Estimates |
|---|---|---|---|---|
| Revenue Receipts | 1014724 | 1189763 | 1126294 | 1141575 |
| Capital Receipts | 544723 | 605129 | 554864 | 635902 |
| Total Receipts | 1559447 | 1794892 | 1681158 | 1777477 |
| Non-plan Expenditure | 106120 | 1219892 | 1213224 | 1312200 |
| Plan Expenditure | 453327 | 575000 | 467934 | 465277 |
| Total Expenditure | 1559447 | 1794892 | 1681158 | 1777477 |
| Revenue Deficit | 357048 | 378348 | 362486 | 394472 |
| Fiscal Deficit | 502858 | 531177 | 512628 | 555649 |
| Primary Deficit | 128604 | 104166 | 101274 | 99504 |

**संसदेत एकदा अंदाजपत्रक सादर झाले की, सर्व अर्थतज्ञांच्या नजरा विश्लेषणात्मक, भरीव आणि आर्थिक, तांत्रिक लेख्याजोख्याच्या परिक्षणासाठी उत्सुक असतात.**


**जीडीपीचे प्रमाण, महसुली, वित्तीय, प्राथमिक तुटींचे परस्परातील प्रमाण, कर्जाचे प्रमाण याचा योग्य मेळ घालणे ही वित्तमंत्र्यांची तारेवरची कसरत असते कारण पुर्ण क्षेत्रनिहाय अंदाजपत्रकात निधींचे वितरण आधिच्या सर्व तुटींचा अभ्यास करून केलेले असते. तेव्हाच भविष्यातील होणाऱ्या विविध तुटींचे प्रमाण आणि कार्य प्रणाली याबद्दलची माहिती या लेखात दिली आहे.**

अंदाजपत्रक किंवा अर्थसंकल्प हे एक वित्तीय देस्तावेज असून, ज्यामध्ये सरकारचे पुढील वर्षासाठीचे अंदाजित उत्पन्न व प्रस्तावित खर्च यांचा समावेश केलेला असतो. अंदाजपत्रक हे एका आर्थिक वर्षासाठी म्हणजेच १ एप्रिल ते ३१ मार्च साठी तयार केलेले असते. एकंदरीतपणे अंदाजपत्रक हे पुढील वर्षासाठीचे अंदाजित उत्पन्न व प्रस्तावित खर्च याबद्दल मांडलेला पूर्व नियोजित आराखडा होय. जर अंदाजित उत्पन्न हे प्रस्तावित खर्चापेक्षा अधिक असेल तर आशा अंदाजपत्रकास शिल्लकीचे अंदाजपत्रक असे म्हणतात. या उलट अंदाजित उत्पन्नापेक्षा प्रस्तावित खर्च अधिक असेल तर अशा अंदाजपत्रकास तुटीचे अंदाजपत्रक असे म्हणतात. तसेच अंदाजित उत्पन्न व प्रस्तावित खर्च एकसमान असतील तर त्यास समतोल अंदाजपत्रक म्हणुन ओळखले जाते.

अर्थसंकल्प हे एक खूपच गोपनीय दस्तावेज असून, ते भारत सरकारच्या वित्तीय मंत्रालयाकडून तयार केले जाते आणि वित्तमंत्री लोकसभेत सादर करतात. एकदा अंदाजपत्रकाला मंजुरी मिळाली की, त्यावरील अमंलबाजवणी चालु होते. पुढील वर्षासाठीचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी चालू वर्षातील ऑगस्ट महिन्याचा दुसऱ्या आठवड्यापासून विविध मंत्रालय व विभागाकडून प्रस्तावित खर्च मागवून तयार केली जातात. अंदाजपत्रक हे भूत व भविष्यकाळावर दृष्टीक्षेप टाकणारा देस्तावेज असुन त्यामध्ये खालील तीन गोष्टींचा समावेश असतो.

१. मागील वर्षातील जमा खर्चाचा हिशेब
२. चालू वर्षासाठीचे अंदाजपत्रकीय व सुधारित अंदाज
३. पुढील वर्षासाठीचे अंदाजपत्रकीय अंदाज

- अंदाजपत्रकीय अंदाजः पुढील आर्थिक वर्षासाठी सरकारच्या खर्च व प्राप्ती बद्दल बांधलेले अंदाज ज्याला संसदेची मान्यता घावयाची असते त्यास अंदाजपत्रकीय अंदाज असे म्हणतात.
- सुधारीत अंदाजः सरकारी प्राप्ती व खर्च बद्दलचे सुधारित अंदाज हे ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यामध्ये मागील सहा महिन्याच्या वास्तविक खर्च व प्राप्तीच्या आधारावर तयार केले जातात.
- अंदाजपत्रकाचे घटकः अंदाजपत्रकाचे महत्वाचे दोन घटक म्हणजे प्राप्ती (उत्पन्न) आणि खर्च/. प्राप्तीच्या आधारावर खालिलप्रकारे अंदाजपत्रकाची रचना दाखवता येईल.''




सार्वजनिक अंदाजपत्रकामध्ये साधारणत: दोन प्रकारच्या अंदाजपत्रकाचा समावेश असतो.

अ) महसुली अंदाजपत्रक ब) भांडवली अंदाजपत्रक

**अ) महसुली अंदाजपत्रक** : महसुली अंदाजपत्रकामध्ये सरकारची महसुली प्राप्ती व सरकारचा महसुली खर्च याचा समावेश होतो. सरकारला मिळणारे नियमित उत्पन्न कशा पद्धतीने किंवा कोणत्या मार्गाने मिळते व त्याचा विनियोग विभिन्न घटकांवर कसा होतो, याचा अंतर्भाव य अंदाजपत्रकात केला जातो. या अंदाजपत्रकाचे दोन भाग पडतात. (१) महसुली प्राप्ती (२) महसुली खर्च

**(१) महसुली प्राप्ती**: म्हणजे सरकारचे असे मौद्रिक उत्पन्न ज्यामुळे सरकारला देणी निर्माण होत नाहीत किंवा सरकारच्या मालमत्तेत घट होत नाही. यामध्ये साधारणत: कर आणि करोत्तर मार्गांनी मिळवलेल्या उत्पन्नाचा समावेश होतो.

**I) कर उत्पन्न**: कर उत्पन्न म्हणजे असे एकूण उत्पन्न की जे सरकारला कर किंवा शुल्क आकारल्यामुळे मिळते. या प्रकारच्या उत्पन्नामध्ये सरकार सक्तीने कर वसूल करून उत्पन्न वाढवू शकते. हे एक प्रमुख व नियमित उत्पन्नाचे साधन म्हणून ओळखले जाते. यामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करापासून मिळालेल्या उत्पान्नाचा समावेश होतो. प्रत्यक्ष कर म्हणजे व्यक्ती किंवा संस्थाच्या उत्पन्न व मालमत्तेवर आकारला जाणारा कर होय. जसे की उत्पन्न कर, मालमत्ता कर, इ. अप्रत्यक्ष कराच्या बाबतीत मात्र कारभार स्थलांतरीत करता येतो व कराघात व कारभार वेगवेगळ्या व्यक्तीवर होतात. उदा. विक्री कर, सीमा शुल्क, उत्पादन शुल्क, इत्यादी.

**II) करेत्तर उत्पन्न**: करेत्तर उत्पन्नामध्ये प्रामुख्याने कर्जावरील व्याज, गुंतवणुकीवरील लाभांश, सार्वजनिक उद्योगाचा नफा, अनुदाने, देणगी, दंड या द्वारे मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश होतो.

**२) महसुली खर्च** : महसुली खर्च म्हणजे असे खर्च ज्यामुळे सरकारच्या मालमत्तेत वाढ होत नाही. महसुली खर्च म्हणजे सरकारचा दैनंदिन किंवा चालू खर्च होय. महसुली खर्चामध्ये प्रामुख्याने प्रशासन व्यवस्थेवरील खर्च, कायदा सुव्यवस्था, न्याय व्यवस्था, संरक्षण, सबसीडी आणि सामाजिक सेवा जसे शिक्षण,

आरोग्य यावरील खर्चाचा समावेश होतो.

ब) भांडवली अंदाजपत्रक: भांडवली अंदाजपत्रकामध्ये सरकारचे भांडवली उत्पन्न व भांडवली खर्चाचा समावेश होतो. भांडवली अंदाजपत्रकाचे दोन भाग पडतात. (१) भांडवली प्राप्ती (२) भांडवली खर्च

(२) **भांडवली प्राप्ती** : भांडवली प्राप्ती म्हणजे असे मौद्रिक उत्पन्न ज्यामुळे सरकारची देणी वाढतात किंवा मालमत्तेत घट होते. भांडवली प्राप्तीची तीन विभागात वर्गीकरण केली जातात.

I) **सार्वजनिक कर्ज** : खर्च भागविण्यासाठी सरकारने घेतलेले अंतर्गत व बहिर्गत कर्ज हे भांडवली खात्यावरील प्राप्तीचा महत्वाचा भाग आहे. सरकार देशातील लोक, संस्था तसेच जागतिक बँक किंवा आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्याकडून कर्ज घेऊ शकते. कर्ज ही सरकारची देणी वाढवतात. तसेच त्यावर व्याजसुदधा द्यावे लागते.

II) **कर्जाची वसुली**: सरकारने भूतकाळात दिलेली कर्ज वसूल होत असतील तर ते एक भांडवली खात्यावरील प्राप्तीचे महत्वाचे अंग आहे.

III) इतर प्राप्ती: या घटकामध्ये प्रामुख्याने निर्गुंतवणूकीच्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पन्नचा समावेश होतो. त्याचबरोबर विशेष ठेवी, राज्य निर्वाह निधी, बचत ठेवी, इत्यादींचा समावेश होतो. निर्गुंतवणूक म्हणजे एखाद्या उद्योगातील सरकारची हिस्सेदारी खाजगी व्यक्ती किंवा उद्योगाला विकण्याची प्रक्रिया होय. यामुळे सरकारच्या मालमत्तेत घट होते.

(२) **भांडवली खर्च** : असे सरकारचे खर्च ज्यामुळे सरकारच्या मालमत्तेत वाढ होते किंवा सरकारची देणी कमी होतात. सरकारचे असे खर्च ज्यामुळे सरकारच्या भौतिक किंवा वित्तीय संपत्तीत वाढ होते म्हणजेच जमीन, बिल्डिंग, यंत्रसामुग्री, साधने किंवा शेअर्स मधील गुंतवणूक या गोष्टींवर केलेला खर्च होय. सर्वसाधारणपणे भांडवली खर्च हे विकासभिमुख असतात.

भारत सरकारने १९८७-८८ पासून सार्वजनिक खर्चाचे वर्गीकरण नवीन प्रकारे केले आहे.

(१) योजना खर्च (२) योजनेत्तर खर्च

(१) **योजना खर्च** : योजना खर्च म्हणजे अशा योजना व कार्यक्रमासाठीचा प्रस्तावित खर्च होय ज्याचा समावेश पंचवार्षिक योजनांमध्ये झालेला आहे. हे खर्च म्हणजे केंद्र सरकारचा प्रत्यक्ष योजना खर्च तसेच राज्याला व केंद्रशासित प्रदेशांना योजना खर्चासाठी दिलेले अनुदान होय, जसे शेती, जलसिंचन, ग्रामीण विकास, दारिद्र-निर्मुलन, विज्ञान आणि तंत्रज्ञान, इत्यादि...

(२) **योजनेत्तर खर्च** : योजनेत्तर खर्च हे दैनंदिन चालू खर्च असतात, जसे प्रशासन खर्च, कायदेशीर शांतता व सुव्यवस्था, शिक्षण व आरोग्य सुविधा, संरक्षण, चालू संशोधन प्रकल्प, पोलीस, अनुदान (अंशदान), पेन्शन, पोस्टाची तुट, सरकारी विभागाचा खर्च, कर गोळा करण्याचा खर्च, इत्यादि...

### -: अंदाजपत्रकातील तुटीच्या संकल्पनाची ओळख :-

१) **अंदाजपत्रकीय तुट**: अंदाजपत्रकीय तुट म्हणजे अंदाजपत्रकातील एकूण प्रस्तावित खर्च व एकूण अंदाजीत प्राप्ती यातील फरक होय. ही संकल्पना केंद्र सरकारने १९९६-९७ च्या अंदाजपत्रकापासून खंडित केली आहे.

२) **महसुली तुट**: महसुली खर्चाचे महसुली प्राप्तीवरील अधिक्य म्हणजे महसुली तुट होय. महसुली खात्यावरील अधिक्य हे सरकारीची बचत दर्शवते. या बचतीचा वापर उत्पादकीय गुंतवणुकीसाठी करता येऊ शकतो ज्यामुळे सरकारला भविष्यात उत्पन्न प्राप्त होईल. भारताचा विचार केला असता भारताचे महसुली अंदाजपत्रक मागील बऱ्याचशा वर्षापासून

तुटीचे आहे, याचा अर्थ असा की, महसुली तुट भरून काढण्यासाठी कर्ज घेतली जातात. म्हणजेच सरकारचा चालू खर्च भागवण्यासाठी कर्ज उभारावे लागतात, याचे अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होत असतात. कर्जाचा वापर चालू खर्च भागविण्यासाठी केल्यामुळे गुंतवणुकीसाठी व उत्पाद्कीय प्रकल्पासाठी तसेच आधारभूत संरचना निर्मितीसाठी पैशाची उणीव भासते, त्यामुळे आर्थिक विकास मंदावतो.

३) **प्रभावी महसुली तुटः** प्रभावी महसुली तुटीचा संबंध महसुली तुट व भांडवली मालमत्ता निर्मितीसाठी दिलेली अनुदाने यातील फरकाशी आहे. ही संकल्पना २००९-१० या वर्षापासून वापरली जात आहे.

४) **वित्तीय तुटः** अंदाजपत्रकीय असमतोल मोजण्यासाठी वापरली जाणारी ही एक महत्वपूर्ण संकल्पना आहे. वित्तीय तुट म्हणजे एकूण खर्चाचे ( महसुली व भांडवली खर्च ) महसुली प्राप्ती व भांडवली खात्यावरील कर्जेत्तर प्राप्ती वरील अधिक्य होय. भांडवली खात्यावरील कर्जेत्तर प्राप्ती म्हणजे मागील कर्जाची वसुली तसेच निर्गुंतवणूकीच्या माध्यमातून मिळालेले उत्पन्न होय. वेगळ्या शब्दात वित्तीय तुट हि सरकारचे चालू वर्षातील कर्ज दर्शवते.

**वित्तीय तुट एकूण खर्च (महसुली व भांडवली) महसुली प्राप्ती कर्जाची वसुली निर्गुंतवणूकीतून मिळालेले उत्पन्न**

५) **निव्वळ वित्तीय तुट :** सकल वित्तीय तुटीमधून निव्वळ कर्ज वजा केले असता निव्वळ वित्तीय तुट मिळते.

६) **प्राथमिक तुट :** वित्तीय तुटीमधून व्याजदेणी वजा केले असता प्राथमिक तुट मिळते. या संकल्पनेमुळे सरकारने भूतकाळात घेतलेल्या कर्जावरील व्याजदेय रकमेचे महत्व लक्षात येते. भारतीय अर्थवेवस्थेचा विचार केला असता असे लक्षात येईल कि भारत सरकारने घेतलेल्या कर्जावरील व्याजदेणी वाढत आहेत, त्यामुळेच वित्तीय तुट वाढत आहे. वित्तीय तुट भरून काढण्यासाठी उभारलेल्या कर्जाचा बराचसा हिस्सा मागिल कर्जावरील व्याजाची परतफेड करण्यासाठीच खर्च होत आहे. याच कारणामुळे प्राथमिक तुट दिवसेंदिवस कमी होताना दिसते. २००३-०४ मध्ये भारताची प्राथमिक तुट शून्य होती, याचा अर्थ असा की, सरकारने चालू वर्षात कर्ज घेऊन उभा केलेला निधी मागील कर्जाचे व्याज देण्यावर खर्च झाला आहे.

**प्राथमिक तुट वित्तीय तुट - व्याज देणी**

सन २००६-०७ व २००७-०८ या वर्षात भारताची प्राथमिक तुट अनुक्रमे ऋणात्मक झालेली (-०.२) व (-०.९) दिसुन येते, या वरून असे लक्षात येते की, सरकारने चालू वर्षात उभारलेली कर्ज मागील कर्जावरील व्याज देण्यासाठीसुद्धा अपुरी पडत होती. हे कर्जाच्या सापळ्यात अडकलेल्या अर्थव्यवस्थेचे लक्षण आहे. असे म्हणता येईल.

निव्वळ प्रथमिक तुट ही निव्वळ वित्तीय तुटीतून निव्वळ व्याजदेणी वजा केली असता प्राप्त होते.

- **भारताची स्थिती :**

एकूण करांचे जी.डी.पी. प्रमाण, महसुली तुट, वित्तीय तुट, प्राथमिक तुट यांचे जी. डी. पी.शी प्रमाण व महसुली तुटीचे वित्तीय तुतीशी प्रमाण, एकूण कर्जाचे जी. डी. पी. शी प्रमाण या बद्दल भारताची स्थिती काय आहे याचा आढावा तक्ता क्र. १ मध्ये घेण्यात आलेला आहे. कराचे- जी.डी.पी. असणारे प्रमाण साधारणपणे १० ते ११ टक्क्याच्या दरम्यान आहे. २००९-१० या वर्षासाठी हे प्रमाण ९.६३% होते, कारण जगामध्ये आलेल्या वित्तीय संकटाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम होऊन आर्थिक वृद्धीचा वेग मंद झाल्यामुळे करप्राप्ती कमी झालेली दिसून येते. विकसित देशाच्या तुलनेत भारताचे कराचे-जी.डी.पी.शी प्रमाण कमी आहे जे की वाढवणे आवश्यक आहे, त्यासाठी करप्रशासनामध्ये सुधारणा झाल्या पाहिजेत.

| तक्ता - ०१ | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| कर्- जी.डी.पी. प्रमाण, महसुली तुट, वित्तीय तुट, प्राथमिक तुट, महसुली तुटीचे वित्तीय तुतीशी प्रमाण, एकूण कर्जाचे जी. डी. पी. शी प्रमाण याचा मागील काही वर्षातील कल | | | | | | |
| वर्ष | कर जी.डी. पी. प्रमाण / गुणोत्तर | महसुली तुटीचे जी.डी.पी. शी प्रमाण | वित्तीय तुटीचे जी.डी.पी. शी प्रमाण | प्राथमिक तुटीचे जी.डी.पी. शी प्रमाण | महसुली तुटीचे वित्तीय तुटीशी प्रमाण | एकूण कर्जाचे जी.डी.पी. शी प्रमाण |
| २००७-०८ | ११.०६ | १.४ | २.७ | - ०.९ | ४१.४ | ५६.९ |
| २००८-०९ | १०.४३ | ४.५ | ६.० | २.६ | ७५.२ | ५६.१ |
| २००९-१० | ९.६ (मंदी) | ५.१ | ६.३ | ३.१ | ८१.० | ५४.५ |
| २०१०-११ | १०.५३ | ३.५ | ४.८ | १.७ | ६७.५ | ५०.५ |
| २०११-१२ | १०.७८ (RE) | ४.३ | ५.७ | -- | ७५.५ | ४९.८ (RE) |
| २०१२-१३ | १०.५४ (BE) | ३.६ | ४.८ | १.८ | ६८.२ | ४९.५ (BE) |
| २०१३-१४ BE | -- | ३.३ | ४.८ | १.५ | ०.७० | -- |
| २०१३-१४ RE | -- | ३.० | ३.३ | १.३ | ०.७० | -- |
| २०१४-१५ BE | -- | २.९ | ४.१ | ०.८ | ०.७१ | -- |
| २०१४-१५ RE | ९.८९ | २.९ | ४.१ | ०.८ | ०.७१ | ३४.४३ |
| २०१५-१६ BE | १०.२७ | २.८ | ३.९ | ०.७ | ०.७१ | ३३.७८ |

महसुली तुटीचे जी.डी.पी.शी प्रमाण साधारण पणे ३ ते ५ टक्क्यांच्या दरम्यान आहे, २००९-१० या वर्षातील तुट मागील १० वर्षात सर्वात जास्त आहे त्याचे कारण असे की, जागतिक वित्तीय संकटामुळे भारतावर आलेले मंदीचे संकट होय. जागतिक वित्तीय संकटामुळे अर्थव्यवस्थेला मंदीच्या खाईत जाण्यापासून वाचवण्यासाठी सरकारने वित्तीय तुटीचे समर्थन करून एकूण मागणी वाढवण्याच्या उद्देशाने काही सवलती देण्याचे ठरवले, त्यामुळे एकून खर्च वाढून तूट वाढली गेली. प्राथमिक तुटीबद्दल या अगोदर विश्लेषण केलेले आहेच, ही तुट २००७-०८ या वर्षाकरीता -०.९% होती, याचा अर्थ असा की, २००७-०८ मध्ये वित्तीय तुट भरून काढण्यासाठी घेतलेले कर्ज हे मागील वर्षात घेतलेल्या कर्जावरील व्याज देण्यासाठी सुद्धा पुरेसे नव्हते ही एक गंभीर बाब आहे. महसुली तुटीचे वित्तीय तुटीशी प्रमाण या बाबीचा विचार केला तर साधारणत: हे प्रमाण किमान ४१.४% तर कमाल ८१.०% एवढे आहे. याचा अन्वयार्थ असा की, वित्तीय तुटीचा किमान ४१.४% व कमाल ८१.०% भाग महसुली तुटीमुळे निर्माण झालेला आहे, म्हणजेच वित्तीय तुटीस मोठ्या प्रमाणात महसुली तुट कारणीभूत आहे. तसेच एकूण कर्जाचे (संचित) चालू जी. डी. पी. शी असणारे प्रमाणे ५० ते ५५% आहे, जे चालू वर्षासाठी ३३.७८% आहे.

अर्थमंत्र्यांनी सेवा करात वाढ करून प्राप्ती कराच्या मर्यादेत बदल न करता महसुली प्राप्ती कशी वाढेल यावर भर दिलेला आहे. निगम करामध्ये येत्या चार वर्षात पाच टक्क्याने कमी करण्याची घोषणा करून उद्योग वाढीसाठी प्रेरक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला. वस्तू आणि सेवा कर (GST) प्रणाली साठी उचललेले हे एक पाऊल आहे असे वाटते. या तरतुदीं मुळे खाजगी गुंतवणूक वाढून मंदावलेला औद्योगिक वृद्धी दर वाढेल व रोजगार संधी निर्माण होतील अशी अपेक्षा आहे. सामान्य माणसाला दिलासा मिळेल

अशी कुठलीही तरतूद न करता उद्योग जगताला थोडीशी सवलत दिल्यामुळे सर्वसामान्यांनी या अर्थसंकल्पाबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. खरे पाहता आंतरराष्ट्रीय पातळीवर घटत जाणारे तेलाचे भाव, कमी झालेला महागाई दर, कमी झालेली चालू खात्यावरील तूट, कोळसा खाणीच्या लिलावातून मिळालेले भरभरून उत्पन्न व वाढलेली परकीय गंगाजळी या पार्श्वभूमीवर सर्वसामान्यांना दिलासा देणारा अर्थसंकल्प मांडता आला असता पण तसे न करता दीर्घकालीन धोरणाचा भाग म्हणून बचतीला चालना देणारा, उत्पादकतेत वाढ करण्याच्या दृष्टीने कौशल्य विकासावर भर देणारा, रोजगार निर्मितीस प्राधान्य देणारा, अपारंपरिक उर्जा स्त्रोतावर भर देणारा, व शेतीसाठी सिंचन, वित्त व विपणन सुविधा तयार करण्यासाठी प्राधान्य क्रम असणारा अर्थसंकल्प मांडला. विशेष म्हणजे सामाजिक सुरक्षितता व कल्याणाच्या दृष्टीकोनातून प्रधानमंत्री सुरक्षा विमा माध्यमातुन योजना ज्याच्या माध्मातून वार्षिक फक्त १२ रुपये मध्ये २ लाखाचा विमा घेता येतो. तसेच महिला सुरक्षिततेसाठी रु. १००० कोटी चा निर्भया निधी निर्माण केला हे एक वेगळेपण दाखऊन दिले. अपारंपरिक उर्जा स्त्रोताच्या माध्यमातून १,७५,००० मेगा वैट विज निर्मितीचे लक्ष निर्धारित करूण २४ तास वीजेच्या आश्वासन पूर्ततेसाठी पाऊले उचललेली आहेत असे म्हणता येईल. या अर्थसंकल्प मध्ये कोणाला खुश करण्यासाठी न्हवे तर धोरणात्मक निर्णय घेतले गेले आहेत असे वाटते.

अंदाजपत्रकातील तरतुदीचा आर्थिक चलनांवर होणाऱ्या परिणामाचा विचार केला असता, असे लक्षात येईल की, हे अंदाजपत्रक दीर्घकालीन शाश्वत विकासाची नांदी आहे. एकूण मागणी बरोबर एकूण पुरवठा (वस्तू व सेवांचा) यात समतोल साधण्यासाठी खाजगी बचतीला चालना मिळेल अशा तरतुदी करण्यात आल्या आहेत. ज्या मुळे एकूण बचत वाढून बचतीचे रुपांतर गुंतवणुकीत झाल्यास भांडवल निर्मिती होऊन पुरवठ्याची बाजू मजबूत होईल. परिणाम देशांतर्गत भांडवल निर्मिती वाढेल व व्यक्तिगत बचत वाढल्यामुळे त्यांचे आर्थिक भविष्य सुरक्षित होईल. सुवर्ण रोखे निर्माण करून सोन्यातील गुंतवणुकीचे मौद्रीकिकरण करण्याचा प्रयत्न केला आहे, ज्यामुळे सोन्यातील गुंतवणुकीचे फायदे गुंतवणूकदारांना मिळतील तसेच चलन पुरवठा वाढून व्याजाचे दर कमी होतील, त्यामुळे सुद्धा काही प्रमाणात गुंतवणुक वाढून पुरवठ्याची बाजू भक्कम होईल. सेवा कराचा दर १२.३६% वरून १४% करण्यात आला आहे. त्या मागची भूमिका राष्ट्रीय उत्पन्नामध्ये सेवा क्षेत्राचा हिस्सा वाढत आहे त्या प्रमाणात करप्राप्ती मध्ये सुद्धा सेवा क्षेत्राचा हिस्सा वाढून समतोल निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे असे दिसते. आधारभूत संरचना निर्मिती साठी भरघोस तरतूद करून पायाभूत सुविधा विकासीत करण्यासाठी आपले सरकार कटिबद्ध असल्याचे सुतोवान्त अर्थमंत्र्यानी केले. जन धन योजनेच्या माध्यमातून सर्वसमावेशक वृद्धीची संकल्पना आकारास आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याच बरोबर स्वच्छ भारत अभियानांतर्गत ५० लाख शौचालये बांधून तयार झाली असतांना, येत्या वर्षात ६ कोटी शौचालये बांधण्याचे लक्ष निर्धारित करून स्वच्छ व सुंदर भारत निर्मितीचा संकल्प केलेला दिसतोय. पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी visa-on-arrival कार्यप्रणाली १५० देशासाठी लागु करण्यात येईल त्यामुळे पर्यटकांच्या संख्येत वाढ होऊन रोजगार संधी व परकीय गंगाजळीत वाढ होईल. तरुणांची कौशल्य पातळी वाढवण्यासाठी राष्ट्रीय कौशल्य मिशन निर्मितीची घोषणा अर्थमंत्र्यांनी करून 'मेक ईन इंडिया' मोहिमेसाठी लागणाऱ्या कुशल श्रमिकांची फौज तयार करण्याची व्यवस्था केली आहे. काळा पैसा भारतात परत आणण्यासाठी कडक कायदे कण्याचे संकेत देऊन स्थावर मालमत्तेच्या बेकायदा व्यवहाराला लगाम घालण्यासाठी बेनामी मालमत्ता व्यवहार कायदा करण्याचे सांगून प्रामाणिक लोकांसाठी चांगले दिवस येतील असा संदेश अर्थमंत्र्यानी दिलेला आहे. अर्थमंत्र्यांनी संरक्षण क्षेत्रासाठी २.४६ लाख कोटी रुपयांची तरतूद केली आहे, जो एकूण अंदाजपत्रकीय खर्चाच्या १३.८८% आहे. शेजारी देशांच्या संशयास्पद हालचाली, शस्त्रास्त्र व दारूगोळ्यासाठी चे आयातीवरील अवलंबित्व हे संरक्षणावर होणाऱ्या वाढीव

खर्चाचे कारण आहे. यावर उपाय महणून ''मेक ईन इंडिया ईन डिफेन्स'' धोरणाची पायाभरणी करुन शस्त्रास्त्र व दारूगोळ्याचे आयाती वरील अवलंबित्व कमी करण्याबरोबरच निर्यात वाढीसाठी यशस्वी प्रयत्न करण्याचा मानस सरकारचा दिसून येतो. त्याच बरोबर महसुली तुटीचे जी. डी.पी. शी. प्रमाणाचे लक्ष २.८% व वित्तीय तुटीचे जी. डी. पी. शी. प्रमाण ३.६% ठेवण्यासाठी प्रमाणबद्ध असल्याचे सांगितले. जे की सहज साध्य करता येणे शक्य आहे, या धोरणात्मक प्रयत्नांचा भाग म्हणून इंधन, अन्नधान्य व खाते यावरील अनुदानात ७५ कोटी रुपयांची कपात करण्यात आलेली आहे.

त्याच बरोबर उत्पन्न वाढवण्यासाठी प्राप्ती कराच्या मर्यादेत कोणताही बद्दल न करता अर्थमंत्र्यांनी सेवा करातील वाढी बरोबरच सेवा कराची व्याप्ती वाढवणे आवश्यक होते. अधिक सेवा क्षेत्राच्या जाळ्यात येण्याची गरज होती. कारण भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये सेवा क्षेत्राचा हिस्सा ५.५% आहे पण हे क्षेत्र कर संकलनामध्ये फक्त ९% हिस्सा नोंदवते, या मध्ये वाढ होणे गरजेचे आहे. सेवा क्षेत्राच्या वृद्धीचा परिणाम सरकारी महसूल वाढी वर झाला पाहीजे. तरच वित्तीय शिस्त व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायद्याने ठरवून दिलेली लक्ष्य साध्य करता येतील.

एकंदरीतपणे असे म्हणता येईल की, मा. अर्थमंत्र्यांनी हा अर्थसंकल्प लोकांची वाहवा मिळवण्यासाठी मांडलेला नसून त्यामध्ये दीर्घकालीन शाश्वत विकासासाठी पायाभरणी करण्याच्या उद्देशाने मांडलेला आहे. अल्पकालीन दृष्टीकोनातून पाहिल्यास व मला काय मिळाले दृष्टीने पाहिल्यास कोणालाही हा अर्थसंकल्प विषेश वाटणार नाही. मुळात हा अर्थसंकल्प कोणाला खुश करण्यासाठी मांडलेलाच नाही. तर येत्या काही वर्षात चांगले दिवस आणण्यासाठी उचलले एक पहिले पाऊल आहे.

**शिवकुमार बिरादर** *हे हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापुर येथे प्राध्यापक आहेत.*
*संपर्कासाठी ईमेल* - shiv21biradar@gmail.com

## प्रकाशन विभागाची नवी पुस्तके

१. व्हर्ल्ड ऑफ थिन फिल्म कोटिंग्स (इंग्रजी) ₹ ९०/-

२. तिलक का मुकदमा (हिंदी) ₹ ३३५/-

३. राजभाषा (हिंदी) ₹ १००/-

१. एक देश एक हृदय (हिंदी)

२. उपभोक्ता संरक्षण (हिंदी)

३. पऱ्यावरण संरक्षण : चुनौतिया और समाधान

## आगामी अंक

**एप्रिल २०१५**
**'निर्मिती क्षेत्र'**
**या विषयावर असेल.**

**मे २०१५**
**'पर्यटन क्षेत्र'**
**या विषयावर असेल.**

**जुन २०१५**
**'पर्यायी (पुरक) औषधे**
**या विषयावर असेल.**

# भारताचे रुपांतर जागतिक उत्पादन केंद्रात करताना...

**अमिताभ कांत**




**वर्ष २००६ ते २०१२ च्या जागतिक आर्थिक मंदीचे परिणाम सर्वत्र दिसुन आले झपाटयाने आर्थिक विकास होणाऱ्या राष्ट्राच्या यादीत भारताची समावेश झाला ब्रिक्स देशांनी निर्माण केलेले आश्वासक वातावरण विरुन गेले होते. सर्वाधिक मोठी लोकशाही असलेल्या भारतात गुंतवणुक ही संधी ठरेल की, जोखिम अशी शंका गुंतवणुकदारांच्या मनात निर्माण होत होती. एकदर संरक्षण सामुग्री आयातीच्या वाढता आलेख विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीतील अडथळे आणि मर्यादा लक्षात घेऊन तसेचं देशांतर्गत उद्योग निर्मितीला प्रोत्साहन दिल्यास 'तरुण उद्योगकांचा 'मेक इन इंडिया' ला उंदड प्रतिसाद या दृष्टीने पंतप्रधान मोदी यांनी या योजनेची घोषणा सप्टेबर २०१४ मध्ये केली. या योजनेत उद्योग निर्मितीची विविध क्षेत्रे व त्यासाठी केलेली अंदाजपत्रकीय तरतुदीची माहिती देण्यात आली आहे.**

**इंट्रो** : मेक इन इंडिया भारतात गुंतवणुकीचे दरवाजे खुले करत आहे. अनेक व्यवसाय या मंत्राचा स्वीकार करत आहेत. जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आता जगातील सर्वात शक्तीशाली अर्थसत्ता होण्याच्या मार्गावर आहे.

राष्ट्र उभारणीच्या व्यापक पुढाकारांचा एक भाग म्हणून सप्टेंबर २०१४ मध्ये मेक इन इंडिया या कार्यक्रमाची पायाभरणी झाली.भारताचे रुपांतर जागतिक उत्पादन केंद्रात करण्याच्या उद्देश्याने त्याची रचना करण्यात आली आहे. बिकट परिस्थितीला मेक इन इंडिया हा एक योग्य वेळेला दिलेला प्रतिसाद आहे. २०१३ पर्यंत, खूप गाजावाजा करण्यात आलेल्या उभरत्या बाजारपेठांचा बुडबुडा फुटला होता. भारताच्या विकास दराने दशकातील सर्वात खालची पातळी गाठली होती. ब्रिक्स देशांनी निर्माण केलेले आश्वासक वातावरण विरून गेले होते. तथाकथित नाजुक पाच देशांचा शिक्का भारतावरही बसला होता. जगातील सर्वात मोठा लोकशाही देश ही संधी आहे की जोखीम, यावर जागतिक गुंतवणूकदारांची चर्चा सुरू होती.भारताच्या विशालत्वामुळे देशाला यश मिळणार की अपयश झेलावे लागेल, असा प्रश्न देशाचे एक अब्ज २० कोटी नागरिक विचारू लागले होते. तीव्र आर्थिक अपयशाच्या काठावर भारत होता.

## प्रक्रिया

या गंभीर पेचप्रसंगाच्या पार्श्वभूमीवर मेक इन इंडिया कार्यक्रम सुरू करण्यात आला. आणि त्वरित देशातील असंख्य गुंतवणूकदार आणि व्यावसायिकांसाठी कळकळीने मारलेली ती हाक ठरली.देशाचे नागरिक आणि उद्योजक तसेच जगभरातील संभाव्य भागीदार व गुंतवणूकदारांसाठी कृती करण्याची ती शक्तीशाली आणि चैतन्यपूर्ण साद होती. परंतु मेक इन इंडिया ही प्रेरणादायी घोषणेशिवाय आणखीही खूप काही आहे. कालबाह्य प्रक्रिया आणि धोरणांचा सर्वसमावेशक आणि अभूतपूर्व फेरआढावा घेण्याचा हा कार्यक्रम प्रतिनिधित्व करतो. सर्वात महत्वाचे म्हणजे, मेक इन इंडिया सरकारच्या मानसिकतेत झालेल्या संपूर्ण बदलाचे प्रतिनिधित्व करतो - किमान सरकार, कमाल प्रशासन या सरकारच्या तत्वानुसार व्यावसायिक भागीदाराला अधिकार देण्यात झालेला बदल हा आहे.

## योजना

एखादी चळवळ सुरु करण्यासाठी सारख्याच प्रमाणात प्रेरणा देणारे, सक्षम करणारे आणि समर्थ करणारे अशा डावपेचात्मक धोरणाची गरज असते. मेक इन इंडियासाठी वेगळ्या प्रकारच्या जाहिरातीची गरज होती : नेहमीच्या वर्तमानपत्रांमध्ये आकडेवारीने भरलेल्या

जाहिरातींऐवजी माहिती देणारा, उत्तम बांधणी केलेला आणि सर्वात महत्वाचे म्हणजे विश्वासार्ह असा संदेश देणे आवश्यक होते. त्यामुळे खालील गोष्टी साध्य होणे आवश्यक होते १) परदेशातील संभाव्य भागीदार, भारतातील व्यावसायिक आणि नागरिकांमध्ये भारताच्या क्षमतांबद्दल विश्वास पैदा करणे, २) २५ उद्योग क्षेत्रांवरील प्रचंड प्रमाणातील तांत्रिक माहितीसाठी चौकट पुरवणे आणि ३) विशाल प्रमाणावर असलेले देशातील तसेच जागतिक ग्राहकांपर्यंत सोशल मीडिआच्या माध्यमातून पोहचणे आणि त्यांना सातत्याने संधी, सुधारणा वगैरेबाबत अद्ययावत माहिती देत राहणे.

औद्योगिक धोरण व प्रोत्साहन विभागाने अत्यंत विशेषज्ञ असलेल्या अशा संस्थांबरोबर काम करुन नवी कोरी पायाभूत सुविधा उभारली ज्यात एका समर्पित सहाय्यता केंद्र आणि मोठ्या प्रमाणावर असलेली माहिती सुटसुटीत व साध्या पद्धतीने साठवणूक करणाऱ्या मोबाईल फर्स्ट वेबसाईटचा समावेश होता. २५ सप्टेंबर २०१४ रोजी नवी दिल्लीत उद्योग क्षेत्रातील देशांतर्गत व जागतिक धुरीण, धोरण ठरवणारे सामर्थ्यशाली आणि माध्यमांच्या उपस्थितीत मेक इन इंडियाचे उद्घाटन करण्यात आले. त्यासोबतच एक सर्वसमावेशक डिजीटल धोरणही ठरवण्यात आले, ज्यामुळे सोशल मीडिआ, टीव्ही आणि वर्तमानपत्रांमध्ये याबाबत मोठ्या प्रमाणावर स्वारस्याची लाटच उसळली.

उद्घाटनानंतर या 'मेक इन इंडियाने' जगभरात एक तास लक्ष वेधून घेतले. ४८ तासांत मेक इन इंडिया ९ कोटी ४० लाख नागरिकांपर्यंत पोहचले होते आणि एक अब्ज ८ लाख इतका प्रभाव होता व ९९ हजार वेळा त्याचा उल्लेख झाला. ३१ जानेवारी २०१५ पर्यंत मेक इन इंडियाला तब्बल तीस लाख फेसबुकवर चाहते मिळाले होते आणि प्रत्येक तीन सेकंदाला नवा चाहता जोडला जात होता. ट्विटरवर प्रत्येक ३२ सेकंदाला @MakeinIndia_ ला नवा चाहता मिळतो आणि makeindia.com वर ५० लाख ६७ हजार लोकांनी भेट दिली आहे.

## भागीदारी

मेक इन इंडिया हा कार्यक्रम सहयोगी प्रयत्नांच्या थरांवर तयार करण्यात आला आहे.

डीआयपीपीने केंद्रीय मंत्री, भारत सरकारचे सचिव, राज्य सरकारे, आघाडीचे उद्योगपती आणि -ज्ञान क्षेत्रातील अनेक भागीदार यांना सहभागाचे निमंत्रण देऊन ही प्रक्रिया सुरू केली आहे.

त्यापुढचे पाऊल म्हणजे, डिसेंबर २०१४ मध्ये झालेल्या विशिष्ट क्षेत्रांतील उद्योगांवरील राष्ट्रीय कार्यशाळेने, २०२० पर्यंत उत्पादन क्षेत्राचा सकल राष्ट्रीय उत्पादनातील वाटा २५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याच्या उद्देश्याने पुढील तीन वर्षासाठी चर्चा करुन कृती योजना ठरवण्यासाठी सरकारचे सचिव आणि उद्योगपतींना एकत्र आणले. ही कृती योजना पंतप्रधान, केंद्राचे मंत्री, उद्योग संघटना आणि उद्योगपतींना भारत सरकारचे सचिव आणि राज्य सरकारांच्या वतीने महाराष्ट्र सरकारच्या मुख्य सचिवांनी सादर केली.

या प्रयोगांच्या परिणामी अलिकडच्या इतिहासात कोणत्याही देशाने घेतला नसेल असा उत्पादन क्षेत्रातील सर्वात विशाल उपक्रम हाती घेण्यासाठी एक आराखडा विकसित झाला. परिवर्तन घडवून आणण्याच्या सार्वजनिक-खासगी भागीदारीच्या सामर्थ्याचे दर्शनही यातून घडले तसेच मेक इन इंडिया कार्यक्रमाचा तो शिक्काच बनला आहे. भारताच्या वैश्विक भागीदारांना समाविष्ट करण्यासाठी परस्पर सहकार्याच्या या मॉडेलचा विस्तार करण्यात आला असून अलिकडेच भारत आणि अमेरिका यांच्यात झालेली सखोल चर्चा हा त्याचाच पुरावा आहे.

## प्रगती

अत्यंत थोड्या कालावधीत, पूर्वीच्या कालबाह्य झालेल्या आणि अडथळा ठरणाऱ्या चौकटी तोडून टाकल्या गेल्या असून त्यांची जागा आता पारदर्शक आणि उपभोक्तास्नेही अशा व्यवस्थेने घेतली आहे ज्यामुळे गुंतवणुकीची मोहीम, नाविन्यपूर्ण संशोधनाला उत्तेजन, कौशल्य वृद्धी, आयपीचे संरक्षण आणि अत्यंत दर्जेदार असे उत्पादन पायाभूत सुविधा तयार करण्यासाठी मदत होत आहे. प्रगतीचा सर्वात चित्तवेधक निर्देशक लक्षण म्हणजे रेल्वे, संरक्षण, विमा आणि वैद्यकीय उपकरणे यांसारखी क्षेत्रे थेट परकीय गुंतवणुकीला अभूतपूर्वरित्या खुली झाली आहेत, हेच आहे.

मेक इन इंडिया-क्षेत्रनिहाय दृष्टीकोन आणि पुढाकार या नावाची कार्यशाळा २९ डिसेंबर २०१४ रोजी घेण्यात आली.त्यात २५ क्षेत्रांमध्ये गुंतवणूक वाढवण्यासाठी एक कृतीयोजना तयार

करण्यात आली. जागतिक बँकेच्या व्यवसाय करण्याच्या शास्त्राच्या अनुसार जागतिक बँकेच्या गटाबरोबर सुधारणेस वाव असलेली क्षेत्रे सुनिश्चित करण्यात सध्या मंत्रालय गुंतले आहे. विविध नियामक संस्थांकडून परवानग्या मिळवणे, गुंतवणूक पूर्व टप्प्यातील सेवा पुरवणे, अंमलबजावणी आणि नंतरची मदत याबाबत गुंतवणूकदारांना साह्य करण्यासाठी मेक इन इंडिया मोहिमेला सर्मपित अशी ८ सदस्यीय सुलभ गुंतवणूक शाखा सप्टेंबर २०१४ मध्ये स्थापन करण्यात आली.

सुनिश्चित केलेल्या क्षेत्रांतील गुंतवणुकीच्या क्षमतांबाबत परदेशातील भारतीय वकिलाती आणि दूतावासांना योग्य ती माहिती प्रसारित करण्याचे निर्देश देण्यात आले.जपानमधून आलेले जलद गुंतवणुकीच्या प्रस्तावांचे सुलभीकरण करण्यासाठी डीआयपीपीने एक विशेष व्यवस्थापन पथक तयार केले. जपान प्लस या नावाचे हे पथक ऑक्टोबर २०१४ पासून कार्यान्वित झाले आहे.

संरक्षण, रेल्वे, अंतराळ संशोधन यासारखी विविध क्षेत्रे गुंतवणुकीसाठी खुली झाली आहेत. तसेच गुंतवणूक आणि व्यवसाय करणे सुलभ होण्याच्या दृष्टीने नियामक धोरणेही बरीचशी शिथिल करण्यात आली आहेत.

संपूर्ण देशभरात सहा औद्योगिक विभाग (corridors) विकसित करण्यात आहेत.या औद्योगिक विभागांसोबतच औद्योगिक शहरेही तयार करण्यात येत आहेत.

### मेक इन इंडियाचे शंभर दिवस

- जनधन योजनेमुळे ९ कोटी बँक खाती उघडण्यात आली आहेत.
- व्यवसायात प्रवेश आणि बाहेर पडण्याच्या अटी शिथिल करण्यात आल्या आहेत, आयातनिर्यात नियमने अत्यंत सुटसुटीत करण्यात आली, पाच आजारी सार्वजनिक उद्योग बंद करण्यात आले आहेत.
- औद्योगिक परवाना आणि औद्योगिक व्यवसाय कागदपत्रांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आली आहे. ईबिझ ही वेबसाईट चोवीस तास सुरू असून त्यामुळे अर्ज भरणे आणि सेवा कराचा ऑनलाईन भरणा अगदी सोपा होऊन गेला आहे.
- औद्योगिक परवान्याच्या प्रारंभिक वैधता कालावधी दोन वर्षांवरून तीन वर्षे करण्यात आला असून त्यामुळे व्यवसाय करू इच्छिणाऱ्यांना जमिन व आवश्यक ती कागदपत्रे मिळवण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला आहे. गृह व्यवहार मंत्रालयाने तर औद्योगिक परवाना अर्जांवरील सुरक्षा मंजुरी १२ आठवड्याच्या आत देण्याचे वचनही दिले आहे.
- कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना (ईपीएफओ) आणि कर्मचारी राज्य विमा महामंडळ (ईएसआयसी) यांच्याकडे नाव नोंदणी करण्यासाठी लागणारा विलंब हा एक मोठा अडथळा होता. आता या दोन्ही प्रक्रिया स्वयंचलित करण्यात आल्या असून ईएसआयसी नोंदणी क्रमांक आता योग्य वेळेत दिला जातो.
- परवानाप्राप्त संरक्षण उद्योगासाठी सुरक्षा नियमावली नुकतीच जारी करण्यात आली आहे.

### वाहन क्षेत्र (automobiles)

- सर्वात मोठ्या ट्रॅक्टरचे उत्पादन, दुसऱ्या क्रमांकाच्या मोठ्या दुचाकीचे उत्पादन, दुसऱ्या क्रमांकाच्या मोठ्या बसचे उत्पादन, पाचव्या क्रमांकाच्या मोठ्या अवजड ट्रकचे उत्पादन, सहाव्या क्रमांकाच्या मोठ्या कारचे उत्पादन, आठव्या क्रमांकाच्या मोठ्या व्यावसायिक वाहनांचे उत्पादन हाती घेण्यात आले आहे.
- भारतीय कार बाजारपेठेची क्षमता - २०१० पर्यंत वार्षिक ६० लाख कार.

### वाहनांचे सुटे भाग (auto components)

- ३५ हून अधिक ग्लोबर ओईएम आणि टायर भारतातून अधिग्रहित केले जात आहेत.
- शेजारी स्पर्धकांवर मात करून भारत चौथ्या क्रमांकाचा पोलाद उत्पादक देश बनला आहे.
- एसियन (ASEAN), जपान, कोरिया आणि युरोप यांसारख्या प्रमुख बाजारपेठांशी निकटची जवळीक साधल्यामुळे अर्थव्यवस्थेची व्याप्ती वाढण्यास साह्य झाले आहे.

### विमान वाहतूक

- भारतात जगातील नवव्या क्रमांकाचे विशाल विमान वाहतूक क्षेत्र असून मूल्यस्वरूपात त्याची व्याप्ती १२ अब्ज डॉलर्स इतकी आहे.
- २०२० पर्यंत जगातील तिसऱ्या

क्रमांकाचे आणि २०३० पर्यंत जगातील सर्वात मोठे विमान वाहतूक क्षेत्र बनण्याची क्षमता.

**जैंव तंत्रज्ञान**

- जगातील १२ सर्वोच्च जैवतांत्रिक देशांमध्ये समावेश: आशिया पॅसिफिक भागात तिसऱ्या क्रमांकाचा देश
- सरकारी खर्चाची योजना - २०१२ ते २०१७ या कालावधीत तीन अब्ज ७० कोटी अमेरिकन डॉलर्स खर्च केले जाणार असून जैवतांत्रिक उत्पादन विकास, संशोधन आणि नाविन्यपूर्ण कल्पना राबवण्यासाठी बायोटेक पार्क उभारण्यावर भर दिला जाणार आहे.

**रसायने**

- रासायनिक उत्पादनाच्या बाबतीत आशियातील तिसऱ्या क्रमांकाचा आणि जगातील सहाव्या क्रमांकाचा देश.
- भारताचा रंग उद्योग : सहा अब्ज ८० कोटी अमेरिकन डॉलर्स आणि सुमारे ७५ टक्के निर्यात.
- वाढीचे मुख्य घटक : विशाल लोकसंख्या, कृषीवर अवलंबित्व, निर्यातीची जोरदार मागणी.

**बांधकाम व्यवसाय**

- पुढील वीस वर्षांत, नागरी पायाभूत सुविधांसाठी ६५० अब्ज अमेरिकन डॉलर्सची आवश्यकता.
- गुंतवणुकीच्या संधी : निवासी, व्यापारी, घाऊक आणि हॉटेल व्यवसाय.
- शाश्वत शहरे आणि एकात्मिक वसाहतींना प्रोत्साहन देण्यासाठी तंत्रज्ञान तसेच हरित प्रदेश तयार करण्याचे तोडगे.

भारतातील बांधकाम व्यवसायातील परदेशी गुंतवणुकीचे नियम शिथील करण्यात आले आहेत. : किमान बिल्टअप क्षेत्र आणि किमान भांडवलाची आवश्यकता घटवली आहे.

**संरक्षण उत्पादन**

- थेट परदेशी गुंतवणुकीची ताजी माहिती : सरकारी मार्गाने ४९ टक्के थेट परदेशी गुंतवणुकीला परवानगी आणि ४९ टक्क्यांपेक्षा अधिक गुंतवणूक जेथे आधुनिक आणि स्टेट ऑफ द आर्ट तंत्रज्ञान मिळवण्यासाठी करायची असेल तर केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सुरक्षा विषयक समितीची मंजुरी अनिवार्य.
- खासगी क्षेत्र उत्पादित करत असलेल्या ५३ टक्के संरक्षण उत्पादनांची परवाना पद्धत काढून टाकली असून लष्करी आणि नागरी अशा दोन्ही उपयोगाच्या उत्पादनांसाठी विनियमन हटवण्यात आले आहे.
- रोखे आणि एफव्हीसीआयद्वारे (परदेशी व्हेंचर कॅपिटल संस्था) स्वयंचलित मार्गाने एकूण २४ टक्के गुंतवणुकीला परवानगी.

**विद्युत यंत्रे**

- मागणीचे प्रणेते : पायाभूत सुविधा, उर्जा, खाण, तेल व वायु, तेल शुद्धीकरण, पोलाद, वाहन आणि ग्राहकोपयोगी वस्तुंच्या उत्पादनाची क्षमता निर्माण करणे.
- २०२२ पर्यंत वीज उपकरणे निर्मिती उद्योग २५ ते ३० अब्ज अमेरिकन डॉलर्स इतका वाढण्याचा अंदाज.

**इलेक्ट्रॉनिक यंत्रणा**

नॅशनल नॉलेज नेटवर्क, नॅशनल ऑप्टिकल फायबर नेटवर्कसारख्या सरकारी योजनांच्या साह्यामुळे २०२० पर्यंत अपेक्षित मागणी तब्बल ४०० अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत जाण्याची शक्यता.

दहा वर्षांपर्यंत २५ टक्के भांडवली सवलतीसारखी आकर्षक प्रोत्साहक पॅकेज योजना.

**अन्न प्रक्रिया**

- कृषी साधनसामग्रीचा समृद्ध पाया
- फुड पार्कची स्थापना - परदेशी गुंतवणूकदारांसह व्यावसायिकांना अनोखी संधी
- फळे व भाजीपाला, फळांचे रस, दुग्धोत्पादन, मांस आणि चिकन, मासळी, समुद्री खाद्य आणि मत्स्य प्रक्रिया, अन्न टिकवून ठेवणे आणि पॅकेजिंग आदीमध्ये गुंतवणुकीच्या संधी.

**आयटी आणि बीपीएम**

- देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पादनाच्या (जीडीपी) ८.१ टक्के योगदान आयटी-बीपीएम क्षेत्राचे आहे. तसेच सार्वजनिक कल्याणात महत्वाचा वाटा आहे.
- आपल्या सेवांची चाचणी घेण्याकरता ६० टक्के कंपन्या भारताचा वापर करतात.
- २०२० पर्यंत आयटी आणि बीपीएम क्षेत्राचे महसुली उत्पन्न ३०० अब्ज डॉलर आणि निर्यात २०० अब्ज

अमेरिकन डॉलरपर्यंत विस्तारित करण्याचे उद्दिष्ट २०१२च्या राष्ट्रीय माहिती तंत्र-ज्ञान धोरणात जाहीर केले आहे.

### चामडे

- देशांतर्गत विशाल बाजारपेठ आणि निर्यातीच्या जोरदार क्षमतेसह एकूण उत्पादन मूल्य ११ अब्ज अमेरिकन डॉलर.
- दरवर्षी २४ टक्के वाढ अपेक्षित.
- आवश्यक त्या पायाभूत सुविधा आणि आधारभूत सेवांसह चामडे उद्योगासाठी नवी उत्पादन केंद्रे तयार करण्याच्या दृष्टीने विशाल चामडे समूह उपयोजना.

### माध्यमे आणि करमणूक

- उद्योगातील सीएजीआर १४.२ टक्के इतका नोंदला जाण्याची अपेक्षा असून २०१८ पर्यंत आयएनआर १७८५.८ अब्जांपर्यंत जाण्याची शक्यता.
- भारतीय चित्रपट उद्योगाचा आकार २०१८ पर्यंत २१९.८ अब्ज जाण्याची अपेक्षा असून २०१३ मध्ये तो १२५.३ अब्ज होता.

खाण उद्योग

- भारताकडे विशाल खनिज संपत्ती असून २० ते ३० वर्षांपर्यंतच्या दीर्घकाळापर्यंत खाणीतून उत्खननाचे भाडेतत्वाचे कराराला संमती देण्यात आली आहे.
- अंदाजित वाढ : ७ टक्के

### तेल आणि वायु

- उद्योगातील गुंतवणुकीस प्रोत्साहन देण्यासाठी उत्खननासाठी नवे परवाना धोरण आणि खाणीतील तळापर्यंत जाऊन मिथेनच्या उत्खननाचे धोरण.
- देशातील ४८ टक्के तळाचा भाग अद्यापही उत्खननापासून दूरच राहिला आहे. शहरातील वायु वितरण क्षेत्र प्रस्थापित आणि नव्या अशा दोन्ही कंपन्यांना संधी खुली करते.

### औषधी क्षेत्र

- २०२० पर्यंत वधिष्णु होत जाणाऱ्या वाढीच्या संदर्भात जगातील सर्वोच्च तीन देशांत भारताचा क्रमांक लागण्याची अपेक्षा.
- २०१६ पर्यंत सक्रीय औषध घटकांसाठी जगातील तिसरी मोठी बाजारपेठ होण्याची शक्यता असून बाजारपेठेतील वाटा ७.२ टक्के इतका वाढण्याची अपेक्षा आहे.

### बंदरे

- बंदरावरील मालाच्या चढउतार हाताळण्याची क्षमतेत वाढ - २००९ मध्ये ५७५ दशलक्ष मेट्रिक टनवरून २०१४ मध्ये ८०० दशलक्ष मेट्रिक टन
- व्यावसायिक उलाढाल आणि बंदरांसाठी पायाभूत सुविधांच्या विकासातील खासगी क्षेत्राच्या सहभागात वाढ
- किनारपट्टीवरील राज्यांत बंदरप्रणित विकासाच्या उद्देश्याने सागरमाला प्रकल्पाची योजना
- अनेक बंदरांच्या अत्यंत जवळ विशेष आर्थिक क्षेत्रे विकसित करण्यात येत असून कोळशावर आधारित उर्जा प्रकल्प, पोलाद प्रकल्प आणि तेल शुद्धीकरण प्रकल्पांचा समावेश.

### रेल्वे

- रेल्वे पायाभूत सुविधा क्षेत्रात १०० टक्के थेट परदेशी गुंतवणुकीला परवानगी
- प्राधान्य : बंदरांना जोडणे
- पायाभूत सुविधा प्रकल्प : अतिवेगवान रेल्वे प्रकल्प, कोळसा खाणी आणि बंदरांपासून रेल्वेमार्ग, मालवाहतुकीसाठी मार्ग

### रस्ते आणि महामार्ग

- ४० लाख ८६ हजार किलोमीटर इतके व्यापक रस्त्यांचे जाळे : जगातील दुसऱ्या क्रमांकाचे विस्तारित जाळे
- खासगी क्षेत्र : रस्ते पायाभूत सुविधांच्या विकासात प्रमुख भूमिका
- विविध कार्यक्रमांच्या अंतर्गत देशात ६६,११७ किमी. चे रस्ते विकसित करण्याचे भारत सरकारचे उद्दिष्ट
- अक्षय्य उर्जा
- २०१४ च्या अखेरीस ३३,७९२ मेगावॉट स्थापित अपारंपरिक उर्जा क्षमतेसह एकूण अपारंपरिक उर्जा क्षमतेबाबत भारताचा जगात पाचवा क्रमांक
- अपारंपरिक उर्जेचे प्रमाण १६५ मेगावॉटने वाढवण्याची भारताची योजना असून त्यापैकी सौर उर्जा २०१९-२० पर्यंत १०० गिगावॉटपर्यंत जाण्याची शक्यता.
- झपाट्याने होणारा मूल्यऱ्हास, निर्मितीवर आधारित प्रोत्साहन, व्यवहार्यतेतील अंतर भरून काढण्यासाठी दिला जाणारा निधी यासह सरकारने घेतलेल्या प्रमुख

धोरणात्मक निर्णयांमुळे अपारंपरिक उर्जा क्षेत्रात प्रचंड गुंतवणूक होण्याची अपेक्षा.

### अंतराळ संशोधन

कमीत कमी खर्चात अंतराळ संशोधन करण्यात भारत हा जगात अग्रगण्य आहे. भारतीय अंतराळ संशोधन कार्यक्रम हा जगातील सर्वात किफायतशीर असल्याचे स्पष्ट झाले आहे. भारताच्या मंगळावर स्वारीसाठी सात कोटी ४० लाख डॉलर इतका खर्च आला असून जगातील इतर देशांनी हाती घेतलेल्या मंगळ संशोधन मोहीमांसाठी केलेल्या खर्चाचा हा फक्त अंश आहे.

- ३० भारतीय आणि ४० परदेशी उपग्रहांचे प्रक्षेपण भारताने केले असून जगाला उपग्रह प्रक्षेपणाची सेवा देण्याची क्षमता भारतात आहे. १९ देशांसाठी भारताने ४० उपग्रहांचे प्रक्षेपण केले आहे.

### वस्त्रेद्योग व तयार कपडे

- भारताकडे जगातील दुसऱ्या क्रमांकाची उत्पादन क्षमता
- भारताकडे सर्वोच्च यंत्रमाग क्षमता (हातमागासह) असून जागतिक बाजारपेठेत ६३ टक्के वाटा
- इतर प्रमुख वस्त्रनिर्मिती करणाऱ्या देशांपेक्षा कुशल मनुष्यबळ आणि उत्पादन खर्चाच्या बाबतीत भारताकडे तुलनात्मक रित्या चांगल्या सुविधा आहेत.
- २०२५ पर्यंत भारताची वस्त्रांची निर्यात ३०० अब्ज अमेरिकन डॉलर इतकी जाईल, असा अंदाज आहे.

### औष्णिक उर्जा

२०१२-१७ पर्यंत ८८.५ गिगावॉट आणि २०१७-२२ या कालावधीत ८६.४ गिगावॉटची अतिरिक्त निर्मिती क्षमता आणण्याचे सरकारचे

### उद्दिष्ट

- वाढत्या लोकसंख्येमुळे उर्जेची मागणी वाढण्याची शक्यता
- गुंतवणुकीच्या संधी : वीज निर्मिती, पारेषण आणि वितरण, विजेचा व्यापार आणि विनिमय

### पर्यटन

- २०१४मध्ये भारतात परदेशी पर्यटक येण्याचे प्रमाण ७.१ टक्क्यांवरून ७.५ टक्क्यांपर्यंत वाढले
- पर्यटन वाढीला चालना देणारे घटक म्हणजे व्यवसायाचे केंद्रित मार्केटिंग आणि व्यवसायवाढीचे प्रयत्न, हवाई वाहतुकीचे उदारीकरण, ऑनलाइन प्रवासी वेबसाईट्सची संख्या वाढवणे, वाढते आंतरप्रादेशिक सहकार्य आणि अधिक परिणामकारक खासगी-सार्वजनिक सहभाग
- पर्यटन मंत्रालयाच्या अर्थसंकल्पातील अर्ध्याहून अधिक भाग हा पर्यटनस्थळांचा विकास, परिक्रमा, महाप्रकल्प तसेच ग्रामीण भागात पर्यटनाच्या पायाभूत सुविधा पुरवण्यासाठी दिला गेला आहे.
- वेलनेस makeinindia.com
- दरवर्षी २० टक्क्यांनी हे क्षेत्र वाढत असून २०१४ मध्ये १६२ आयएनआर इतका त्याचा आकार जाण्याची अपेक्षा
- आयुर्वेद, योगा, निसर्गेपचार, युनानी, सिद्ध आणि होमिओपथी यांचे मंत्रालय सरकारने स्थापन केले असून प्राचीन आरोग्य चिकित्सा पद्धतीना मुख्य प्रवाहात घुसवण्याचा उद्देश्य यामागे आहे.

आज भारताची विश्वासार्हता कधी नव्हे इतकी मजबूत आहे. देशात आज दृष्य गती, उर्जा आणि आशावाद आहे. मेक इन इंडिया गुंतवणुकीची दालने खुली करत आहे. अनेकविध व्यवसाय या मंत्राचा स्वीकार करत आहेत. जगातील सर्वात मोठी लोकशाही आज जगातील सर्वात शक्तीशाली अर्थसत्ता बनण्याच्या मार्गावर वेगाने घोडदौड करत आहे.

(facebook.com/ makeinindiaofficial twitter.com/ makeinindia_youtube .com/ MakeInIndiaOf?cial)

(E-mail:amitabh.kant@nic.in)

चौकट.....

मेक इन इंडिया अर्थसंकल्प २०१५-१६

- रोजगार निर्मितीसाठी देशांतर्गत उत्पादन क्षेत्रात गुंतवणूक आणि वाढीचे पुनरुज्जीवन
- व्यवसाय करण्यासाठी करव्यवस्थेचे सुलभीकरण
- व्यवसाय सुरू करण्याआधी लागणाऱ्या पूर्वपरवान्यांची जागा सुलभ पद्धतीने घ्यावी, याची शक्यता पडताळून पाहून मसुदा तयार करण्यासाठी तज्-ांची समिती

- सीमा शुल्कातील उलटफेरांमुळे होणारा परिणाम कमीत कमी करण्यासाठी व विविध क्षेत्रांतील उत्पादन खर्च  कमी करण्यासाठी २२ कच्च्या मालाच्या किंमतींवरील सीमा शुल्कात कपात केली आहे.
- फंड व्यवस्थापकांनी भारतात अधिकाधिक गुंतवणूक करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहन म्हणून प्राथमिक निकषांत सुधारणा.
- करचुकवेगिरीला प्रतिबंध करणारे विधेयक (General Anti Avoidance Rule) दोन वर्षे लांबणीवर. १ एप्रिल २०१७ ला किंवा त्यानंतर केलेल्या गुंतवणुकीलाच लागू करण्याचा निर्णय
- तंत्र-ज्ञानाचा ओघ भारतात सुलभरित्या येण्याच्या दृष्टीने तांत्रिक सेवांच्या रॉयल्टी व शुल्कावरील प्राप्तीकरात २५ टक्क्यावरून १० टक्के इतकी कपात
- आरईआयटी (रिअल इस्टेट इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट) च्या स्वत:च्या मालमत्तेवरील भाडे सुविधेंतर्गत येणार

चौकट....

सत्यमेव जयते

अशोक चक्र हे राष्ट्रीय प्रतीकचिन्हातील मध्यवर्ती घटक असून भारताच्या राष्ट्रध्वजावरील मध्यवर्ती स्थानी आहे. चक्र हे भारताच्या दिव्य अशा इतिहासातील शांततापूर्ण प्रगती आणि चैतन्यशीलता दर्शवते आणि उज्वल भविष्याची दिशाही स्पष्ट करते.

अत्यंत प्राचीन काळापासूनच सिंह हे भारताचे राष्ट्रीय प्रतिकचिन्ह राहिले आहे. त्याचा अर्थ मजबुती, धैर्य, दृढता आणि बुद्धीमत्ता असा आहे जी मूल्ये नेहमीच इंच न इंच भारतीयांसाठी राहिली आहेत.

अमिताभ कांत : लेखक भारतीय प्रशासकीय सेवेचे सदस्य असून (केरळ केडर: १९८०ची बॅच) सध्या औद्योगिक धोरण व प्रोत्साहन (डीआयपीपी) खात्याचे केंद्रात सचिव आहेत. पायाभूत सुविधा उभारणे, आंतरराष्ट्रीय मार्केटिंग, पर्यटन व हॉटेल उद्योग यात त्यांचा व्यापक अनुभव आहे. भारताच्या पर्यटन क्षेत्रात वैविध्य आणण्यासाठी त्यानी मोठ्या पायाभूत प्रकल्पांची रचना केली असून आशियाई विकास बँक, जॅपनीज बँक फॉर इंटरनॅशनल को-ऑपरेशन आणि यूएनडीपीकडून आंतरराष्ट्रीय निधीसाठी उपलब्ध केला आहे. राष्ट्रीय वृत्तपत्रे आणि नियतकालिकांतून त्यानी व्यापक लेखन केले आहे.


***अमिताभ कांत*** *हे भारतीय प्रशासकीय सेवेचे सदस्य असुन औद्योगिक धोरण व प्रोत्साहन खात्याचे केंद्रात सचिव आहेत.*



# चलनवाढ लक्ष्य प्रणाली

## चलनवाढ नियंत्रणात ठेवणारी जुनीच पण स्वीकार्ह प्रणाली.

- भावना गोखले




**''नियंत्रीत चलनवाढ'' हे देशाच्या विकासासाठी सकारात्मक चिन्ह असुन भारतात आतापर्यंत जागतिक बाजार व देशीय आंतरराष्ट्रीय बाजारानुसार किंमत नियंत्रीत ठेऊन परिस्थितीजन्य चलनवाढ नियंत्रण धोरण अवलंबिले जायचे. भारताच्या इतिहासात प्रथमचं रिझर्व बँकेचे गव्हर्नर रघुराम राजन यांनी नवीन चलनवाढ लक्ष प्रणाली अवलंबिली आहे. येत्या सलग तीमाहीतील चलनवाढ २ टक्क्यांपेक्षा कमी किवां ६ टक्क्यांपेक्षा जास्त राहिल्यास रघुराम राजन यांना सरकारने चलनवाढ कमी जास्त का? याबाबतची कारणे व उपाय योजना सुचवाव्या लागतील व कठोर मापदंड अवलंबावे लागतील. सरकारने तसेच रिझर्व बँकेने आपआपल्यापरिने चलनवाढ नियंत्रीत राखण्यासाठी उपाय योजले आहेत त्या योजनांची अमंलबजावणी ही केली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेढेतील तेलाच्या किंमती, आंतरराष्ट्रीय सहसंबंध हे सर्व घटक राजन यांच्या प्रणालीला पाठिंबा देतील की नाही हे येणारा काळचं ठरवेल.**

भारताच्या इतिहासामध्ये प्रथमच रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर रघुराम राजन यांनी 'चलनवाढ लक्ष्य प्रणाली'चा अवलंब केला. जर तीन सलग तिमाही मध्ये चलनवाढ दर ६% पेक्षा जास्त आणि २% पेक्षा कमी राहिल्यास राजन यांना सरकारला स्पष्टीकरणात्मक पत्र देऊन चलनवाढीत घट किंवा वृध्दीची कारणे विषद करावी लागतील. तसेच चलनवाढ आटोक्यात आणण्यासाठीचे प्रयत्न किंवा उपाय योजना ठरवून सरकारला कळवाव्या लागतील. या प्रणालीमुळे विशिष्ट कालमर्यादेमध्ये चलनवाढ रोखण्याचे लक्ष्य साध्य करण्यास मदत होणार आहे.

नजिकच्या भविष्यात जर किंमती थोड्याशा जरी वाढल्या आणि ग्राहकांना काही सवलती बहाल केल्या तर खरेदीला प्रोत्साहन मिळेल; आणि त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेतील व्यवहारांना गती मिळण्यात होईल, तिला मजबुती येईल. चलनवाढीचा दर कमीतकमी आणि स्थिर राहण्यासाठी अनेक केंद्रीय बँकांनी आपले धोरण निश्चित केले असून याच धोरणाला 'चलनवाढ लक्ष्य प्रणाली' असे संबोधले जाते. अशा प्रकारची 'चलनवाढ लक्ष्य प्रणाली' जगभरामधील अनेक राष्ट्रांमध्ये अवलंबिली जात असल्याचे, रिझर्व्ह बँकेचे माजी गर्व्हनर चक्रवर्ती रंगराजन यांनी नमूद केले आहे.

गेल्या पंधरवड्यात केंद्रीय वित्तमंत्र्यांनी संसदेमध्ये अंदाजपत्रक सादर केले. देशाच्या पतधोरणाच्या चौकटीविषयी रिझर्व्ह बँक आणि केंद्रीय बँका यांच्यामध्ये एक नवीन करार करण्यात आला आहे. त्यामुळे आता सगळेच नियम बदलले असून, चलनवाढीला केवळ सरकारच जबाबदार असणार नाही. तर बँकांनाही त्याची जास्त जबाबदारी घ्यावी लागणार आहे. अर्थात चलनवाढीचे निश्चित केलेले लक्ष्य गाठण्यासाठी बँकांनाही प्रयत्न आणि उपाय योजना कराव्या लागणार आहे. यंदाच्या आर्थिक वर्षात, जानेवारी १६ पर्यंत चलनवाढीचा दर सहा टक्क्यांपेक्षा कमी करण्याचे उद्दिष्ट्य रिझर्व्ह बँकेने निश्चित केले आहे. तर २०१६-१७ आणि त्यानंतरच्या वर्षामध्ये ६.२ टक्क्यांपर्यंत चलनवाढीचा दर अपेक्षित धरण्यात आला आहे. अर्थात चलनवाढीच्या दराचे लक्ष्य निश्चित केल्यामुळे किंमती अजिबातच वाढणार नाहीत, असे ठामपणे म्हणता येणार नाही, असेही रंगराजन यांनी स्पष्ट केले

आहे. कारण किंमतींच्या वृद्धीसाठी इतर अनेक घटक कारणीभूत असतात. स्थावर मालमत्तेच्या किंमतीवर इतका सहजपणे अंकूश ठेवणे शक्य नसते. मात्र लक्ष्य निश्चित केल्याप्रमाणे जर चलनवाढीचा दर राहिला तर व्याजदरामध्ये नक्कीच कपात होईल. तसेच चलनवाढीचा दर अपेक्षेपेक्षा कमी राहिला तर किंमती अजिबात वाढणार नाहीत, असेही म्हणता येणार नाही.

यंदाच्या वर्षी सरकारने ४ टक्के चलनवाढीचा दर असावा, असे उद्दिष्ट निश्चित केल्याचे वित्तमंत्री अरूण जेटली यांनी लोकसभेत सांगितले आहे. देशाच्या दृष्टीने हा एक चांगला संकेत आहे. कारण भारताने चलनवाढीचा दर ४ टक्क्यांपर्यंत आणला तर भारत लवकरच विकसित देशांच्या पंगतीमध्ये जाऊ शकणार आहे. जागतिक बाजारपेठेत मंदीची लाट आली आणि आर्थिक संकट ओढावले, तेव्हापासूनच भारताने जलद आर्थिक विकास मार्ग अवलंबिला आहे.

कोणत्याही अर्थव्यवस्थेची तब्येत किंवा प्रकृती कशी आहे, हे नेमकेपणाने समजण्यासाठी चलनवाढीचा दर फार महत्वाची भूमिका पार पाडत असते. जर एखाद्या देशाचा चलनवाढीचा दर खूपच जास्त असेल तर ती अर्थव्यवस्था लवकरच कोलमडणार असल्याचे संकेत मिळतात. परंतु सातत्याने कमी किंवा माफक चलनवाढ होत असेल तर खरेदीशक्तीमध्ये झपाट्याने घट होऊ लागते आणि व्यवसायामध्ये अनिश्चिततेचे वातावरण निर्माण होते. अशावेळी भविष्यातील किंमतींचा अंदाज बांधणे खूपच कठीण होते. चलनवाढीचा उच्चदर नेहमीच उच्च व्याजदराशी निगडीत असतो, आणि व्याजदरामध्ये वृद्धी झाली तर ,खरेदीची शक्ती कमी होते त्याचबरोबर पुढच्या काळात व्याज तसेच मुद्दलही परतफेड करण्यात अडचणी निर्माण होतात. अर्थात याची परिणिती एकूणच किंमतवृद्धीमध्ये होते.

## चलनवाढीमुळे काय होते?

चलनवाढीचा नियमित उच्चदर हा पतधोरणाच्या अपयशाला कारणीभूत ठरू शकतो. पैशाच्या पुरवठ्याची आणि प्रमाणाची वृद्धी ही अर्थव्यवस्थेच्या आकारमानावर अवलंबून असते आणि त्यावरच चलनाची किंमत कमी-जास्त होत असते. हेच थोडे वेगळ्या शब्दात सांगायचे झाले तर म्हणता येईल की, जर किंमती वाढल्या तर खरेदीशक्ती कमी होईल. पैशाचा पुरवठा आणि अर्थव्यवस्थेचे आकारमान यांच्यातील संबंधाला 'पैशाचे गुणात्मक शास्त्र' असे म्हटले जाते. अर्थशास्त्रामधील हे सर्वात जुने गृहितक आहे.

अर्थव्यवस्थेतील मागणी आणि पुरवठा यांचा दबाव हा घटकाचा सुद्धा चलनवाढीवर फार मोठा परिणाम होत करतो. पुरवठ्याला धक्का बसला की, उत्पादनाची गडबड होते. नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा उत्पादनमूल्य वाढल्यामुळे हे चक्र बिघडू शकते. अगदी साधे उदाहरण म्हणजे तेलाच्या, इंधनाच्या किंमती वाढल्या तर एकूणच पुरवठ्यावर परिणाम होऊन किंमतवृद्धीमुळे चलनवाढ होते.जागतिक बाजारपेठेचा विचार केला तर अशा प्रकारच्या चलनवाढीला २००८ ते २०११ या काळात सर्वांनाच सामोरे जावे लागले होते. अन्नधान्य आणि इंधन यांच्या व्यापार व्यवहारामध्ये आंतर-राष्ट्रीय पातळीवर मोठ्या प्रमाणावर चलनवाढ झाली होती. या चलनवृद्धीच्या झळा प्रगत देशांपेक्षा गरीब देशांना तुलनेने जास्त बसल्या. किंमतीच्या वाढीमुळे मागणी कमी झाली. अशावेळी मध्यवर्ती बँकांनी आपले व्याजदर कमी केल्यामुळे परिस्थिती सुधारण्यास मदत झाली. अशाप्रकारे मागणी वाढविण्यासाठी जर अर्थव्यवस्थेमध्ये विशेष प्रयत्न केले गेले तर त्याला मागणीप्रधान चलनवाढ असे म्हणतात. अर्थव्यवस्थेमध्ये विनाकारण चलनवाढ होऊ नये, अशाप्रकारच्या योजना तज्ज्ञांनी निर्माण करण्याची आवश्यकता आहे. सरकार आणि रिझर्व बँक यांना चलनवाढ रोखण्यासाठी आपआपल्या पातळीवर निर्णय घ्यावे लागतात.

चलनवाढीमध्ये 'अपेक्षा' हा घटक महत्वाची भूमिका बजावतो. वेतनवृद्धीबाबत ज्यावेळी सरकारशी चर्चा केली जाते त्यावेळी तसेच कराराच्या तत्वावर त्याचबरोबर भाडेवृद्धीविषयी करार केला गेला तर त्याचा परिणाम चलनवाढीवर होतो. म्हणजेच जर माणसांनी आणि संस्थांनी फार मोठ्या अपेक्षा ठेवल्या तर चलनवाढ अटळ असते. म्हणूनच वेतनवृद्धीचे करार काही प्रमाणात का होईना किंमतवृद्धीशी संलग्न ठेवणे गरजेचे आहे. त्यामुळे अपेक्षांची पूर्तता आपोआपच होण्यास मदत मिळेल. लोकांच्या अपेक्षा अलिकडच्या मागच्या काळाशी संबंधित असतात; त्यामुळे त्याचे परिणामही तसेच मिळत असतात.

## भारताच्या चलनवाढीचा तपशील (%)

| वर्ष | २००९ | २०१० | २०११ | २०१२ | २०१३ |
|---|---|---|---|---|---|
| चलनवाढ दर(ग्राहक किंमत निर्देशांक टक्केवारी) | १२.२ | १०.६ | ८.४ | १०.४ | ९.७ |

जागतिक चलनवाढीचा विचार केला तर सन २०००मध्ये हा दर अगदीच माफक होता. २००० ते २००७ या आठ वर्षांच्या कालावधीमध्ये जागतिक चलनवाढीचा दर सरासरी ३.९टक्के प्रतिवर्ष असा होता. अगदी उदयोन्मुख आणि विकसनशिल देशांचा चलनवाढीचा दर परंपरेनुसार उच्च म्हणजे सरासरी ६.७टक्के प्रतिवर्ष इतका होता. घाऊक किंमत निर्देशांकानुसार भारताचा चलनवाढीचा दर ५.२टक्के होता. आणि ग्राहक किंमत निर्देशांकानुसार ४.६७टक्के होता. सन २००८ मध्ये जागतिक मंदीचा काळ आला आणि त्याची झळ सर्वच अर्थव्यवस्थांना बसली. यामध्ये विकसित देश आणि उदयोन्मुख तसेच विकसनशिल देशांना वस्तू आणि तेलाच्या प्रचंड वाढलेल्या किंमतीला तोंड द्यावे लागले.

भारतामध्ये सन २००७-०८ मध्ये ४.७ ते ८.१ टक्क्यांपर्यंत चलनवाढीच्या दरामध्ये वृद्धी झाली होती.आणि त्यानंतर सन २००९-१० मध्ये चलनवाढीचा दर एकदम ३.८टक्क्यांपर्यंत खाली आला होता. यानंतरच्या वर्षात चलनवाढीच्या दराने दोन अंकी आकडा गाठला होता, आणि त्यानंतर मात्र सन २०१२-१३ मध्ये हा दर जरा माफक राहिला आहे.

## जागतिक चलनवाढ- सरासरी दर

| जगतिक चलनवाढ | 2000-07 | 2008 | 2009 | 2010 | 2011 | 2012 | सरासरी 2008-2012 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जागतिक | 3.9 | 6.0 | 2.4 | 3.7 | 4.9 | 4.0 | 4.2 |
| उदयोन्मुख आणि विकसनशिल देश | 6.7 | 9.3 | 5.1 | 6.1 | 7.2 | 6.1 | 6.8 |


## भारतातील चलनवाढ

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| घाऊक किंमत निर्देशांक | 5.2 | 8.1 | 3.8 | 9.6 | 8.9 | 7.6 | 7.6 |
| अन्नधान्य घाऊक किंमत निर्देशांक | 3.8 | 8.9 | 14.6 | 11.1 | 7.2 | 9.1 | 10.2 |
| अकृषि आणि औद्योगिक निर्मिती घाऊक किंमत निर्देशांक | 4.3 | 5.7 | 0.2 | 6.1 | 7.3 | 5.2 | 4.9 |
| औद्योगिक कामगारांचा ग्राहक किंमत निर्देशांक | 4.6 | 9.1 | 12.2 | 10.5 | 8.4 | 9.9 | 10.0 |

सन २००९, २०१० आणि २०१२ मध्ये भारताचा चलनवाढीचा दर पाहता अर्थव्यवस्थेला धोका असल्याचा इशारा चीनच्या रिझर्व्ह बँकेने दिला होता. अनेक देशांना उच्च चलनवाढीच्या मगरमिठीतून सुटका कशी करून घ्यावयाची असा प्रश्न या काळात निर्माण झाला होता.

भारताच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने सप्टेंबर २०१४ मध्ये ६.४६टक्के चलनवाढीचा वार्षिकदर गृहीत धरला होता. जून २०११मध्ये हाच दर ९.६ टक्के होता, तो कमी करण्यासाठी 'आदर्श दर' भारताने निश्चित केला. भारतामध्ये चलनवाढीचे मोजमाप साधारणपणे सर्व वस्तुंच्या घाऊक किंमत निर्देशांकावर केले जाते. सप्टेंबर २०१२ मध्ये आणि त्यानंतर ऑक्टोबरपासून सलग पाच महिने चलनवाढीचा दर ७.३ टक्क्यांच्या आसपास राहिला. त्यानंतर मार्च २०१३ मध्ये तो ५.७ टक्क्यांपर्यंत घसरला. चलनवाढीचा दर कमी होण्यास आणि अर्थात वाढण्यास काही महत्वाचे घटक कारणीभूत असतात. यामध्ये इंधनाच्या किंमतीमध्ये होणारे बदल, देशभरात काही ठिकाणी कमी-जास्त आणि उशिरा झालेला पाऊस. देशात काही ठिकाणी अगदी दुष्काळी परिस्थिति तर काही ठिकाणी अतिवृष्टी-पूरस्थिती... त्यामुळे अन्नधान्याच्या किंमतीवर त्याचा परिणाम होतो. जागतिक बाजारपेठेतही किंमती कमी-जास्त होत राहिल्या. मार्च १३ मध्ये जागतिक बाजारपेठेत किंमती उतरल्यामुळे चलनवाढीचा दर कमी होऊ शकला. अकृषि आणि औद्योगिक निर्मिती

उत्पादनाच्या पूरवठ्याचा परिणामही चलनवाढीच्या दरावर होतो.




**ग्राहक किंमत निर्देशांकामध्ये झालेले बदल -- वार्षिक टक्केवारी.**

भारतामध्ये जानेवारी २०१५ मध्ये अन्नधान्य चलनवाढीचा दर ६.०६ टक्के नोंदवला गेला. मात्र हाच दर डिसेंबर २०१४ मध्ये ४.७८टक्के होता. भारतात सन २०१२ पासून सन २०१५ पर्यंत अन्नधान्य चलनवाढीचा सरासरी दर ९.९६ टक्के आहे. हाच सर्वाधिक दर नोव्हेंबर २०१३मध्ये १४.७२ टक्के नोंदवला गेला तर सर्वात कमी म्हणजे ३.१४ टक्के नोव्हेंबर २०१४ मध्ये नोंदवला गेला.


## वेगवेगळ्या देशांच्या चलनवाढीची टक्केवारी कालावधी- नोव्हेंबर २०१४ ते जानेवारी २०१५.


| देश | महिना/ वर्ष | चलनवाढ दर | मागीलवर्षाची | सर्वात जास्त | सर्वात कमी |
|---|---|---|---|---|---|
| ऑस्ट्रेलिया | नोव्हेंबर१४ | 1.70 | 2.30 | 23.90 | -1.30 |
| ब्राझिल | फेब्रवारी२०१५ | 7.70 | 7.14 | 6821.31 | 1.65 |
| कॅनडा | जानेवारी१५ | 1.00 | 1.50 | 21.60 | -17.80 |
| चीन | जानेवारी१५ | 0.80 | 1.50 | 28.40 | -2.20 |
| युरोपचा भाग | फेब्रवारी१५ | -0.30 | -0.60 | 5.00 | -0.70 |
| फ्रान्स | जानेवारी११५ | -0.40 | 0.10 | 18.80 | -0.70 |
| जर्मनी | फेब्रवारी,१५ | 0.09 | -0.40 | 11.54 | -7.62 |
| भारत | जानेवारी१५ | 5.11 | 5.00 | 11.16 | 4.38 |
| इंडोनेशिया | फेब्रवारी, १५ | 6.29 | 6.96 | 82.40 | -1.17 |
| इटली | फेब्रवारी, १५ | -0.19 | -0.60 | 25.64 | -0.60 |
| जपान | जानेवारी१५ | 2.40 | 2.40 | 25.00 | -2.52 |
| मेक्सिको | जानेवारी १५ | 3.07 | 4.08 | 179.73 | 2.91 |
| नेदरलँड | फेब्रवारी, १५ | 0.14 | 0.00 | 11.19 | -1.30 |
| रशिया | फेब्रवारी, १५ | 16.70 | 15.00 | 2333.30 | 3.60 |
| दक्षिण कोरिया | फेब्रवारी, १५ | 0.50 | 0.80 | 32.50 | 0.20 |
| स्पेन | फेब्रवारा, १५ | -1.10 | -1.30 | 28.43 | -1.37 |
| स्वित्झर्लंड | फेब्रवारी, १५ | -0.80 | -0.50 | 11.92 | -1.37 |
| तुर्की | फेब्रवारी, १५ | 7.55 | 7.24 | 138.71 | -4.01 |
| इंग्लंड | जानेवारी१५ | 0.30 | 0.50 | 8.50 | 0.30 |
| अमेरिका | जानेवारी१५ | -0.10 | 0.80 | 23.70 | -15.80 |

सन २०१० ते २०१३ या सलग तीन वर्षात सातत्याने चलनवाढीचा दर जास्त राहिल्यानंतर मार्च २०१३ च्या पहिल्या तिमाहीमध्ये घाऊक किंमत निर्देशांक ५.७ टक्क्यांपर्यंत खाली आला. तर या निर्देशांकाची सरासरी ९.८ टक्क्यांवरून ४.७ टक्क्यांपर्यंत खाली आली. सन २०१२-१३ च्या पहिल्या सहामाहीमध्ये उत्पादित वस्तुंची चलनवाढ सरासरी ७.२ टक्के होती. मधल्याकाळात ही सरासरी ८.१ टक्क्यापर्यंत वाढली. आणि नंतर मात्र ऑगस्ट२०१२ मध्ये दोन टक्क्यांनी कमी झाली. घसरती चलनवाढ म्हणजे उत्पादनामध्ये माफक वृद्धी आणि किंमती कमजोर पडणे होय. वित्तीय धोरणानंतर ज्या उपाय योजना सुरू करण्यात आल्या, त्याचा अपेक्षित परिणाम दिसण्यास सुरूवात झाली.

## २०१४-२०१५ च्या चलनवाढीवर एक दृष्टिक्षेपः

एप्रिल-मे २०१४ च्या ग्राहक किंमत निर्देशांक सातत्याने ८ टक्क्यांच्या वर राहिल्यानंतर जून २०१४ मध्ये तो ७.५ टक्क्यांवर आला. मात्र जुलै २०१४ मध्ये भाज्यांचे दर चांगलेच कडाडले त्यामुळे चलनवाढीच्या दराने पुन्हा ८ टक्क्यांची उंची गाठली. या दरवाढीला मोसमी पावसाने दिलेला फटका कारणीभूत होता. देशात काही ठिकाणी अतिपूरस्थिती निर्माण झाली तर काही ठिकाणी दुष्काळ पडला. त्याचा परिणाम भाज्या, फळे त्याचप्रमाणे प्रथिनेयुक्त पदार्थ म्हणजे, अंडी, मासे, मांस, दूध, डाळी यांच्या किंमती २०१४-१५च्या पहिल्या तिमाहीमध्ये प्रचंड प्रमाणावर वाढल्या. ग्राहक किंमत निर्देशांकामध्ये अन्नधान्य आणि इंधन यांच्या चलनवाढीचा समावेश असतो. मात्र जुलै २०१४मध्ये महागाई थोडी कमी झाली. आणि किंमत निर्देशांक ७.४टक्के झाला.





चलनवाढीला कारणीभूत ठरणाऱ्या घटकांमध्ये देशात होणारे पर्जन्यमान त्याचबरोबर राजकीय स्थैर्य हे महत्वाचे मुद्दे आहेत. सरकारच्या आर्थिक धोरणांमुळे बँकांच्या वाढत्या 'एन.पी.ए.' अर्थात अनुत्पादित मालमत्तेचा परिणामही चलनवाढीवर मोठया प्रमाणावर होतो. यासंदर्भात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने काही सांख्यिकी सर्व्हेक्षणे केली आहेत. आणि त्याआधारावर वित्तीय धोरणांची निश्चिती केली आहे. यामध्ये औद्योगिक दृष्टिक्षेप सर्व्हेक्षण, तसेच गुंतवणुकदारांना प्रोत्साहन देणाऱ्या योजनांसाठी पाहणी, भांडवलाच्या उपयोगितेविषयीचे सर्व्हेक्षण आणि सर्वात महत्वाचे म्हणजे चलनवाढीविषयीच्या अपेक्षांबाबतचे सर्वेक्षण यामध्ये बँकांच्या अनुत्पादित मालमत्तेमुळे चलनवाढीला चालना मिळत असल्याचे निर्दशनास आले आहे. या पाहणीत सामाजिक बचतीचा कल कसा आहे, याचाही अंदाज घेण्यात आला आहे.

चलनवाढीला स्थिरता प्रदान करण्यात विनिमय दर, मोठी महत्वाची भूमिका बजावतो. याचा अनुभव आपल्या देशाने यावर्षी घेतलाच.आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये जून २०१४मध्ये कच्च्या तेलाचे दर घटले. त्यावेळी इंधनाचे ११० अमेरिकी डॉलर प्रति बॅरल होते.

त्याचबरोबर मध्यपूर्वमध्ये, युक्रेनमध्ये राजकीय उलथापालथ झाली, त्याचाही परिणाम इंधनाच्या दरावर झाला. अर्थात भारताला त्याचा फायदाच झाला. भारतामध्ये पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी झाले तरी सरासरी महागाई कमी झाली नाही. मात्र चलनवाढीचा दर नियंत्रणात ठेवणे थोडेफार शक्य झाले. किमान पूरक किंमती कमी झाल्या असत्या तर मोठया प्रमाणावर महागाई कमी होऊ शकली असती.







भारतात फेब्रुवारी २०१५ मध्ये ग्राहक किंमत निर्देशांकानुसार चलनवाढ ५.३७ टक्के राहिली मागील महिन्यात समकालावधीत ती ५.१९ टक्के होती. खाद्यान्नाच्या किंमतीत झालेल्या वृद्धीमुळे ही चलन वाढ झाली.

फेब्रुवारीमध्ये खाद्यान्न व शितपेये किंमती ६.१३ टक्क्यांवरुन ६.७६ टक्यांपर्यंत वाढल्यात फक्त खाद्यान्न निर्देशांक ६.६७ टक्क्यांनी वाढला. (जानेवारी मध्ये तो ६.०६ टक्के होता)

भाज्यांचे भाव जानेवारी १५च्या ९टक्क्यांच्या तुलनेत फेब्रुवारीमध्ये १३.०१ टक्क्यांने असल्याने तसेच फळे ८.९३, दूध ९.२१ टक्के आणि इतर संबंधित खाद्यान्नात वाढ झाल्याने ही चलन वाढ झाली आहे.

जानेवारी २०१५ मध्ये चलनवाढीचा दर ४.३८ टक्क्यांवरून वाढून ५.११टक्के झाला. गेल्या अनेक वर्षांनंतर प्रथमच नोव्हेंबर २०१४ मध्ये चलनवाढीचा दर ४.३८ टक्के इतका खाली आणण्यात सरकारला यश मिळाले होते.

चलनवाढीचा दर कमी असणे आणि त्याचबरोबर तो स्थिर राहणे अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अतिशय हितावह आहे, असे बहुतांश अर्थशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. जर चलनवाढ दर कमी आणि अपेक्षित असेल तर किंमतीबाबत तडजोड करणे आणि व्याजदरामध्ये घट करणे विपर्यस्त परिणाम करणारे ठरू शकते.

आयातीच्या माध्यमातून चलनवाढीला आळा घालण्यासाठी सरकारने उचललेली पावले:

सरकारने गहू, कांदा, डाळी आणि कच्चे पामतेल यांच्यावरीत आयातशूल्क पूर्णपणे संपुष्टात आणले आहे. सरकारने पांढरी तसेच कच्ची साखर आयातशुल्कातून मुक्त केली आहे. आयात केलेल्या डाळी, खाद्यतेल यांची विक्री सवलतीच्या दराने करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

### बंदी आणि अनिवार्य उपाय योजना

काही विशिष्ट कालावधीसाठी सरकारने कांद्याच्या निर्यातीवर संपूर्णत: बंदी घातली आहे. तसेच सरकारने तांदूळ, उडीद डाळ, तूर डाळ यांच्या भविष्यातील व्यापारावर बंदी घातली आहे. खोबरेल तेल आणि जंगली तेल वगळता सर्व प्रकारच्या खाद्यतेलाच्या निर्यातीवर बंदी घालण्यात आली आहे. त्याचबरोबर सरकारने डाळी,खाद्यतेल आणि खाद्यतेलबिया, तांदूळ यांच्या साठेबाजीला आळा घालण्यासाठी माल साठवणुकीची मर्यादा निश्चित केली आहे. सोन्यावरील आयातशूल्कामध्ये सरकारने वाढ केली आहे.

### योजना

देशातील गरीब कुटुंबांसाठी सरकारने ' अंत्योदय अन्न योजना' सुरू केली असून त्या योजनेच्या माध्यमातून अतिशय कमी दरामध्ये तांदूळ आणि गहू यांचे वितरण केले जात आहे.लक्ष्यप्रणित सार्वजनिक वितरण सेवेच्या माध्यमातून अन्नधान्याचा साठा गरीब जनतेसाठी उपलब्ध व्हावा, यासाठी सरकारने मोठ्या प्रमाणावर धान्याची तरतूद केली आहे. तांदूळ आणि गव्हाची मुक्त बाजारपेठेतून विक्रीची योजनाही सरकारने सुरू केली आहे. लाभार्थींना अनुदानाचे थेट हस्तांतरण करण्यात पुढाकारही सरकारने घेतला आहे. लोकांनी सोने खरेदी करण्याऐवजी पैशांची बचत करावी असे सरकारला वाटते.

### धोरण आणि कायदा

अलिकडेच सरकारने अनेक क्षेत्रांमध्ये थेट परकीय गुंतवणुकीला परवानगी दिली आहे. त्याचबरोबर मध्यस्थाला वगळून शेतकरी आणि ग्राहक यांच्यामध्ये थेट व्यवहार कसे होऊ शकतील यासाठी नवीन धोरण सरकारने तयार केले आहे. याचा फायदा म्हणजे शेतकऱ्याला त्याच्या मालाला योग्य किंमत मिळेल आणि ग्राहकालाही थोड्याफार प्रमाणात स्वस्त माल मिळू शकेल. मधल्या दलालाची पायरी वगळली तर किंमत कमी होण्यास मदत मिळणार आहे. मध्य प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यांनी अलिकडेच फळे आणि भाज्या यांच्यावरील बाजारशूल्क पूर्णपणे रद्द केला आहे. यामुळे फळे आणि भाज्या यांच्यावर प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी आणि दुसरीकडे पाठविण्यासाठी खाजगी गुंतवणूकदारांना प्रोत्साहन मिळेल, असे सरकारला वाटते.

### निर्यात/बंदी म्हणजेच अनिश्चितता...

- अन्नधान्याच्या किंमतीमध्ये होणाऱ्या वृद्धीला तोंड देण्यासाठी सरकारने काही धान्यांच्या निर्यातीवर तसेच आयातीवरही निर्बंध घातले आहेत. त्याचबरोबर आयात-निर्यात शुल्कात वाढ आणि घट केली आहे. अर्थात काही विशिष्ट थोड्या कालावधीसाठी ही उपाययोजना फायदेशीर ठरू शकते. मात्र कायमस्वरूपी नाही. कारण सरकारने अशाप्रकारे बंदी जर दीर्घ कालावधीसाठी घातली तर व्यापारी आणि शेतकऱ्यांमध्ये अनिश्चिततेचे वातावरण निर्माण होईल. सरकारच्या धोरणांचा त्यांना अंदाज आला नाही आणि आपण माल निर्यात करू शकणार आहोत की, हे त्यांना नेमके समजले नाही तर अधिक उत्पादन घेण्यास त्यांना प्रोत्साहनच मिळणार नाही. (याचे उत्तम उदाहरण म्हणजे ऊस-साखर आणि कांदा आदींचे देता येईल.) याचा परिणाम रोजगारावर आणि लोकांच्या उत्पन्नावरही होतो अर्थात शेवटी चलनवाढीला बळ मिळते.

### निर्यात बंदी म्हणजेच चालू खात्यातील तूटवृद्धी

- ज्यावेळी सरकार एखाद्या वस्तूच्या निर्यातीवर बंदी घालते, त्यावेळी त्या वस्तूच्या निर्यातीतून मिळणाऱ्या अमेरिकी डॉलरमधील परकीय चलनावर देशाला पाणी सोडावे लागते. याचा परिणाम

देशाच्या चालू खात्यातील घट वाढीस एकप्रकारे चालना मिळते.

- ज्यावेळी चालू खात्यातील घट वाढते त्यावेळी डॉलरच्या तुलनेमध्ये रुपयाचे मूल्य कमी होते. परिणामी आपल्याला जास्त डॉलर देवून कच्चे तेल आयात करावे लागते. देशाला महाग दराने कच्चे तेल घ्यावे लागते. म्हणूनच निर्यात बंदी हा काही कायमस्वरूपी मार्ग स्वीकारून चालत नाही, तर ती एक काही काळासाठी केलेली, तात्पुरती सोय आहे. निर्यात बंदीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेपुढील मुलभूत स्वरुपातील प्रश्न कायमचे प्रश्न सुटणार नाही. याउलट दीर्घ काळाचा विचार केला तर परिस्थिती अधिक वाईट बनू शकते.

## काळा पैंसा आणि सोने खरेदी

- सर्व सरकारी योजना म्हणजे गळती, भ्रष्टाचार असे समीकरण झाले आहे. आणि भ्रष्टाचार म्हणजे काळा पैसा हे एक समीकरण आहे. सोने आणि स्थावर मालमत्ता यामध्ये काळा पैसा हा सर्वात जास्त गुंतवला जातो. हे दुष्टचक्र आहे, आणि त्यावर नियंत्रण राहिले पाहिजे.

- सोन्याला सातत्याने प्रचंड मागणी असते, ती कमी कधीच झालेली नाही. सोने आयातीसाठी जास्त डॉलर खर्च करावे लागतात आणि त्यामुळे चालू खात्यात जास्त तूट निर्माण होते. म्हणजेच परिणामी रूपयाचे डॉलरच्या तुलनेमध्ये अवमूल्यन होते. देशाला कच्च्या तेलासाठी जास्त किंमत मोजावी लागते. अर्थातच पेट्रोल, डिझेलच्या दरामध्ये वाढ होते. आणि अखेरीस चलनवाढ होते.

- सरकारने अबकारी करामध्ये वाढ केली आहे. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणावर सोने खरेदी करताना पॅन कार्ड प्रस्तूत करणे अनिवार्य केले आहे. तसेच सोने आयातीवर निर्बंध घालण्याचा विचारही सरकार करीत आहे. परंतु या उपाययोजनेला देशातील सराफांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. एकूण काय सोने खरेदी कमी केली जावी यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे.

- सोने आयात शुल्कामध्ये अगदी शुल्लक २ते३ टक्के वाढ केल्यामुळे काही काळ्या पैशाची गुंतवणूक सोन्यात करण्याचे प्रमाण कमी झाले, असे अजिबात नाही. एकूण काळा पैसा आणि सोने खरेदी यावर सरकार फार काही करू शकले आहे, असे म्हणता येणार नाही.

थेट परकीय गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा यांचा ताबडतोब परिणाम दिसून येणे अवघड.

- आतापर्यंत तुम्ही जवळपास दहाहजार वेळातरी थेट परकीय गुंतवणुकीविषयी काही ना काही तरी ऐकले असेल. असंख्य परदेशी ब्रँड भारतात येण्यास उत्सुक आहेत. मध्यस्थ नाही त्यामुळे अन्नधान्याच्या किंमती कमी. आणि त्याचप्रमाणे धान्यासाठी शितगोदामे, अन्नप्रक्रिया उद्योग आणि पायाभूत सुविधा यामुळे वाया जाण्याचे प्रमाण कमी होणार हा फायदा थेट परकीय गुंतवणुकीतून होऊ शकतो, असे सरकारचे म्हणणे आहे.

- परंतु हे काही सगळे एका रात्रीमध्ये होणार नाही. सरकारने वॉलमार्टला सोमवारी परवानगी दिली आणि वॉलमार्टने आपले काम मंगळवारपासून सुरू केले,,,,, आणि त्याचा परिणाम बुधवारी चलनवाढ कमी होण्यात झाला.. असे कधीच शक्य नाही. या सगळ्या प्रक्रियेसाठी काही महिने, काही वर्षे लागणार आहेत. मंजुरी, बांधकाम, भाड्याने घेणे, कामगारांना प्रशिक्षण देणे, आणि पुरवठ्याची एक वाहिनी विकसित करणे इत्यादी कामे आहेतच.

## पर्यावरणाचा परवाना

- पर्यावरणाच्या मुद्द्यावरून अनेक कोळसा आणि खनिज प्रकल्पांना परवाने मिळालेले नाहीत.

- याचा परिणाम विद्युत पुरवठ्यावर आणि कच्च्या मालाच्या पुरवठ्यावर झाला असल्यामुळे प्रकल्प उभारणीच्या आणि खर्चात प्रचंड वाढ झाली आहे. अर्थात या कारणानेही चलनवाढ होत आहे.

## आर्थिक सुदृढीकरण

सरकार आता आर्थिकदृष्ट्या सुदृढीकरणाच्या मार्गावर आहे, असे नक्कीच म्हणता येईल. कारण अलिकडेच सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती वाढवल्या त्याचबरोबर अनुदानीत गॅस सिलिंडरांची संख्या कमी केली. यामुळे सरकारने चलनवाढीला चालना दिली आहे.

***भावना गोखले*** *या भारतीय माहिती सेवेच्या अधिकारी असुन सध्या योजना मासिकच्या 'संपादक' म्हणुन कार्यरत आहेत. संपर्कासाठी इमेल -*
bhavanagokhale2404@gmail.com
or myojanadpd@gmail.com

# दृष्टीक्षेपात अर्थसंकल्प

वर्ष २०१५-१६ केंद्रीय अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी अर्थमंत्री अरुण जेटली यांनी संसदेमध्ये आर्थिक सर्वेक्षण २०१४-१५ सादर केले. अर्थमंत्रालयाचे मुख्य आर्थिक सल्लागार अरविंद सुब्रमण्यम यांनी आर्थिक सर्वेक्षण तयार केले असून देशाच्या व्यापक अर्थव्यवस्थेचाव्यापक कल त्यांनी स्पष्ट केला आहे. तसेच या सर्वेक्षणात काही धोरणे सूचविली आहेत.

## आर्थिक वृध्दी

सुधारित अंदाजानुसार २०१५-१६ आर्थिक वर्षात देशाचा विकास दर ८.१ ते ८.५ राहील असे अनुमान २०१४-१५ च्या आर्थिक सर्वेक्षणात वर्तविण्यात आले आहे.

२०१४-१५ या आर्थिक वर्षात देशाचा विकास दर ७.४ टक्के राहील.

आर्थिक वर्षात हाती घेण्यात आलेल्या सुधारणा आणि नियोजित आराखडा यामुळे उच्च विकास दराची अपेक्षा आहे. डिझेलच्या किंमत सरकारी नियंत्रणातून मुक्त केल्यामुळे ऊर्जा उत्पादनावरील करांमुळे तसेच स्वयंपाकाच्या गॅसवर देण्यात येणारे अनुदान थेट लाभार्थींच खात्यामध्ये जमा करण्याच्या राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमामुळे वृध्दीदर वाढण्यास मदत झाली आहे. त्याचबरोबर कोळसा क्षेत्रातील लिलाव करण्यासाठी अध्यादेशाद्वारे मंजुरी देण्यात आली.

संरक्षण आणि इतर क्षेत्रात परदेशी गुंतवणूकची मर्यादा वाढवल्याचा परिणामही विकास दरावर अपेक्षित आहे.

सत्ताधारी सरकारला असणारे स्पष्ट बहुमत आणि पोषक बाहय वातावरणामुळ भारत दोन आकडी विकास दराकडे वाटचाल करु शकतो.

सन २०१४-१५ मध्ये २५७.०७ टन अन्नधान्याचे उत्पादन होईल, असा अंदाज सर्वेक्षणात वर्तवला आहे. कृषि उत्पन्नात ४ टक्के घट दर्शवित असली तरी गेल्या पाच वर्षाची आकडेवारी पाहता ८.५ दशलक्ष टन अन्नधान्य जास्त उत्पादित होईल.

## समग्र आर्थिक व्यवस्थापन

२०१४-१५ मध्ये ढोबळ राष्ट्रीय उत्पादनाच्या ४.१ टक्के वित्तीय तुटीचे लक्ष्य असून ते गाठता येणे शक्य आहे, असे सर्वेक्षणात स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर आर्थिक तूट कमी करुन ती ढोबळ राष्ट्रीय उत्पादनाच्या ३ टक्क्यांपर्यंत आणण्याची सूचना करण्यात आली आहे.

वर्ष २०१४-१५ मध्ये चालू खात्यातील तूट ढोबळ राष्ट्रीय उत्पादनाच्या १.३ टक्के अपेक्षित असल्याचे सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे.

सार्वजनिक खर्चामध्ये दर्जात्मक सुधारणा आर्थिक सर्वेक्षणात सूचविण्यात आली आहे. अनुदानात कपात करण्याची आणि गुंतवणूकीला चालना देण्याची शिफारस सर्वेक्षणात करण्यात आली आहे.

## चलनवाढ

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तेलाच्या किंमतीमध्ये झालेली घसरण आणि सरकारने उचलेली पावले यामुळे आगामी आर्थिक वर्षात ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित चलनवाढ ५ ते ५.५ टक्क्यांच्या दरम्यान राहील, अशी अपेक्षा आहे.

## अनुदानाचे योग्य वितरण

२०१४-१५ च्या एप्रिल-जानेवारी दरम्यान अन्नधान्यावरच्या अनुदानाच्या रकमेत २० टक्के वाढ होऊन ही रक्कम १,०७,००० कोटी झाली.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरित करण्यात येण्ग्रया करोसीनपैकी ४१ टक्के केरोसिन खुल्या बाजारात जाते तर उरलेल्या ५९ टक्क्यांपैकी केवळ ४६ टक्के केरोसिनच गरिबांपर्यंत पोहोचते.

सध्याचे ३.७८ लाख कोटी रुपयांचे अनुदान हा दारिद्रय निर्मुलनासाठी सर्वोत्तम उपाय नाही असे सर्वेक्षणात म्हटले आहे. जेएएम म्हणजे जनधन योजना, आधार आणि मोबाईल क्रमांकाद्वारे राज्यांना, गरिबांपर्यंत अनुदान पोहोचवण्यात सुसूत्रीकरण आणि अचुकपणा आणता येईल.

रोजगार आणि कौशल्य विकास

कौशल्य विकास आणि रोजगार ही अर्थव्यवस्थेपुढची सध्याची मोठी आव्हाने असल्याचे सर्वेक्षणात म्हटले आहे. औपचारिक व्यावसायिक शिक्षणाचा अभाव वैविध्यपूर्ण दर्जाचा अभाव, शिक्षणात मुलांच्या शाळागळतीचे प्रमाण, अपुरी कौशलय पशिक्षण क्षमता, कौशल्याविषयी नकारात्मक संकल्पना, व्यावसायिक अभ्यासक्रमातही उद्योगाला उपयुक्त कौशल्याची कमतरता ही भारतीय मनुष्यबळाच्या सुमार कौशल्य स्तराची मुख्य कारणे आहेत.

## उदयोग आणि व्यापार

रखडलेले प्रकल्प, ढोबळ राष्ट्रीय उत्पादनाच्या ७ टक्के असून त्यातले बरेचसे खाजगी प्रकल्प आहेत. बाजारातल्या स्थितीतला बदल आणि नियामक बज्रुयातले अडथळे ही अनुक्रमे खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातले प्रकल्प रखडण्यामागची कारणे आहेत.

रेल्वेमधील सार्वजनिक गुंतवणूक ढोबळ राष्ट्रीय उत्पादन विकासाला चालना देईल.

भारतासमोर निर्यातीचे आव्हान असल्याचे सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे. गेल्या पाच वर्षात ढोबळ राष्ट्रीय उत्पादनात उत्पादन आणि सेवा निर्यातीचा वाटा स्थिर राहिला आहे.



# प्रगतीच्या दिशेने मार्गक्रमण करणारा रेल्वे अर्थसंकल्प

**- जी. श्रीनिवासन**




**रेल्वे महामंडळामध्ये अन्य देशी-विदेशी संघटनांकडून कुठल्याही प्रकारची गुंतवणुक न करण्यात आल्यामुळे रेल्वे उद्योग विकासला एक प्रकारची खिळ बसली असुन एकाकी भागीदारासारखी गत रेल्वेची झाली आहे. विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीला रेल्वे क्षेत्रात प्रोत्साहन देऊन विविध राज्य सरकारांना विशिष्ट उद्दिष्टांसाठी सहभागी करून घेणे आणि कोळसा, लोह खनिज व सिमेंट यांसारख्या महत्वाच्या वस्तूंची वाहतूक करण्याची पुरेसी क्षमता निर्माण करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांना सहभागी करून घेणे, त्यासाठी बहुपक्षीय आणि द्विपक्षीय संस्था तसेच उचित समन्वय आणि करारातील वाद मिटविण्यासाठी योग्य यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे. या साठी सरकारने इतर देशांशी भागीदारी करून दीर्घकालीन अर्थ सहाय्य आणि तंत्रज्ञान मिळविणे हे उत्साहवर्धक असेल.**

स्वातंत्र्योत्तर काळात संसदेत सादर झालेल्या रेल्वे अर्थसंकल्पात काही मोजक्याच अपवादात्मक रेल्वे मंत्र्यांनी नव्या गाड्यांची घोषणा करणारा सरळधोपट लोकप्रिय अर्थसंकल्प सदर करण्याचा मोह टाळत वेगळी वाट चोखाळण्याचे धाडस केले. गेल्या २६ फेब्रुवारी २०१५ ला सादर झालेला रेल्वे अर्थसंकल्प हे त्याच दिशेने टाकले गेलेले एक अनवट आणि धाडसी पाऊल आहे असे निर्विवादपणे म्हणता येईल. या अर्थसंकल्पात रेल्वे या अतिशय महत्वाच्या साधनाचा विविधांगी विकास साधण्याची योजना आणि भविष्याकडे घेतलेली एक आश्वासक झेप आहे. ८.५६ लाख कोटी एवढ्या मोठ्या रकमेची पाच वर्षांसाठी मध्यम कालावधीची गुंतवणूक योजना,प्रवासी भाड्यात वाढ नाही, मात्र काही वस्तूंवरच्या मालवाहतुकीच्या दरात १० टक्के वाढ, (यात मीठासारखी जीवनावश्यक वस्तू तसेच, घाऊक स्वरूपातील सिमेंट, कोळसा, लोह आणि पोलाद, कच्चे पोलाद, पेट्रोलियम उत्पादने यांचा समावेश नाही) पुढील आर्थिक वर्षासाठीच्या रेल्वे प्रकल्पात प्रवासातल्या दोन थांब्यांच्या अंतरामधे सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न ही या अर्थसंकल्पाची काही वैशिष्ट्ये म्हणता येतील. अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर रेल्वे बोर्डाच्या काही अधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत याविषयी सविस्तर माहिती दिली. या अर्थसंकल्पात, मालवाहतुकीचे दरपत्रक आणि विविध वस्तूंची वर्गवारी करून त्यानुसार काळजीपूर्वक दरवाढीचे टप्पे बदलले गेले आहेत. सुसंगत आणि तर्कशुद्ध पद्धतीने हे दरपत्रक तयार केले आहे. त्यात काही वस्तुंवरचा मालवाहतूक खर्च १० टक्क्यांनी वाढला आहे तर काही वस्तूंचा खर्च पूर्वीपेक्षा कमी झाला आहे. एकूणच मालवाहतुकीतून रेल्वेला अपेक्षित असलेल्या १,२१,४२३ कोटी रुपये उत्पन्नात या दरवाढीमुळे ४००० कोटी रुपये मिळणार आहेत. या दृष्टीने पाहिल्यास ही दरवाढ किरकोळ म्हणावी अशीच आहे, असे या अधिकाऱ्यांनी सांगितले.

रेल्वे मंत्र्यांनी लोकसभेत अर्थसंकल्प सादर करतांना, रेल्वेला 'देशाच्या अर्थव्यवस्थेच्या हृदयात रक्त पुरवठा (उर्जा पुरवठा) करणारं जाळ' अशी सार्थक उपमा दिली. खरं तर, देशातलं उद्योग क्षेत्र आणि लाखो प्रवाशांना सुविधा देणारी रेल्वे आरामदायी सेवा व्यवस्था देऊ शकत नाही, ही दुर्दैवावीच बाब म्हणावी लागेल. रेल्वे प्रवाशांना मिळणा-या सुविधा, एकूणच अतिशय खालावलेली वाईट स्वरूपाची सेवा व्यवस्था या

सगळ्यासाठी, रेल्वे क्षेत्रात अजिबात गुंतवणूक न होणे,' जबाबदार असल्याचं, रेल्वे मंत्र्यांनी या अर्थसंकल्पात ठामपणे लक्षात आणून दिलं आहे. गुंतवणूक नसल्याचा परिणाम म्हणूनच, रेल्वेची वहन क्षमता, सुरक्षा व्यवस्था आणि प्रवासी सेवा, या सर्व बाबतीत रेल्वेची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. या परिस्थितीमुळे रेल्वे व्यवस्था जी देशाच्या उद्योगांची रक्तवाहिनी आहे, ती अतिशय वाईट कार्यक्षमता, किमान प्रवासी आणि माल वाहतूक, अल्प आर्थिक स्त्रोत आणि परिणामी खालावलेले मनोधैर्य अशा मार्गावर अडखळत प्रवास करते आहे.

यामुळेच, रेल्वे मंत्र्यांनी रेल्वेत गुंतवणूक वाढविण्याचे अनेकांगी फायदे आणि परिणाम या अर्थसंकल्पात मांडले आहेत. हे फायदे देशाच्या एकूण अर्थव्यवस्थेलाच देणारे आहेत. रोजगार, पर्यावरणस्नेही आणि शाश्वत विकासाचं ध्येय त्यामुळे निश्चित होणार आहे. सध्या रेल्वेचे पसरलेले जाळे लक्षात घेऊन, आहे त्या मार्गांचीच क्षमता सुधारण्याचा मानस रेल्वेमंत्र्यांनी व्यक्त केला आहे. हे करताना भूसंपादानासारखे प्रश्न येणार नाहीत आणि तुलनेने हे काम छोटे आहे. त्यामुळे या कामात नॅरो गेज चे ब्रॉड गेज मधे रुपांतर, दुहेरीकरण, तिपदरीकरण, विद्युतीकरण अशा सुविधा उभारण्यावर रेल्वेचा भर असेल. यामुळे अशा सर्व आजारी मार्गांवर धावणाऱ्या रेल्वेचा वेग वाढेल, ज्याचे दूरगामी सकारात्मक परिणाम दिसतील. इथे एक बाब नमूद करायची आहे की, एकूण रेल्वे वाहतुकीपैकी बहुतांश वाहतूक ही देशातल्या चार महानगरांना जोडणाऱ्या सहा मार्गावरूनच होते. या च:तुष्कोनात रेल्वेमार्गाचे दाट जाळे झाले आहे. सहाजिकच या सहा मार्गांची वाहतूक क्षमता आता संपली आहे. या मार्गावरच्या सुविधा वाढवून तसेच ईतर ठिकाणी रेल्वे वाहतुकीचे जाळे उभारून इथली वाहतूक घनता कमी करणे आवश्यक आहे. त्याकडेही अर्थसंकल्पात लक्ष देण्यात आले आहे. त्याशिवाय, रेल्वेसेवेच्या मूलभूत सुविधा, प्रवासी सेवा, सुरक्षा अशा सर्व बाबींमध्ये सुधारणा करत, रेल्वेला भविष्यात स्वयंपूर्ण आणि शाश्वत दळणवळण सेवा बनवण्याचे या


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :

**Yojana** : 1 Yr. **Rs. 100/-;** 2 Yrs. **Rs. 180/-;** 3 Yrs. **Rs. 250/-**

(Circle the period of subscription)

DD / MO No. ____________ date ____________

Name (in block letters) : ____________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ____________

PIN : ☐☐☐☐☐☐

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**DD किंवा MO Editor Yojana च्या नावे काढावा.**

अर्थसंकल्पाचे उद्दिष्ट आहे.

या रेल्वे अर्थासंकल्पाचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, आगामी आर्थिक वर्षात विद्युतीकरणाच्या प्रकल्पांमध्ये झालेली भरघोस वाढ ! या आर्थिक वर्षात ४६२ किलोमीटर मार्गाच्या विद्युतीकरणाला मंजुरी मिळाली आहे. मात्र, पुढील आर्थिक वर्षात, म्हणजेच २०१५-१६ तब्बल ६६०८ किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे विद्युतीकरण केले जाणार आहे. आधीच्या वर्षाच्या तुलनेत, ही झेप १३३० टक्क्यांची, अतुलनीय अशीच आहे. देशात सर्वाधिक उर्जा कोळशापासून म्हणजेच औष्णिक विद्युत प्रकल्पातून तयार होते. पर्यावरण स्नेही आणि कमी इंधनाचा वापर या दोन गोष्टींमुळे भारतीय रेल्वे इतर वाहतुकीच्या साधनांच्या तुलनेत स्वस्त आणि किफायतशीर आहे. मात्र या अर्थसंकल्पात प्रवासी आणि मालवाहतूक क्षमता वाढवण्याच्या हेतूने पुढील आर्थिक वर्षात मोठे विद्युतीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पर्यावरणाला धक्का न पोहचवता हे उद्दिष्ट कसे गाठणार, हे या अर्थसंकल्पातून स्पष्ट झालेले नाही. मात्र, अशा महत्वाच्या प्रश्नांना सोडवण्यासाठी रेल्वे अर्थसंकल्पात १००० मेगावॉट सौर उर्जा निर्मितीचे लक्ष्य ठेवत पर्यावरणस्नेही इंधनासाठी महत्वाचे पाउल उचलले आहे.

या अर्थसंकल्पात चार महत्वाची उद्दिष्टे मांडली आहेत. त्यात प्रवाशांना उत्तम सुविधा देण्यासाठी व्यवस्थेत मूलभूत आणि शाश्वत बदल करणे, सुरक्षित प्रवासाची हमी, प्रवाशी संख्या दररोज २१ दशलक्ष वरून ३० दशलक्ष पर्यंत वाढवण्यासाठी पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण आणि क्षमतेत सुधारणा तसेच,

रेल्वेरुळाची लांबी २० टक्क्याने वाढवून १.१४ लाख किलोमीटर वरून १.३८ लाख किलोमीटर करणे, आर्थिक मालवाहतूक एक अब्ज टनांवरून दीड अब्ज टनांवर नेणे अशी सर्व उद्दिष्टे गाठण्यासाठी मंत्र्याना मूलभूत स्तरावर काम करावे लागेल, आवश्यक ते निर्णय घ्यावे लागतील. रेल्वे प्रकल्पांमध्ये, विशिष्ट उद्देशांसाठी राज्य सरकारांना सहभागी करून घेणे, कोळसा, लोह खनिज व सिमेंट यांसारख्या महत्वाच्या वस्तूंची वाहतूक करण्याची पुरेसी क्षमता निर्माण करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांना सहभागी करून घेणे, त्यासाठी


Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, East Block-IV, Level-VII, R.K. Puram, New Delhi 110 066. Tel. : 011-2610 0207, 011-2610 5590; Fax : 011-2617 5516**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022 2757 0686 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

बहुपक्षीय आणि द्विपक्षीय संस्था तसेच उचित समन्वय आणि करारातील वाद मिटविण्यासाठी योग्य यंत्रणा असेल तर इतर देश आणि सरकार यांच्याशी संपर्क करून दीर्घकालीन अर्थ सहाय्य आणि तंत्रज्ञान मिळविणे हे उत्साहवर्धक असेल.

रेल्वे मंत्री स्वत: लेखापरीक्षक असल्याने, त्यांना मोठ्या निधीची गरज असणा-या प्रकल्पांसाठी बाजारातून निधी उपलब्ध करणे म्हणजे काय हे पूर्णपणे माहित आहे. भारतीय रेल्वे पत पुरवठा संस्थेकडून महाग कर्ज घेण्याबरोबरच विमा आणि निवृत्ती वेतन निधी, बहुपक्षीय आणि द्विपक्षीय संस्थांकडून स्वस्त व्याज दारात उपलब्ध कर्जाची परतफेड वाढत जाणा-या उत्पन्नातून केल्या जाऊ शकते. संस्थागत दीर्घकालीन गुंतवणूकदारांकडून आणि इतर भागीदारांकडून गुंतवणूक आकर्षित करण्याचे रेल्वेचे प्रयत्न निश्चितच हितकारी आहेत. ह्यावेळी प्रथमच रेल्वेमंत्र्यांनी ''रेल्वेची संपत्ती विकण्या ऐवजी या संपत्तीचा निधी उभा करण्यासाठी उपयोग करण्यात येईल'' असे सांगितले आहे. ह्यामुळे रेल्वेची खाजगीकरण आणि जमीन विकली जाण्याबद्दल निर्माण होणा-या अनावश्यक वादांवर कायमचा पडदा पडेल.

रेल्वेची कार्यक्षमता ही रेल्वे व्यवस्थेच्या उत्पन्नातून वापरासांठी लागलेला खर्च वजा जाता जी रक्कम शिल्लक राहील त्यानुसार ठरवली जाऊ शकते. (हा खर्च जितका कमी तितकी कार्यक्षमता चांगली.) रेल्वे व्यवस्थेचा खर्च २०१३-१४ मधे ९३.६८ इतका होता, तर २०१४-१५ च्या सुधारित अंदाजानुसार ९१.८८ इतका व्यक्त करण्यात आला आहे. याचे श्रेय उत्पादकता आणि खर्च व्यवस्थापन कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीला जाते. गेल्या वर्षीच्या जुलै महिन्यात सादर झालेल्या अंतरीम रेल्वे अंदाजपत्रकात या खर्चाचा अंदाज ९२.४८ एवढा व्यक्त करण्यात आला होता. या अर्थसंकल्पात २०१५-१६ वर्षासाठी हा खर्च ८८.५३ पर्यंत कमी होईल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. एकीकडे उत्पादकता वाढवणे तर दूसरीकडे रेल्वे च्या कार्यक्षमतेत सुधारणा करणे अशा प्रयत्नातून हे लक्ष साध्य होईल.

खरं सांगायचं तर खर्च नियंत्रणात आणणे आणि रेल्वेची कार्यक्षमता वाढवणे या यशस्वी उपायातुन रेल्वे मंत्र्यांना यंदाच्या अर्थसंकल्पात शिल्लक असलेल्या रकमेतून १०५० कोटी रुपये ते ७९०० कोटी रुपये इतका घसारा राखीव निधीची व्यवस्था करण्यासाठी मुभा मिळाली. या निधीतून रेल्वे रुळांची दुरुस्ती आणि नूतनीकरण तसेच निष्काळजी पणे केलेल्या कामांमुळे सुरक्षेला धोका पोचून प्रवासी किंवा माल वाहतुकीत झालेल्या दुर्घटनांसाठी या निधी चा उपयोग होऊ शकतो.

रेल्वे विकास निधी मधेही या अर्थसंकल्पात भरघोस म्हणजे ५७५० कोटी रुपयांपर्यंत अशी चौपट वाढ झाली आहे. हा निधी प्रकाल्पांमध्ये येणारे अडथळे आणि इतर छोट्या मोठ्या व्यवस्थासाठी उपयोगात येऊ शकतो . या अर्थसंकल्पातील सर्वात महत्वाची , सुस्पष्ट अशी तरतूद म्हणजे व्यवस्थेसाठीच्या निधीत ५० खर्चा पेक्षाही अधिक वाढ करणे. २०१५ -१६ या आर्थिक वर्षासाठी एक लाख कोटी निधी पूर्णपणे वापरला गेला तर रेल्वेच्या इतिहासातील हा एक विक्रमच ठरेल.

या अर्थसंकल्पात प्रस्तावित महसुलाचा अंदाज हा मुख्यत्वे आशावादावरच अवलंबून आहे कारण चालू आर्थिक वर्षांत प्रवासी आणि माल वाहतुकीतून मिळणाऱ्या महसुलात घट झाली असून आधीच्या अंदाजपत्रकात व्यक्त करण्यात आलेल्या १६०१६५ कोटी रुपये महसुलात प्रत्यक्षात घट झाली असून या अर्थसंकल्पात ९१७ कोटी रुपयांची घट झाल्याचे निदर्शनास आलं आहे. या सुधारित आकडेवारींमुळे पुढील आर्थिक वर्षांत वाहतुकीतून रेल्वेला १,८३,५७८ कोटी रुपयांचा महसूल मिळेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. जर काही जादू घडल्याशिवाय किंवा रेल्वे मंत्र्यांनी प्रवासी आणि मालवाहतूक सुधारण्यासाठी व्यवस्थापकीय कार्यक्षेत्रात काही धोरणात्मक आणि शाश्वत निर्णय घेतले तरच हा अपेक्षित असलेला महसूल रेल्वेला मिळू शकेल अन्यथा नाही.

रेल्वे व्यवस्थेसाठी राजकोषातल्या सकल अर्थसंकल्पीय तरतुदींवर पूर्णत: अवलंबून न राहण्याचा निर्णय रेल्वेने घेतला आहे, कारण, अशा व्यवस्थेतून

कधी कधी निधी पुरवठा नं झाल्यास रेल्वेचं काम ठप्प होण्याची भीती असते. या दृष्टीनेच रेल्वे मंत्र्यांनी निधी उभारण्यासाठी अर्थसंकल्पीय स्त्रोतांच्या बाहेर अशा काही नव्या संस्थात्मक गुंतवणुकीचा मार्ग शोधला आहे. रेल्वे साठी निधी उभारण्याची सकारात्मक क्षमता या मार्गात असल्याचं रेल्वे मंत्र्यांनी म्हटलं आहे. या मार्गाने रेल्वे प्रकल्पांमध्ये रेल्वे आणि इतर सार्वजनिक क्षेत्रातल्या कंपन्यांच्या माध्यमातून १७१३६ कोटी रुपयांची संस्थात्मक गुंतवणूक अपेक्षित आहे. या गुंतवणुकीतून रेल्वेची कार्यक्षमता वाढवणारे प्रकल्प पूर्ण करण्याला गती दिली जाईल. या आधी असा निधी छोट्या छोट्या प्रकल्पांमध्ये देण्याची कुप्रथा अस्तित्वात होती. त्यातून या निधीचा कुठेच योग्य विनियोग होत नसे. हे प्रकल्प पूर्ण झाले तर रेल्वेच्या काही ठिकाणी असलेल्या वाहतुकीवरचा ताण कमी होईल. २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी प्रस्तावित १ लाख कोटी रुपयांपैकी ४०००० कोटी रुपये केंद्र सरकार कडून तर १६४५ कोटी रुपये डीझेल वरच्या उपकरतून १७७९३ कोटी रुपये रेल्वेच्या अंतर्गत स्त्रोतातून आणि उर्वरित ४०००० कोटी रुपये निधी बाहेरून कर्जाऊ स्वरुपात घेतला जाणार आहे.

इथे हे ही नमूद करायला हवे , की गेल्या वर्षी रेल्वेने १३००० हजार कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते. आणि हे कर्ज फेडण्यासाठी रेल्वेला काही असे प्रकल्प पूर्ण करायला गती द्यावी लागली आहे, ज्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून हे कर्ज फेडता येईल .याच कारणामुळे रेल्वेने आता राज्य सरकार, सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या , बहुपक्षीय संस्था आणि खाजगी कंपन्या अशा सर्व क्षेत्रातून निधी उभारण्याचे ठरविले आहे. या सर्व क्षेत्रातून रेल्वेला १७००० कोटी रुपये निधी मिळेल . तर, उर्वरित १७००० कोटी आय आर एफ सी कडून कर्जस्वरूपात आणि इतर ६००० कोटी रुपये सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून मिळतील.

थोडक्यात सांगायचे तर या अर्थसंकल्पात रेल्वेची एकूणच व्यवस्था पुर्निर्मित करण्याचा एक आराखडा मांडण्यात आला आहे. या आराखड्याची अपेक्षित आणि योग्य पद्धतीने अंमलबजावणी झाली तर रेल्वेशी संबंधीत सर्व हितसंबंधी गटांना आणि भाग धारकांना दूरगामी लाभ मिळू शकतील. अनेकांनी या अर्थसंकल्पावर टीका करतांना ही गुंतवणूक योजना रेल्वेला कर्जाकडे घेऊन जाणारी आणि म्हणूनच अशाश्वत असल्याचे म्हटले आहे. मात्र सध्या बाजारपेठ गुंतवणुकीसाठी अनुकूल असल्याचं चित्र आहे. त्यामुळे रेल्वेला नक्कीच यश मिळेल अशी आशा करायला हरकत नाही. संपूर्ण भारतात माल वाहतूक आणि स्वस्त प्रवासी वाहतुकीचे सर्वोत्तम साधन असा लौकिक मिळवलेल्या रेल्वे कडे काही चांगल्या कार्ययोजना आहेत ज्यातून रेल्वेचा विकास साधता येईल. या रेल्वे अर्थसंकल्पासोबत रेल्वे मंत्र्यांनी श्वेत पत्रिकाही सदर केली. या श्वेत पत्रिकेनुसार पुढच्या पाच वर्षांत रेल्वेचा चेहरा मोहराच बदललेला दिसेल. वेगवान गाड्या, आधुनिक गाड्या, अत्याधुनिक आणि टापटीप रेल्वे स्थानकं, कुशल कर्मचारी असं उद्याच्या रेल्वेचं चित्र आपल्याला दिसेल. कदाचित २०१५-१६ साठीचा हा रेल्वे अर्थसंकल्प अशाच प्रागतिक रेल्वे व्यवस्थेचा मार्ग असू शकेल आणि भारतीय जनता परंपरागत रित्या वापरत असलेल्या या वाहतूक साधनाचं संपूर्ण चित्र बदललेलं आपल्याला दिसू शकेल.

***लेखक माजी उपसंपादक,*** *द हिंदू बिझनेस आणि मुक्त पत्रकार आहेत*

*संर्पकासाठी मेल : geeyes34@gmail.com*

# बदलते उत्तरदायित्व- महिलांच्या दृष्टिकोनातून अर्थसंकल्प

**- नीता एन.**




**देशातील महिलांवरील अत्याचारांचे वाढीव प्रमाण बघता केंद्र सरकार तर्फे सुरक्षेच्या दृष्टीने भरीव योजनांच्या घोषणांची व त्यावरील अंमलबजावणीसाठी भरीव निधीचीही अपेक्षा होती. परंतु एकंदरच अर्थसंकल्पाचा अभ्यास केल्यास वर्ष २०१५-१६ चा अर्थसंकल्प हा महिला विरोधी आहे असे म्हणायला हरकत नाही. कारण कृषी क्षेत्र वगळता इतर सर्व क्षेत्रा अंतर्गत विविध खात्यातील महिलांसाठीच्या निधीमध्ये कपात केलेली आढळून येते. 'महिला सुरक्षा' हा अनुत्तरीत प्रश्न यामुळे राहिला आहे. तसेच महिलांवरील अत्याच्यारात गुन्हेगांरासाठी विशेष शिक्षा कायद्या अंतर्गत दिसून येत नाही.**

२०१५-१६ च्या अर्थसंकल्पाची लोक आतुरतेने वाट बघत होते, कारण तो एकतर पहिलाच पूर्णस्वरूपी अर्थसंकल्प होता व दुसरे म्हणजे मोठ्या प्रमाणावर करण्यात आलेले आर्थिक बदल हे आणखी एक कारण त्यामागे होते. विकासाच्या दृष्टिकोनातील कुठलाही बदल हे महिलांवर परिणाम करणारे असतात, पुरूषांपेक्षाही ते महिलांवर जास्त परिणाम करतात कारण आपली समाजपद्धती पितृसत्ताक आहे. सामाजिक व आर्थिक आघाडीवरही महिलांवर त्याचा परिणाम होत असतो. महिलांचे प्रश्न नेहमीच राष्ट्रीय कार्यक्रमाचे भाग बनत असले तरी ते तात्पुरत्या स्वरूपाचे असतात. महिलांविरोधातील वाढता हिंसाचार वाढत असल्याने त्याची दखल घेतली गेली पण नेहमी महिलांचा पुरेसा विचार केला जातोच असे नाही. महिलांच्या विरोधातील हिंसाचार हा चर्चेच्या अग्रस्थानी राहिला. अनेक राजकीय पक्षांच्या जाहिरनाम्यातही त्याला स्थान मिळाले.

अनेक विकास निर्देशांकांचा विचार केला तर महिलांची स्थिती वाईट असल्याचे दिसून येते. महिला साक्षरतेच्या प्रमाणात हे महिलांमध्ये सुधारले असले तरी अजुनही एक तृतीयांश महिला निरक्षर आहेत. पुरूष व स्त्रियांचे तुलनात्मक प्रमाण गेल्या दशकभर वादाचा मुद्दा राहिला आहे. २०११ च्या जनगणनेनुसार १००० पुरूषांच्या मागे ९१४ स्त्रिया असे प्रमाण आहे. रोजगारात महिलांचे प्रमाण फार कमी आहे. राष्ट्रीय सर्वेक्षण संस्था म्हणजे एनएसएसच्या माहितीनुसार २०११-१२ मध्ये हे प्रमाण २२ टक्के होते. हे प्रमाण कमी होत आहे व ग्रामीण भागात तर ते काही वर्षात ८ टक्क्यांनी कमी झाले आहे. पक्षपाती लिंगभावाच्या दृष्टिकोनातून केलेला विकास हा संयुक्त राष्ट्रांच्या असमान लिंगभाव निर्देशांकात प्रतिबिंबित झालेला दिसतो. २०११ च्या आकडेवारीनुसार जगातील १४९ देशात भारताचा महिला समान विकासात १२९ वा क्रमांक लागतो व हा निर्देशांक भारतासाठी ०.६१७ आहे.

या पार्श्वभूमीवर अर्थसंकल्पाचा लिंगसमभावाच्या दृष्टीने विचार केला पाहिजे. अर्थसंकल्पाचा लैंगिक संवेदनशीलता तीन घटकांच्या आधारे मोजली जाते त्यात सामाजिक क्षेत्रातील खर्च विशेष करून स्त्रियांसाठी असलेली तरतूद महत्वाची असते. जरी खर्च शीर्षात महिलांचा विशिष्ट उल्लेख नसला तरी महिलांच्या विकासासाठी काही रकमेची तरतूद करणे आवश्यक असते. दुसरा विचारात घेतला जाणारा घटक म्हणजे महिलांसाठी खास कार्यक्रम व तरतुदी हा आहे. विविध खात्यामध्ये कार्यकारी महिलांची आवश्यकता असल्याने कार्यपद्धतीनुसार ही तरतूद करण्यात आली असून, ती खास महिलांसाठीच्या योजनांपेक्षा वेगळी असते. विविध योजनांमध्ये अशा प्रकारे स्त्रियांना किती स्थान मिळाले आहे याचा विचार करावा

लागतो.

सध्याच्या अर्थसंकल्पाचे महिला कल्याणाच्या दृष्टिकोनातून मूल्यमापन करताना एक अर्थिक बदल लक्षात घेणे आवश्यक आहे. राज्यांना केंद्राकडून दिल्या जाणाऱ्या मदतीचे विकेंद्रीकरण १४ व्या अर्थ आयोगाच्या सूचनेनुसार करण्यात आले आहे. राज्यांचा वाटा एकूण करात ३२ टक्क्यांवरून ४२ टक्के इतका वाढला आहे, केंद्र सरकारनेही खर्चाचे प्रारूप बदलले असुन. त्यामुळे काही योजना बंद करण्यात आल्या आहेत काहींचे स्वरूप केंद्र-राज्य वाटपानुसार बदलण्यात आले, काही योजना केंद्राच्या अंतर्गत कायम राहणार आहेत. यात आणखी एक भर म्हणजे करांमध्ये कुठलेही बदल करण्यात आलेले नाहीत त्यामुळे केंद्राकडे खर्चासाठी शिल्लक राहणारी रक्कम कमी झाली आहे व ते लक्षात घेऊन आर्थिक तूट कमी करण्याचे उद्दिष्ट कमी करण्यात आले आहेत.

## सामाजिक क्षेत्रातील खर्च- लिंगभाव समानतेचा कणा


सामाजिक क्षेत्रातील खर्च हे एकुण लोकसंख्येच्या सामाजिक व आर्थिक समानतेनुसार सर्व घटकांसाठी महत्वाचे असून विशेत: सर्व गटांतील महिलांचा यामध्ये विचार केला आहे. महिलांवरील कामाचा ताण व त्यांना द्यावा लागणारा वेळ याच्याशी त्याचा संबंध असतो. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचे प्रमाण अधिक आहे त्यांना सामाजिक सुरक्षा फारशी नाही असे म्हटले तरी चालेल. त्यामुळे सरकारने महिलांचे शिक्षण, आरोग्य, गृहनिर्माण व इतर बाबीत तरतूद करणे आवश्यक असते त्यामुळे त्यांचे व पर्यायाने कुटुंबाचे राहणीमान सुधारते. कुटुंबांचे जीवनमान घसरत चालल्याने स्त्रियांचेही राहणीमान घसरत असल्याचे चित्र आहे त्यामुळे स्त्रियांचा दर्जा पुरूषांच्या तुलनेत खालावत आहे. अर्थसंकल्पात महिलांसाठी तरतूद केल्याने ज्या महिलांना घरकामात व मुलांची काळजी घेण्यासाठी आपण एक पैसाही देत नाही, त्यांची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न होतो. पिण्याच्या पाण्याची उपलब्धता कमी आहे त्यामुळे महिलांना खेडेगावात व काही शहरातही पायपीट करावी लागते. त्यांच्या आरोग्यासाठी तरतूद केल्याने त्यांच्या आरोग्याची काळजी काही प्रमाणात घेता येते. मैलापाणी व स्वच्छतागृहाच्या सुविधा नसल्याने मुली शाळा सोडून देतात. कमी निधी व सामाजिक क्षेत्रात कमी तरतूद तसेच गरिबांसाठी तरतूद हे महत्वाचे प्रश्न आहेत, ते सार्वजनिक चर्चेचा विषय ठरले कारण सामाजिक क्षेत्रातील खर्चात गेल्या काही वर्षात चढउतार जाणवतो. एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या तुलनेत सामाजिक क्षेत्रावरचा खर्च हा ''सेंटर फॉर गव्हर्नन्स अँड बजेट अकाउंटेबिलिटी'' या संस्थेच्या आकडेवारीनुसार तो ३.४० टक्क्यांवरून २.५७ टक्के इतका कमी झाला आहे. त्यात खाद्यान्न अनुदानांचा समावेश आहे. बदलत्या आर्थिक परिस्थितीत राज्ये सामाजिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात खर्च करू शकतात. सामाजिक क्षेत्रातील खर्चाची तरतूद कमी करण्याच्या मुद्यावर विश्लेषण केल्याशिवाय कुठला निर्णय घेणे योग्य नाही. जर आपण केंद्र सरकारच्या विशिष्ट योजनांना निधी देण्याचे निकष पाहिले तर त्यांचा भर हा भांडवली खर्चावर असतो. पुनरावर्ती खर्चावर नसतो. अनेक योजना आधीच चालू आहेत त्यात भांडवली खर्च कमी असून दिवसें दिवस त्यात घट निदर्शनास येते. त्याचा अर्थ त्या योजनांच्या अंमलबजावणीचा खर्च करण्याची जबाबदारी राज्य सरकारांवर येऊन पडते. यात योजनेची जबाबदारी हा मुद्दा नसतो. तर एकूण खर्चावर त्याचा काय परिणाम होईल हे महत्वाचे असते, आपण जर सध्याच्या सामाजिक योजनांची अंमलबजावणी पाहिली तर त्यात आपल्याला राज्याराज्यांमध्ये भिन्नता दिसते. जर आपण या कार्यक्रमांची अंमलबजावणी पाहिली तर त्यात आपल्याला राज्यांची वचनबद्धता दिसून येते व त्यांना त्यात स्वारस्यही असते. राज्यांना दिला जाणारा निधी जास्तीत जास्त एकसंध व लवचिक असल्याने जर महिलांसाठी तरतूद करण्याचा अभाव असेल तर काही राज्ये महिलांसाठी कमी तरतूद करू शकतात व त्यामुळे वाटपाचे सगळे स्वरूपच बदलून जाईल. ते स्वरूप बदलले तर म्हणजेच निधीची तरतूद कमी जास्त केल्यास त्याचा परिणाम सामाजिक सेवा क्षेत्रवर होईल. जसे की, आरोग्य, पिण्याचे पाणी, मैलापाणी, स्वच्छतागृहे इत्यादी. त्यामुळे महिलांवरील गुंतवणूक फार संवेदनशील असूनती त्यांच्याच विकासासाठी खर्च व्हायला हवी सध्या डिझेल व मालवाहतुकीचे वाढते दर यांचा परिणाम हा मूलभूत वस्तूंच्या किंमतीवर होत असून त्यामुळे असंघटित क्षेत्रातील महिलांना त्याचा फटका बसणार आहे. महिलांच्या काबाडकष्टांमुळे त्यांची कुटुंबे वाचतील पण पोषणात्मक गरजा पूर्ण होणार नाहीत व त्यांना ते आव्हान कायम राहील.

## महिलांसाठी खास योजना - महिला कल्याण व सुरक्षा

महिलांसाठी असलेल्या योजनांमध्ये

त्यांच्या विशिष्ट चिंतांचा विचार केला पाहिजे. स्त्री-पुरूष समानतेचा विचार केला पाहिजे. पितृसत्ताक पद्धतीतही महिलांच्या भूमिकेचा विचार करणे आवश्यक आहे. समान लिंगभाव विवरणपत्र हा खर्च अर्थसंकल्पाचा महत्वाचा भाग असतो कार्यक्रमात महिलांसाठी खास ३० टक्के विशिष्ट कार्यक्रमा अंतर्गत तरतूद केली आहे. महिला विशिष्ट कार्यक्रमात २०१५-१६ च्या अर्थसंकल्पांत १७ कोटी रूपयांची तरतूद केली आहे. असे असले तरी निव्व्ळ स्वरूपाच्या तरतुदीत गेल्या काही वर्षात कपात झालेली दिसते. एकूण अर्थसंकल्पाचा आकार व एकूण राष्ट्रीय उत्पन्न यांचा विचार केला असता महिलांसाठी तरतूद करण्यात आली आहे

**विविध वर्षातील महिला विशिष्ट कार्यक्रम व योजना**




एकूण अर्थसंकल्पातील तरतूद टक्केवारीत

एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या तुलनेत तरतूद

**स्त्रोत- केंद्रीय अर्थसंकल्प २०१५-१६ चे विश्लेषण, केंद्रीय अर्थसंकल्प व प्रशासकीय जबाबदारी, नवी दिल्ली**

सरकारने महिला व बाल विकास मंत्रलयाच्या महिला विशिष्ट योजनांच्या तरतूदीत कपात केल्याने महिला बाल विकास मंत्रालयाला या वर्षी मागील वर्षाच्या तुलनेत अल्पनिधी मिळाला. दोन अर्थसंकल्पातील तुलना करता विविध कार्यक्रमांसाठी असलेली तरतूद फार कमी आहे व त्यामुळे काही बाबी आणखी कठीण झाल्या आहेत. चार योजना व कार्यक्रमांसाठी सध्याच्या अर्थसंकल्पात तरतूद केलेली नाही. हे वरील तक्त्यातून दिसत आहे.

दोन योजनांमध्ये आर्थिक कमकुवत महिलांसाठी घरकुल योजना व राज्यांसाठी घरगुती हिंसांचार कायदा (२००५) च्या अंमलबजावणीवर परिणाम होत आहे. २०११ च्या जनगणनेनुसार ज्या महिला विधवा आहेत व ज्यांना घराची आवश्यकता आहे अशांची संख्या वाढली आहे याचा अर्थ त्यांना निवाऱ्याची गरज आहे. त्याचबरोबर ही बाबही खरी आहे की, घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायद्याच्या अंमलबजावणीसाठी दिलेली रक्कम गेल्या वर्षात बहुतांशी अखर्चित राहिली आहे, त्यामुळे यावेळी ही तरतूद काढली असावी किंवा राज्ये त्यावर त्यांच्या वाट्यातून खर्च करतील अशीही एक शक्यता नाकारता येत नाही. राज्ये त्यावर निर्णय घेतील असे समजून ही तरतूद कमी करणे आत्मघातकीपणाचे आहे.

## महिला व बालकल्याण मंत्रालयात महिलाविशिष्ट कार्यक्रमांसाठी तरतूद

| कार्यक्रम व योजना | २०१४-१५ (BE) | २०१५-१६ (BE) | तरतुदीतील फरक |
|---|---|---|---|
| कामकरी महिलांसाठी वसतीगृहे | २५ | ३० | ५ |
| एसटीइपी | २० | ३० | १० |
| सीएसडब्ल्यूपी | ८०.९१ | ७३.५७ | -७.३४ |
| राष्ट्रीय महिला कोश | २० | ० | -२० |
| एक थांबा आपत्ती मदत केंद्र | २० | २ | -१८ |
| स्वादर | ११५ | ५० | -६५ |
| बलात्कारित महिलांना न्याय व पुनर्वसन | ३०.०० | ० | -३० |
| राष्ट्रीय महिला आयोग | १९.५ | २५.१५ | ५.६५ |
| लिंगसमभाव अर्थसंकल्प | १.०० | २.०० | १ |
| धनलक्ष्मी योजनेत मुलींना निधीचे सशक्त हस्तांतर व विमा | ५.०० | ० | -५ |
| महिलांची तस्करी टाळण्यासाठी सर्वंकष योजना (उज्ज्वला) | १६.०० | २०.०० | ४ |
| प्रियदर्शिनी योजना | १५.०० | ५.०० | -१० |
| प्रौढ मुलींसाठी सक्षमीकरण योजना (सबला) | ७०० | १० | -६९० |
| एकट्या महिला व विधवा यांच्यासाठी घरे बांधण्याकरिता साह्य | २०.०० | ० | -२० |
| घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राज्यांना अर्थ | ५०.०० | ० | -५० |
| महिला हेल्पलाइन | १०.०० | १.०० | -९ |
| इंदिरा गांधी मैत्रीत्व सहयोग योजना (आयजीएमएसवाय) | ४००.०० | ४३८.०० | ३८ |
| एनएमइडब्ल्यू | ९० | २५ | -६५ |
| **स्त्रोत- केंद्रीय अर्थसंकल्प २०१५-१६, खर्च अर्थसंकल्प, खंड १ भाग ए- लिंगभाव समानता अर्थसंकल्प विवरणपत्र** | | | |

प्रौढ मुलींच्या सक्षमतेसाठी राजीव गांधी मोहिम म्हणजे सबला मोहिमेत तरतुदीत कपात झाली आहे. केंद्राने महिला सक्षमतेचा १० कोटीचा निधी कमी केला असून प्रत्येक राज्यांना निर्भया निधीतून मदत दिली जाईल. महिला विरोधी हिंसाचार वाढत असताना केंद्राने महिला मदत केंद्राचा निधी कमी केला ही चिंतेची बाब आहे. हिंसाचार ग्रस्त महिलांसाठी हा मदत निधी असून तो कमी करणे योग्य नाही. अर्थसंकल्पाच्या सविस्तर विवरणात अशी केंद्रे २५ लाख लोकसंख्या किंवा त्याहून जास्त लोकसंख्या असलेल्या शहरात सुरू करण्यात आली आहेत. शिवाय महिलांसाठी वसतीगृहांसारख्या संस्थात्मक पाठिंब्याची गरज आहे, आताच्या अर्थसंकल्पात त्याचा उल्लेख नाही.

उपरोक्त योजना व कार्यक्रमात दोन योजना या महिलांच्या समानतेसाठी महत्वाच्या होत्या त्यात एमडब्ल्यूसीडी अंतर्गत राजीव गांधी राष्ट्रीय पाळणाघर योजना व बेटी बचाव बेटी पढाव योजना यांचा समावेश होता. राजीव गांधी राष्ट्रीय पाळणाघर योजनेसाठी आर्थिक कमकुवत गटातील महिलांना त्यांच्या मुलांसाठी पाळणाघरे उपलब्धतेसाठी तरतुदीची रक्कम २०१४-१५ मध्ये ६२.५० कोटी रूपये होती ती आता १०२.९७ कोटी रूपये करण्यात आली आहे. मुलांची काळजी घेण्यासाठी ही स्वागतार्ह बाब आहे. काम करणाऱ्या महिलांमध्ये वाढ व्हावी यासाठी त्याचा फायदा होऊ शकतो. गरीब महिलांना रोजगारावाचून पर्याय नसतो त्यामुळे ही तरतूद केल्याने या महिलांना मदत होऊ शकेल, असे असले तरी यात आणखी तरतूद करण्याची गरज आहे. 'बेटी बचाव बेटी पढाव' योजना पुरूष-स्त्रिया यांच्या घटत्या गुणोत्तराचा विचार करण्यात आला आहे, ही योजना गेल्या वर्षी सुरू करण्यात आली होती. या योजनेच्या आर्थिक तरतुदीत कपात करण्यात आली आहे. महिला व बालकल्याण मंत्रालयाचा भाग नसलेल्या या योजनेत या योजनेचा समावेश नसला तरी शिक्षण मंत्रालयानेही त्यासाठी गेल्यावर्षी केवळ १०० कोटी रूपयांची तरतूद केली होती.

## महिला विशिष्ट कार्यक्रमांसाठी मंत्रालय निहाय निधी वाटप

| मंत्रालये व विभाग | २०१४-१५ (BE) अर्थसंकल्पीय तरतूद | २०१५-१६ (BE) अर्थसंकल्पीय तरतूद | तरतुदीतील फरक |
|---|---|---|---|
| कृषी शिक्षण व संशोधन | १४.९५ | ४४.२३ | २९.२८ |
| अर्थ मंत्रालय निर्भया निधी | १००० | १००० | ० |
| आरोग्य व कुटुंब कल्याण | ३७८८.४४ | ३८५२.११ | ६३.६७ |
| ग्रामीण विकास व इंदिरा आवास योजना (ग्रामीण गृहनिर्माण) | १६००० | १००२५ | -५९७५ |
| महिला व बालकल्याण मंत्रालयाव्यतिरिक्त इतर मंत्रालये | ५३३.०६ | ११२४.६२ | ५९१.५६ |
| महिला व बालकल्याण मंत्रालय वगळता महिला विशिष्ट योजनांची तरतूद | २१३२१.५ | १६००१.७३ | -५३१९.७७ |
| **स्त्रोत- केंद्रीय अर्थसंकल्प २०१५-, खर्च अर्थसंकल्प भाग ए- लिंगसमभाव अर्थसंकल्प विवरण .** | | | |

महिला व बालकल्याण मंत्रालयाच्याच नव्हे तर इतर मंत्रालयातही महिला विशिष्ट योजनातही कपात करण्यात आली आहे त्यात ग्रामीण गृहनिर्माण योजनेचाही समावेश आहे. मालमत्ता हक्कांचे वाटपही लिंगसमभावाच्या दृष्टीने असमान आहे. निर्भया निधीसाठी २०१३-१४ मध्ये प्राथमिक १००० कोटी रूपयांची गुंतवणूक करण्यात आली परंतु नंतर त्यात वाढ नाही. ३००० कोटींची जमा राशी बघता महिला विकास योजना या स्पष्ट असायला हव्या होत्या परंतु अर्थ संकल्पात कुठेही वैशिष्ट्यपूर्ण विधाने आढळून येत नाहीत. निधी कसा वापरला जाणार याविषयी स्पष्ट माहिती नाही. दोन योजना जसे की या निधीतील ६५ कोटी रुपये रक्कम ही टेहळणी कॅमेऱ्यांसाठी आणि महिलाांवरील सुरक्षित वाहतुक व्यवस्थेवर खर्च करण्यात येणार आहे. महिलांविरोधी हिंसाचाराचा प्रश्न म्हटला की, जास्तीत जास्त रक्कम माहिती तंत्रज्ञानावर आधारित टेहळणीसाठी वापरली जाणार हे उघड आङे. आंतरराष्ट्रीय अभ्यासात असे दिसून आले आहे की, सीसीटीव्ही किंवा टेहळणीमुळे गुन्हे कमी होतात असे नाही, उलट त्यामुळे महिलांच्या वावरण्यावर मर्यादा येऊ शकतात. त्या उलट महिला ज्या सार्वजनिक यंत्रणांवर अवलंबून असतात त्यासाठीची तरतूद वाढवणे गरजेचे आहे.

### पेला भरलेला तरी कपात

महिला विशिष्ट योजना व कार्यक्रम वगळता जीबीएसने दिलेल्या माहितीनुसार अशा काही योजना आहेत ज्यात तीस टक्के स्त्रिया लाभार्थी आहेत. या विविध विभाग व मंत्रालयांनी या योजनांमध्येही तरतुदीत कपात केलेली दिसते. अशा तेरा योजनांपैकी केवळ पाच योजनांमध्ये तरतुदीत वाढ केलेली दिसते.कृषी व सहकार खात्याने लिंगभाव समानता राखून महिलांसाठी तरतुदीत वाढ केली आहे, बराच काळ ही वाढ अपेक्षित होती. कृषी क्षेत्रात महिलांची भूमिका महत्वाची आहे यावर शिक्कामोर्तब झाले आहे व अर्थसंकल्पातील ती महत्त्वाची बाब आहे.

## ज्या मंत्रालय किंवा विभागांच्या योजनात ३० टक्के किंवा अधिक महिला लाभार्थी आहेत त्यातील आर्थिक तरतूद

| मंत्रालये व विभाग | २०१४-१५ अर्थसकल्पीय अंदाज | २०१५-१६ अर्थसंकल्पीय अंदाज | तरतुदीतील फरक |
|---|---|---|---|
| कृषी व सहकार | ७५० | ३५३९.०६ | २७८९.०६ |
| आरोग्य व कुटुंब कल्याण | ११८२४.०१ | ९९७७.८२ | -१८४६.१९ |
| शालेय शिक्षण व साक्षरता | १६२०८.१६ | १२४७२.०७ | -३७३६.०९ |
| उच्च शिक्षण | ७६२१.५७ | ७४४६.३४ | -१७५.२३ |
| कामगार व रोजगार | १७५ | २५० | ७५ |
| सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग | ५१५.०९ | ४१२.३७ | -१०२.७२ |
| अल्पसंख्याक कामकाज | २१५१.५ | २२६२.६८ | १११.१८ |
| पंचायत राज | ६९०६ | ० | -६९०६ |
| ग्रामीण विकास | १३३३२ | १२८१७.६८ | -५१४.३२ |
| सामाजिक न्याय व सक्षमीकरण | १८२१.०२ | १९९७.०८ | १७६.०६ |
| आदिवासी कामकाज | १३६१.६ | १४८७.२ | १२५.६ |
| महिला व बालकल्याण | ११३००.५४ | ८०७२.३६ | -३२२८.१८ |
| युवक कामकाज व क्रीडा | ९९.४९ | ९९.३७ | -०.१२ |
| इतर मंत्रालये व विभाग | १८४८.५५ | १५१०.९४ | -३३७.६१ |
| एकूण | ७५९१४.५३ | ६२३४४.९७ | -१३५६९.६ |
| **स्त्रोत- केंद्रीय अर्थसंकल्प २०१५-१६ खर्च अर्थसंकल्प खंड १ भाग ब- लिंगभाव समानता विवरणपत्र** | | | |

याशिवाय, इतर कुठल्याच तरतुदी या उत्साहवर्धक नाहीत. महिला व बालविकास तरतुदीत झालेली कपात ही एकात्मिक बाल विकास योजनेतील (आयसीडीएस) तरतूद कमी केल्यामुळे असली तरी ती धक्कादायक कपात आहे. आयसीडीएसची तरतूद १६ हजार कोटींवरून निम्मी म्हणजे ८ हजार कोटी इतकी खाली आणली आहे. त्याचा गर्भवती महिलांची आरोग्य स्थिती व पोषण आहारावर परिणाम होणार आहे. या शिवाय योजनेसाठी अर्थसंकल्पीय पाठबळ काढून घेतल्याने या कार्यक्रमात मानद म्हणून काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांचे वेतन व शर्ती यात काहीत सुधारणा होणार नाही. अंगणवाडी सेविका व मदतनीस हे या कार्यक्रमाचे मूलाधार असूनही सध्याच्या सरकारने निवडणूक

जाहीरनाम्यात दिलेले आश्वासन पाळले नाही. केंद्र सरकारने या योजनेतील भांडवली खर्च करण्याचे मान्य केले होते पण आता ती जबाबदारी राज्य सरकारांवर टाकली गेली आहे. त्यामुळे अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या वेतन व शर्तीची जबाबदारी राज्य सरकारांना पेलावी लागणार आहे. तामिळनाडू, केरळ यासारख्या राज्यांनी अगोदरच अंगणवाडी सेविका व मदतनीसांसाठी केंद्रापेक्षा जादा तरतूद केली आहे पण ज्या राज्यांनी त्यांच्या प्रश्नांना अग्रक्रम दिलेला नाही त्यांच्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. आरोग्य मंत्रालयाच्या अंतर्गत महिलांसाठीच्या खर्चात १८५० कोटी रुपयांची कपात करण्यात आली आहे. महिलांच्या आरोग्यविषयक सर्व घटक चिंताजनक स्थिती दाखवत असताना ही कपात अन्याय करणारी आहे. ग्रामीण भागात ७५ टक्के स्त्रियांमध्ये रक्ताचे प्रमाण कमी आहे. लिंगसमभावाशी संबंधित आणखी एक बाब म्हणजे जास्त महिला या असंघटित क्षेत्रात काम करतात. त्यांना सामाजिक सुरक्षेची गरज असते. त्यांचे निवृत्ती वेतन, अपघात व जीवन विमा यासाठी १२०० कोटी रूपयांची तरतूद केली आहे. त्याचा तपशील व हा निधी केव्हा दिला जाणार हे स्पष्ट केलेले नाही, शिवाय ही रक्कम फार कमी असून त्यात कामगार असलेल्या स्त्रियांपैकी ३ टक्के स्त्रियांनाही सामाजिक आर्थिक सुरक्षा मिळणार नाही. संघटित क्षेत्रातील महिलांसाठी केलेली तरतूदही अपुरीच असून फार थोड्या महिलांपर्यंत हे लाभ पोहोचतात. याशिवाय अंशदान घटक हा काही योजनांमध्ये अडचणीचा भाग आहे. त्या अभावी महिलांना लाभ मिळत नाहीत. अटल पेन्शन योजना, आरोग्य विमा योजना या योजनातील लिंगसमभावाचा मुद्दा त्या योजनांचा तपशील मिळत नाही तोपर्यंत सविस्तरपणे अभ्यासता येणार नाही. मनरेगात काम करणाऱ्या महिलांची संख्या फार जास्त आहे, त्या योजनेची तरतूद कमी केली जाईल अशी अटकळ होती पण त्यावरील ३४ हजार कोटींची तरतूद कायम ठेवण्यात आली आहे. ही योजना कायम राहिल्याने गरीब महिलांना लाभ जरूर मिळणार आहे व त्यांचा कामातील सहभागही ग्रामीण भागात वाढणार आहे. पायाभूत विकासातील गुंतवणुकीवर भर दिल्याने बांधकाम क्षेत्रात गरीब महिलांना कामाची संधी मिळेल. संघटित अशा बांधकाम उद्योगात महिलांची संख्या कमी आहे व त्यात खूप मोठी वाढ अपेक्षित नाही.

शेवटी समारोपाकडे वळताना असे सांगावेसे वाटते की, लिंगसमभावाच्या दृष्टिकोनातून अर्थसंकल्पाचे मूल्यमापन करण्याचा विचार केला तर त्यात स्त्री समानतेला फार वाव दिला आहे असे वाटत नाही. लिंगसमभावाशी संबंधित संवेदनशील योजनांची केंद्रीय तरतूद कमी करून राज्यांची भूमिका वाढवली आहे. पण राज्ये त्या सेवा व सुविधांची जबाबदारी पार पाडतील की नाही याबाबत ठामपणे काही सांगता येत नाही. त्यामुळे लिंगसमभाव किंवा स्त्री-पुरूष समानता हे स्वप्नच ठरते. अजूनही महिलांना राजकारणात हवे तितके महत्त्व मिळालेले नाही, त्यांचे प्रश्न केंद्रीय पातळीवर मांडले गेलेले नाहीत, त्यावर राजकीय पातळीवर मंथन झालेले नाही त्यामुळे राज्यांकडून आता बदलांची अपेक्षा आहे, अनेक बदल घडले पाहिजेत याची नोंद घेतली जात आहे पण त्याची सरकार पातळीवर अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

***नीता एन*** *या नवी दिल्ली येथील महिला विकास अभ्यास केंद्राच्या वरिष्ठ संशोधिका असून त्या आधि त्यांनी नोएडा येथील व्हि. व्हि. गिरी राष्ट्रीय कामगार संस्था येथे सहाय्यक अभ्यासक आणि संमन्वयक म्हणून काम केले आहे. सध्या त्या महिला संबंधित सर्व क्षेत्रात प्राधान्याने सामाजिक आर्थिक विकास व रोजगार यावर संशोधन करीत आहेत.*
***संम्पर्कासाठी ईमेल*** - neethapillai@gmail.com

## लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठविताना लेखकांनी खाली नमूद केलेल्या फॉन्ट पैकी कोणत्याही एका फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत.

KRUTI DEV or APS or Mangal or DVTT or SHIVAJI or SHREE LIPI, हे नम्र आवाहन.

# दृष्टीक्षेपात आर्थिक सर्वेक्षण



केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी अलीकडेच संसदेत केंद्रीय अर्थसंकल्प २०१५-१६ सादर केला. आर्थिक विकास, उदृयोजकता आणि उत्पादकतेला प्रोत्साहन, कर प्रणालीचे सुसूत्रीकरण आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यावर या अर्थसंकल्पामध्ये लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. अर्थसंकल्पातील ठळक वैशिष्टये खालील प्रमाणे :-

**अर्थव्यवस्था :**

जगामध्ये अधिक वेगाने विकसीत होणारी अर्थव्यवस्था म्हणून भारतीय अर्थव्यवस्था समोर येत आहे. आर्थिक विकासाचा दर दोन आकडी होणे आता शक्य आहे. चालू आर्थिक वर्षात सकल देशांतर्गत उत्पादन वाढून ७.४ टक्के होण्याची शक्यता आहे. परकीय चलन साठा ३४० अब्ज डॉलर होईल.

**सार्वजनिक निधी :**

पुढील तीन वर्षात वित्तिय तूट २ टक्क्यांऐवजी ३ टक्के साध्य केली जाईल. यावर्षी कर वसूली कमी होऊन देखील ४.१ टक्क्याचे लक्ष्य यावर्षी साध्य केले जाईल. तीन वर्षामध्ये सकल देशांतर्गत उत्पादनाच्या तुलनेत ३ टक्के वित्तीय तूटीचे लक्ष्य साध्य करण्यासाठी २०१५-१६ मध्ये ३.९ टक्के, २०१६-१७ मध्ये ३.५ टक्के आणि २०१७-१८ मध्ये ३ टक्क्याचे लक्ष्य ठरविण्यात आले आहे.

१४ व्या वित्त आयोगाने दिलेल्या शिफारशींनुसार, राज्यांना सर्वाधिक हिस्सा देण्यात येईल. एकूण महसूलाच्या ६८ टक्के महसूल हा आता राज्यांच्या हातात आहे.

१७.७७ लाख कोटी अंदाजे अर्थसंकल्पीय खर्चामध्ये १३.१२ लाख कोटी अनियोजीत आणि ४.६५ लाख कोटी नियोजित बाबींसाठी आहे. प्रत्यक्ष कर वसूली १४.४९ लाख कोटी रुपये होईल.

**कराधान आणि करप्रणाली**

- १ एप्रिल २०१६ पासून राज्यांमध्ये प्रत्यक्ष कर प्रणाली अंतर्गत वस्तू सेवा कर लागू करणार.
- स्पर्धात्मक प्रत्यक्ष कर प्रणाली लागू करणार जी स्थिर आणि विवेचनकारी असेल.
- ठगारठ एप्रिल २०१७ नंतरच लागू होणे शक्य आहे.
- ४ वर्षामध्ये कॉर्पोरेट कराचे सर्वसाधारण दर ३० टक्क्यांवरुन कमी करुन २५ टक्के केले जातील.
- कर रद्द करण्यात आला असून ज्यांचे वार्षिक उत्पन्न १ कोटींपेक्षा अधिक आहे त्यांच्यावर २ टक्के अधिभार लावण्यात येईल. यातून निव्वळ ९००० कोटी रुपयांचे अतिरिक्त कर महसूल प्राप्त होईल.
- कर १४ टक्के करण्यात आला आहे.
- मालावरील सीमा शुल्क कमी करण्यात आले आहे.

- ऊर्जा निधी वाढविण्यासाठी कोळशावरील प्रति मॅट्रिक टन स्वच्छ ऊर्जा १०० वरुन वाढवून २०० करण्यात आला आहे. १७५००० मेगावॅट इतके नवीकरण ऊर्जेचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.
- करामध्ये ८३१५ कोटी रुपयांचा तोटा आणि अप्रत्यक्ष करामध्ये २३,३८३ कोटी रुपयांचा फायदा होईल.

## वैंयक्तिक निधी :

सरकार सुवर्ण मोनेटायझेशन योजना, सोवेरजिन सुवर्ण बाँड आणि अशोक चक्राच्या चिन्हासह सुवर्ण नाणी सुरु करणार आहे.

- निवृत्ती वेतन योजनेमधील योगदानासाठी दिड लाखापर्यंतच्या उत्पन्नाला कर सवलत देण्यात येईल. आधी ही मर्यादा एक लाख रुपये इतकी होती.

- विमा हप्त्यांमधील वजावटीची १५,००० रुपयांची मर्यादा वाढवून २५००० रुपये करण्यात आली आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी ही मर्यादा ३०,००० रुपये ठेवण्यात आली आहे.

- समृध्दि योजनेमधील सर्व गुंतवणूक कर मुक्त असेल.

- ४,४४,२०० रुपयां पर्यंतचे उत्पन्न कर मुक्त असेल.

## क्षेत्रीय ठळक वैंशिष्टये :

कृषी आणि ग्रामीण विकास

- जलसिंचनासाठी ५३०० कोटी रुपये

- २०१५-१६ मध्ये शेतक-यांना ८.५ लाख् कोटी रुपयांचे कर्ज देण्याचे लक्ष्य

- पायाभूत विकास निधी २५०० कोटी रुपये करणार

- साठी आत्तापर्यंतचा सर्वाधिक निधी आत्ताच्या निधीत ५००० कोटी रुपयांनी वाढ

## उद्योग आणि पायाभूत सुविधा

- युवकांना रोजगाराची हमी देण्यासाठी भारताला उत्पादन केंद्र बनविण्यावर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. मेक इन इंडिया मुळे उद्योजकतेला प्रोत्साहन मिळून युवकांनी रोजगार उपलब्ध करुन होतील.

- गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा निधी जाहीर

- सरकारी भागीदारी मॉडेल ची पुनर्रचना करुन त्याला पुनरुज्जीवित करण्यात येईल. खाजगी गुंतवणूक कमी करण्यासाठी सार्वजनिक गुंतवणूक वाढवियात आली आहे.

- आणि रेल्वे अर्थसंकल्पीय तरतूदीत वाढ करण्यात आली आहे. रेल्वे, रस्ते वाहतूक प्रकल्पांसाठी करमुक्त इन्फ्रा बॉन्ड

- ४००० मेगावॅट क्षमतेचे ५ अल्ट्रा मेगा ऊर्जा प्रकल्प जाहीर

- क्षेत्रातील बंदरांमध्ये कारखाने स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल आणि या सर्व कंपन्या कंपनी कायद्या अंतर्गत कार्य करतील.

## बँकिंग आणि निधी

- मुद्रा योजने अंतर्गत सूक्ष्म वित्तीय संस्थांना पूर्नवितीय सहाय्य करण्यासाठी २०,००० कोटी रुपयांच्या निधीसह मुद्रा बँकेची स्थापना. ही बँक आत्तापर्यंत वित्तीय सहाय्य न मिळालेल्या उद्योगांना निधी पुरवेल.

- आय आय आणि एफ डी आय मध्ये सरकार फरक करुन मिश्र मर्यादांनुसार त्या ठरविल्या जातील. संस्थात्मक बँकिंग च्या माध्यमातून आर्थिक समावेशकतेला प्रोत्साहन देण्यासाठी सरकार टपाल सेवेचा अधिकाधिक वापर करणार

## शासन

- पैशावर चाप बसविण्यासाठी सर्वसमावेशक नवीन कायदा या कायद्या अंतर्गत १० वर्षाच्या कठोर कारावसाची शिक्षा होणार

- व्यवहार निर्बंध विधेयक संसदेत सादर करणार

- एकछत्री नियंत्रण प्रणाली राबविण्यासाठी वायदा बाजार सेबी अंतर्गत आणणार

- २०१५-१६ मध्ये सुलभ व्यवसायाकरीता सरकार सर्वसमावेशक दिवळखोर कोड लागू करणार

- यंत्रणेच्या कायद्याचा मसूदा तयार करण्यासाठी सरकार तज्ञ समिती स्थापन करण्याची योजना आखत आहे.

## सामाजिक कल्याण

- योग्य नियोजन ही काळाची गरज आहे. थेट लाभ हस्तांतरणामुळे अनुदानामध्ये होणारी गळती ब-याच अंशी कमी होण्यास मदत होईल.

- २ लाख रुपयांचे संरक्षण कवच असणारी पंतप्रधान सुरक्षा विमा योजना सुरु करणार असून याचा वार्षिक हप्ता १२ रुपयांचा असेल. ही योजना थेट जन धन योजनेशी जोडली जाईल.

- नागरीक कल्याण निधी

- युवकांसाठी नई मंझिल ही नवी योजना जाहीर करण्यात आली आहे.

- भारत योजने अंतर्गत ५० लाख प्रसाधन गृह याआधीच बांधण्यात आली असून ६ कोटी प्रसाधनगृहाचे लक्ष्य आहे.

मनुष्य बळ विकास :

- काश्मिर, पंजाब, तामिळनाडू, हिमाचल प्रदेश आणि आसाम मध्ये एम्स ची स्थापना

- एस एम धनबादचे अद्ययावतीकरण करुन त्याचे आय आय टी मध्ये रुपांतर करणार. कर्नाटक मध्ये नीवन आय आय टी स्थापन करणार.

## पर्यटन

- प्रोत्साहन देण्यासाठी आगमन व्हिसाची सुविधा आता १५० देशांसाठी करण्यात आली आहे. सध्या ही सुविधा फक्त ४३ देशांना मिळत होती.

# चौदावा वित्त आयोग : राजकोषीय संघीयवाद

**संजय बाबुराव महाजन**



**संवैधानिक सरकारच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन केंद्र व राज्यांना संसाधनांच्या विभाजनाच्या आधारे विकासात्मक बदल, निर्णय घेता यावेत यासाठी २ जानेवारी २०१३ ला १४ व्या वित्त आयोगाची स्थापना डॉ. वाय. व्ही. रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली या ओगाकडे स्थिर व स्थायी राजकोषीय वातावरण निर्माण करणे, वित्त संसाधनांच्या स्थितीवर विचार, आर्थिक तुट व कर्ज बाबींचा विचारांवर शिफारसी सुचविण्याचे कार्य देण्यात आले. या आयोगाने १५ डिसेंबर २०१४ ला आपल्या शिफारशी राष्ट्रपतीकंडे सादर केल्या. यामध्ये प्रामुख्याने केंद्राकडून विविध राज्यांना देण्यात येणारा विकास निधी, राज्यांची लोकसंख्या, राज्यांचे दरडोई उत्पन्न, योजना खर्च, विविध सामाजिक अनुदान योजनांसाठीची अंदाजपत्रकीय तरतूद आणि राज्यांपुढील हा निधी योग्य प्रमाणात खर्च करण्याबाबतची आव्हाने याबाबत शिफारशी केल्या. प्रस्तुत लेखाद्वारे १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशींवर प्रकाश टाकला आहे.**

वित्त आयोग ही भारतीय संवैधानिक अनुच्छेद २८० अंतर्गत स्थापन करण्यात येणारी एक सांविधानिक संस्था आहे. संविधानाने सरकारच्या बदलत्या गरजा आणि परिस्थिती यामुळे केंद्र व राज्यांदरम्यान संसाधनाच्या विभाजन आधारामध्ये वेळोवेळी परिस्थितीनुसार परिवर्तनाची आवश्यकता राहील, हया तथ्याच्या स्वीकार केला आहे. संविधानाने केंद्र आणि राज्यांमध्ये संसाधन विभाजनासाठी कोणताही निश्चित असा सिध्दान्त किंवा नियम निर्धारित केलेला नाही. परंतु संविधानात प्रत्येक पाच वर्षांनी किंवा त्याअगोदर वित्तीय संसाधनांच्या स्थितीची पडताळणी (समीक्षा) करणे आणि एक स्थिर व स्थायी राजकोषीय वातावरण निर्माण करण्यासाठी वित्त आयोगाची स्थापना करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या वित्त आयोगाची केंद्र व राज्यांच्या वित्तीय संसाधन वाटपामधील भूमिका अत्यंत महत्वाची आहे. कारण या वित्त आयोगाच्या शिफारशींमुळे परिस्थितीतील बदलांनुसार व आवश्यकतेनुसार केंद्र व राज्यांमधील वित्तीय संसाधनांत परिवर्तन करता येणे शक्य होते. अर्थात केंद्र व राज्यांच्या वित्तीय संबंधात एक प्रकारची लवचिकता निर्माण होण्यास मदत झाली आहे. हया आयोगाकडून विभाज्य साठयामधून केंद्र व राज्यांत करांच्या हस्तांतरणासंबंधात शिफारशी करण्यात येतात. या साठयांतर्गत अधिभार (Surcharges) आणि उपकरांसहित सर्व केंद्रिय करांचा समावेश होतो. या करांना राज्यांमध्ये विभाजित करण्याचा केंद्रास सांविधानिक स्वरूपात अधिकार मिळाला आहे.

**चौदावा वित्त आयोग; (The Fourteenth Finance Commission - FFC) :-** या वित्त आयोगाची डॉ.वाय.व्ही. रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली २ जानेवारी २०१३ रोजी नियुक्ती करण्यात आली होती. या आयोगाकडे पद्ध केंद्र आणि राज्यांच्या साधनांच्या स्थितीचा पुनर्विचार करणे ii) एक स्थिर व स्थायी राजकोषीय वातावरण निर्माण करणे iii)सहाय्यता अनुदानांची (राज्यांना योजना भिन्न अनुदान (Non-Plan Grants to States) राशी व वितरणास अधिशासित करणारी तत्वे iv) स्थानिक सरकारांना संसाधने पुरविण्यासंदर्भात आवश्यकता असल्यास राज्य सरकारी वित्तीय साधनांत वाढ करण्यासाठीचे उपाय v) सरकारी विविध स्तरावरील वित्त संसाधनांची स्थिती आणि vi) तूट व ऋण अटींचा पुनर्विचार करण्याच्या हेतूने शिफारशी करण्याचे कार्य सोपविण्यात आले होते. आयोगाने १५ डिसेंबर २०१४ रोजी आपला अहवाल मा. राष्ट्रपतींकडे सुपूर्द केला.

**१४ व्या वित्त आयोगाच्या**

**प्रमुख शिफारशी :-** या आयोगाने सन २०१५.१६ ते २०२०.२१ या कालावधीसाठी आपल्या शिफारशी दिल्या आहेत. या शिफारशींचा केंद्र-राज्य संबंध, अंदाजपत्रक निर्धारण आणि केंद्र व राज्यांची वित्तीय स्थिती यावर प्रामुख्याने प्रभाव पडण्याची शक्यता आहे. काही प्रमुख शिफारशी पुढील प्रमाणे आहेत. १) या आयोगाने केंद्रिय विभाज्य संचयामधील (Central Divisible Pool) राज्यांचा हिस्सा वर्तमान ३२% वरून वाढवून ४२ % करण्याची शिफारस केली आहे. हा हिस्सा मागील दोन वित्त आयोगांनी अर्थात बाराव्या वित्त आयोगाने (सन २००५.२०१०) आणि तेराव्या वित्त आयोगाने (सन २०१०.२०१५) केंद्रिय विभाज्य संचयामधील राज्यांचा हिस्सा क्रमश: ३०.५% ची (१% ची वृध्दी) आणि ३२% ची (१.५: ची वृध्दी) शिफारस केली होती. २) या आयोगाने राज्यांदरम्यान विभाज्य संचयातील राज्याच्या वितरणासाठी नवीन क्षितिजसमांतर सुत्राची (पध्दतीची) देखील शिफारस केली आहे.

**१३व्या व १४ व्या वित्त आयोगातील क्षैत्रिज्य समांतरीय मुल्यमापन पद्धत**

| विविरण | Weights Accorded | |
|---|---|---|
| | १३वा वित्त आयोग | १४वा वित्त आयोग |
| लोकसंख्या (१९७१) | 25 | 175 |
| लोकसंख्या (२०११) | 0 | 10 |
| आर्थिक क्षमता / उत्पन्नातील अंतर | 47.5 | 50 |
| क्षेत्र | 10 | 15 |
| जंगल क्षेत्र | 0 | 7.5 |
| आर्थिक नियम | 17.5 | 0 |
| एकुण | 100 | 100 |

स्त्रोत - आर्थिक सर्वेक्षण - २०१४-१५, वित्तमंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली पेज क्र. १३१

३) सन २०१५.१६ मध्ये राज्यांना सुमारे एकूण ५.२६ कोटी रूपयांचा हिस्सा मिळणार आहे. सन २०१४.१५ मध्ये ही रक्कम ३.८४ लाख कोटी रूपयांची होती. अर्थात राज्यांना जवळपास १.७८ लाख कोटी रूपयांची अतिरिक्त वाढ मिळणार आहे. विभाजन पध्दतीमधील या परिवर्तनाद्वारे राज्यांच्या राजकोषीय संघीय संबंधामधील असणाऱ्या विषमतेच्या चिंतांचे समाधान होण्याची शक्यता आहे. राज्ये उत्पादक भांडवली माल मत्ता निर्माण करण्यसाठी त्यांच्याकडील उपलब्ध अतिरिक्त वित्तीय सोयींचा अवलंब करतील आणि निती (NITI) मध्ये टीम इंडिया (Team India) या संदर्भात अपेक्षित मार्गदर्शन व देखरेख करेल अशी आशा आहे. ४) आयोगाने संविधानाच्या अनुच्छेद २७५ च्या अधीन राहून राजस्व तूट, स्थानिक संस्था आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी राज्यांना राजस्व सहाय्यता अनुदानाची शिफारस केली आहे. ५) आयोगाने सन २०१५ ते २०२० या कालावधीसाठी राज्यांच्या राजस्व आणि खर्चाचे आकलन केले आहे आणि केंद्रिय करांमध्ये त्या राज्यांचा हिस्सा राशीला लक्ष्यात घेतल्यानंतर प्रत्येक राज्यासाठी तुटीचा अंदाज बांधला. या आयोगाने अकरा राज्यांच्या राजकोषीय तुटीची पूर्तता करण्यासाठी १९४८२१ कोटी रूपयांचे

अनुदान देण्याची शिफारस केली आहे. ६) स्थानिक संस्थांच्या बाबतीत आयोगाने अशी शिफारस केली आहे की, स्थानिक संस्थांनी संबंधित कायदयाच्या अधीन राहून त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या कार्यातर्गत केवळ मुलभूत सेवांवर अनुदान खर्च करणे अपेक्षित असावे. आयोगाकडे अशी शिफारस करण्यात आली आहे की, २०११ च्या जनगणनेनुसार ९०% आणि क्षेत्रीय विकास करीत असतांना राज्यांना स्थानिक संस्थासाठी १०% भार शुल्कासह अनुदानाचे वितरण केले जावे. राज्यांसाठी अनुदान हे दोन भागांमध्ये विभाजित करण्यात येईल जसे i) अनुदान कायदेशीररित्या स्थापन करण्यात आलेल्या ग्रामपंचायतींसाठी आणि ii) शहरी आणि ग्रामीण लोकसंख्येच्या आधारावर कायदेशीररित्या स्थापन करण्यात आलेल्या नगरपालिकांसाठी राहील आयोगाने सन २०१५,२०२० एकूण २,८७,४३६ कोटी रूपयांच्या अनुदानाची शिफारस केली आहे. आयोगाने अनुदानांची दोन भागांत शिफारस केली आहे. सांविधानिक स्वरूपात ग्रामपंचायती (Rural Local Bodies) आणि नगरपालिकांसाठी i) मुलभूत अनुदान आणि ii) कामगिरी अनुदान मुलभूत पासून ते कामगिरी अनुदानाचे प्रमाण हे ग्राम पंचायतींसाठी ९०:१० आणि नगरपालिकांसाठी ८०:२० आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येणाऱ्या वित्तीय सहाय्यतेसाठी २०११ ची जनगणना हा निकष लावला आहे. ग्रामपंचायतींसाठी आयोगाने सर्व राज्यांना १,८०,२६२,९६ कोटी रूपयांचे पायाभूत अनुदान (Basic Grant) आणि २०,०२९,२२ कोटी रूपयांच्या कामगिरी अनुदानाची (Performance Grant) शिफारस केली आहे. तसेच नगरपालिकांसाठी सर्व राज्यांसाठी ६९,७१५,०३ कोटी रूपयांचे पायाभूत अनुदान आणि १७,४२८,७६ कोटी रूपयांच्या कामगिरी अनुदानाची शिफारस केली आहे. ७) आयोगाने आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ आणि वस्तू व सेवा करांची संभाव्य अंमलबजावणी लक्षात घेऊन मदत खर्चाच्या (Relief Expenditure) वित्तपोषणाच्या वर्तमान व्यवस्थेची समीक्षा केली आहे. आयोगाने बक्षीस कालावधीसाठी सर्व राज्यांच्या राज्य आपत्ती निधीमध्ये एकूण निधीतील संग्रहित राशी स्वरूपात ६१,२१६ कोटी रूपयांची शिफारस केली आहे. राज्ये या बक्षीस कालावधी दरम्यान राज्य आपत्ती निवारण निधीत (State Disaster Relief Fund - SDRF) १०% चे ६१२२ कोटी रूपयांचे / अंशदान/योगदान देतील आणि उर्वरित ९०% ;५५,०९८ कोटी रूपयांचे केंद्र सरकार करेल. आयोगाने अशी शिफारस केली आहे की, या निधी अंतर्गत उपलब्ध निधीच्या १०% पर्यंत निधी हा राज्यांद्वारे अशाप्रकारची आपत्ती आल्यास तिच्या निवारण्यासाठी वापरला जाऊ शकतो. हा निधी राज्य आपल्या स्थानिक मर्यादेअंतर्गत आपत्ती स्वरूपात मानते आणि हा निधी गृह मंत्रालयाच्या आपत्ती संबंधातील अधिसूचित यादीमध्ये समाविष्ट असत नाही. वस्तू व सेवा कर (Goods and Services Tax-GST) लागू झाल्यानंतर आपत्ती निवारण निधीच्या वाटपाचा नव्याने विचार करण्यात येणार आहे.

**राजकोषीय संघीयवादासाठी चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारशीचे सूचितार्थ / निहितार्थ - आगामी व्यवस्था**

चौदाव्या वित्त आयोगाने आपल्या शिफारशी आणि प्रक्षेपण आधारावर राज्यांच्या महसूलासाठी भविष्यकालीन राशीचे मूल्यमापन व निर्धारण करण्याची आवश्यकता असल्याचे स्पष्ट केले आहे. या विश्लेषणात महसूली राशीचे मूल्यमापन करण्यासाठी अलीकडील आकडेवारीचा (२०१४-१५) आधार घेण्यात आला आहे. आणि हे साधारणत: स्थूल राष्ट्रीय उत्पन्न (GDP) करांमधील वाढ व इतर राजकोषीय मापदंडा बाबतीतील मान्यतेपासून भिन्न आहे. सन २०१४-१५ व सन २०१५-१६ च्या संबंधातील निश्चित मान्यतांवर अंदाजित लाभ (कर हस्तांतरणापासून व १४ व्या वित्त आयोगाच्या अनुदानापासून) पुढील पत्रकामध्ये दर्शविला आहे.

| चौदाव्या वित्त आयोगाचे अतिरिक्त हस्तांतरण (२०१४-१५ मधुन २०१५-१६) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| राज्य | वर्गवारी | एफएफसी कडून लाभ कोटी मध्ये | दरडोई उत्पन्न | ओटीआर | एनएसडीपी मधिल लाभ |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| आन्ध्र प्रदेश | GCS | 14620 | 1728 | 27.4 | 2.2 |
| अरुणाचल प्रदेश | GCS | 5585 | 40359 | 1758.1 | 51.0 |
| असाम | GCS | 7295 | 2338 | 95.5 | 5.8 |
| बिहार | GCS | 13279 | 1276 | 105.3 | 4.9 |
| छत्तीसगड | GCS | 7227 | 2829 | 67.5 | 5.2 |
| गोवा | GCS | 1107 | 7591 | 44.1 | 3.0 |
| गुजरात | GCS | 4551 | 753 | 10.3 | 0.8 |
| हरियाणा | GCS | 1592 | 628 | 7.8 | 0.5 |
| हिमाचल प्रदेश | GCS | 8533 | 12430 | 207.7 | 14.6 |
| जम्मू आणि काश्मिर | GCS | 13970 | 11140 | 294.4 | 22.4 |
| झारखंड | GCS | 6196 | 1878 | 89.1 | 4.8 |
| कर्नाटक | GCS | 8401 | 1375 | 18.1 | 1.8 |
| केरला | GCS | 9508 | 2846 | 37.0 | 3.1 |
| मध्य प्रदेश | GCS | 15072 | 2075 | 55.9 | 4.5 |
| महाराष्ट्र | GCS | 10682 | 951 | 12.2 | 0.9 |
| मणीपुर | GCS | 2130 | 8286 | 578.7 | 19.5 |
| मेघालय | GCS | 1381 | 4655 | 198.0 | 8.6 |
| मिजोरम | GCS | 2519 | 22962 | 1410.1 | 33.3 |
| नागालॅंड | GCS | 2694 | 13616 | 886.5 | 18.7 |
| ओरिसा | GCS | 6752 | 1609 | 50.2 | 3.2 |
| पंजाब | GCS | 3457 | 1246 | 18.3 | 1.4 |
| राजस्थान | GCS | 6479 | 945 | 25.5 | 1.6 |
| सिक्कीम | GCS | 1010 | 16543 | 343.7 | 10.7 |
| तामिळनाडु | GCS | 5973 | 828 | 10.0 | 0.9 |
| त्रिपुरा | GCS | 1560 | 4247 | 181.8 | 6.9 |
| उत्तर प्रदेश | GCS | 24608 | 1232 | 46.8 | 3.5 |
| उत्तराखंड | GCS | 1303 | 1292 | 23.2 | 1.4 |
| पं. बंगाल | GCS | 16714 | 1831 | 67.0 | 3.0 |
| **एकुण** | | **204198** | **1715** | | |

GCS सर्वसाधारण राज्ये, SPC विशेष सुचीतील राज्ये, NSDP - निव्वळ देशांतर्गत उत्पादन घेणारी राज्ये, OTR स्वकर महसुल, स्त्रोत - आर्थिक सर्वेक्षण २०१४-१५, वित्तमंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली

सन २०१४.१५ च्या तुलनेत सन २०१५.१६ मध्ये चौदाव्या वित्त आयोग हस्तांतरणामधील एकूण वृध्दी ही सुमारे दोनलाख कोटी रूपये राहील असा अंदाज आहे. समग्र संदर्भात चौदाव्या वित्त आयोग शिफारशी हस्तांतरणापासून सर्वच राज्यांना लाभ मिळणार आहे. तरी देखील वितरण प्रभावाच्या मूल्यमापनासाठी वर्तमान बाजार मूल्यावर निव्वळ राज्य घरगुती उत्पादन लोकसंख्या किंवा राज्याची स्वयं कर महसूल मिळकत इत्यांदीना मानक बनविले जाते. सामान्य श्रेणीतील राज्यांतर्गत समग्र संदर्भात उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेश या राज्यांना सर्वाधिक लाभ प्राप्त होणार आहे. तर विशेष श्रेणी लाभ प्राप्त राज्यात जम्मू व काश्मीर, हिमाचल प्रदेश आसाम ही राज्ये आहेत. या राज्यांच्या प्रभावाचे चांगले प्रमाण प्रतिव्यक्ति उत्पन्न हे आहे. प्रतिव्यक्ति लाभाच्या संदर्भात प्रमुख लाभांन्वित राज्यांत सामान्य श्रेणीतील केरळ, छत्तीसगड आणि मध्यप्रदेश ही राज्ये आहेत तर विशेष श्रेणी राज्यांत अरूणाचल प्रदेश, मिझोराम आणि सिक्कीम या राज्यांचा समावेश होतो. या आयोगाच्या शिफारशी हया राज्यांच्या अंदाजपत्रकातील व्यय क्षमतेत महत्वपूर्ण वृध्दी करतील अशी अपेक्षा आहे. अतिरिक्त व्यय क्षमतेला चालू बाजार मूल्यांवर निव्वळ राज्य घरगुती उत्पादन (NSDP) हे या राज्यांच्या स्वंय कर महसूलातील लाभप्राप्तीनुसार मोजले जाऊ शकते. (NSDP) वर आधारित प्रभाव संदर्भात पाहता सामान्य सेवांच्या राज्यांत चौदाव्या वित्त आयोगाच्या हस्तांतरणाचा महत्तम लाभ हा छत्तीसगड, बिहार, झारखंड या राज्यांना झाला आहे आणि विशेष श्रेणीतील राज्यांत अरूणाचल प्रदेश, मिझोराम, जम्मू आणि काश्मीर ही राज्ये प्रमुख आहेत. राज्यांचा स्वंय कर महसूल संदर्भात विचार करता सामान्य श्रेणीतील राज्यांत बिहार, छत्तीसगड आणि झारखंड ही राज्ये आहेत. तर विशेष श्रेणी राज्यांत अरूणाचल प्रदेश, मिझोराम आणि नागालँड ही राज्ये आहेत. चौदाव्या वित्त आयोग च्या हस्तांतरणाचा अधिक चांगल्या प्रकारे प्रभाव हा अपेक्षितरित्या निम्न विकसित राज्यांच्या तुलनेत सामान्य श्रेणीतील राज्यांसाठी अधिक लाभकारक आहे. यावरून (FFC) चे हस्तांतरण हे प्रगतिशील असल्याचे स्पष्ट होते. अर्थात निम्न प्रतिव्यक्ति (NSDP) असणाऱ्या राज्यांसाठी अपेक्षितरित्या अधिक हस्तांतरण आहे. (NSDP) आणि (FFC)हस्तांतरणा दरम्यान ०.७२ चा संबंध आहे. यावरून (FFC) च्या शिफारशीनी राज्यादरम्यान उत्पन्न आणि राजकोषीय विषमतेस समान महत्व दिले असल्याचे स्पष्ट होते. तरी देखील (FFC) चे हस्तांतरण हे तेराव्या वित्त ओयागाच्या (FFC) तुलनेत थोडे कमी प्रगतिशील आहे. प्रतिव्यक्ति (NSDP) आणि (TFC) मधील सहगुणक आणि सहसंबंध हा प्रतिव्यक्ति ०.८४ आहे. अंतिमत: इच्छित निष्कर्ष ज्याप्रमाणे विभाज्य संचयातील वृध्दीमुळे क्षितिजसमांतर सूत्रांतर्गत कर हस्तांतरण माध्यमातून संसाधनांच्या हस्तांतरणाचा विघटनाशी संबंध आहे. विभाज्य संचयातील महत्वाचा प्रभाव हा उत्तरप्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल आणि आंध्र प्रदेश यासारख्या राज्यांवर पडला आहे तर अरूणाचल प्रदेश, छत्तीसगड, मध्य प्रदेश, कर्नाटक आणि झारखंड सारखी राज्ये ही क्षितिज समांतर हस्तांतर पध्दतीमधील (Horizontal Devolution Formula) परिवर्तनामुळे प्रमुख लाभ प्राप्तकर्ती ठरली आहेत.

**चौदाव्या वित्त आयोगाद्वारे राज्यांना वाटप केलेला निधी**

| राज्ये | एफएफसी मध्ये राज्यांचा वाटा | राज्यांचा एफएफसी मध्ये वाटा | एफएफसीचे विभाजन आणि वाटप | |
|---|---|---|---|---|
| | | | भागश्रालीतील बदलीमुळे | राज्यांना वाटप केलेल्या निधी |
| आंध्र प्रदेश | 0.06742 | 0.06937 | 107.5 | -7.5 |
| अरुणाचल प्रदेश | 0.0137 | 0.00328 | 24.9 | 75.1 |
| आसाम | 0.03311 | 0.03628 | 129.0 | -29.0 |
| बिहार | 0.09665 | 0.10917 | 142.08 | -42.8 |

| राज्ये | एफएफसी मध्ये राज्यांचा वाटा | राज्यांचा एफएफसी मध्ये वाटा | एफएफसीचे विभाजन आणि वाटप | |
|---|---|---|---|---|
| | | | भागश्रालीतील बदलीमुळे | राज्यांना वाटप केलेल्या निधी |
| छत्तीसगढ | 0.0308 | 0.0247 | 64.9 | 35.1 |
| गोवा | 0.00378 | 0.00266 | 53.9 | 46.1 |
| गुजरात | 0.03084 | 0.03041 | 96.7 | 3.3 |
| हरियाणा | 0.01084 | 0.01048 | 92.3 | 7.7 |
| हिमाचल प्रदेश | 0.00713 | 0.00781 | 128.9 | -28.9 |
| जम्मु आणि काश्मीर | 0.01854 | 0.01551 | 69.5 | 30.5 |
| झारखंड | 0.03139 | 0.02802 | 78.2 | 21.8 |
| कर्नाटक | 0.04713 | 0.04328 | 82.7 | 17.3 |
| केरला | 0.025 | 0.02341 | 86.1 | 13.9 |
| मध्य प्रदेश | 0.07548 | 0.0712 | 87.4 | 12.6 |
| महाराष्ट्र | 0.05521 | 0.05199 | 87.1 | 12.9 |
| मणीपुर | 0.00617 | 0.00451 | 56.6 | 43.4 |
| मेघालय | 0.00642 | 0.00408 | 47.7 | 52.3 |
| मिजोरम | 0.0046 | 0.00269 | 43.7 | 56.3 |
| नागालॅंड | 0.00498 | 0.00314 | 47.3 | 52.7 |
| ओरिसा | 0.04642 | 0.04779 | 107.7 | -7.7 |
| पंजाब | 0.01577 | 0.01389 | 76.2 | 23.8 |
| राजस्थान | 0.05495 | 0.05853 | 118.4 | -18.4 |
| सिक्किम | 0.00367 | 0.00239 | 49.0 | 51.0 |
| तामिळनाडु | 0.04023 | 0.04969 | 207.5 | -107.5 |
| त्रिपुरा | 0.00642 | 0.00511 | 64.1 | 35.9 |
| उत्तर प्रदेश | 0.17959 | 0.19677 | 129.0 | -29.0 |
| उत्तराखंड | 0.01052 | 0.0112 | 118.2 | -18.2 |
| पं. बंगाल | 0.07324 | 0.07264 | 98.0 | 2.0 |
| आर्थिक सर्वेक्षण २०१४-१५ वित्तमंत्रलय भारत सरकार नवी दिल्ली | | | | |

**राजकोषीय स्वायत्तता आणि राजकोषीय अनुमांनामधील समतोल**:- ओयागाच्या शिफारशीमधील विचार हा राज्यांना स्वत: हस्तांतरण करण्याचा आहे. जेणेकरून त्यांना अधिकाधिक राजकोषीय स्वायत्तता दिली जाऊ शकेल आणि विभाज्य संचयातील राज्यांचा हिस्सा हा ३२% वरून ४२% पर्यंत वाढवून निश्चित करण्याचा आहे. FFC च्या शिफारशींची यथावत कार्यवाही करण्यात आल्यास त्याचा राजकोषीय अनुमानांवर किंवा केंद्राच्या राजकोषीय सुदृढीकरण मार्गावर प्रतिकूल परिणात घडून येईल. तरी देखील हे निर्धारण करण्यासाठी केंद्राच्या राजकोषीय अनुमानांना प्राप्त करण्याची गरज आहे. असे सूचित करण्यात येत आहे की, राज्यांना केंद्राकडून देण्यात येणाऱ्या सहाय्यतेमध्ये (Central Assistance to States-CAS) समप्रमाणात कपात (Commensurate Reductions) केली जावी. यासच नियोजित हस्तांतरण म्हणून ओळखले जाते. CAS हस्तांतरण हे मध्यम पुरोगामी (Mildly Progressive) आहे. ही बाब त्वरित ध्यान देण्यास योग्य तथ्य आहे. राज्यांचा प्रतिव्यक्ति NSDP बरोबरील असणारा सहसंबंध सहगुणक (correlation Coefficient) हा -०.२९ आहे.

राज्यांच्या वाढत्या राजकोषीय स्वायत्ततेला केंद्राची राजकोषीय सोय टिकवून ठेवण्याबरोबरच समतोल साधण्यात केंद्राकडून राज्यांना मिळणाऱ्या अर्थसहाय्य हस्तांरतणामध्ये कपात करण्याचा समावेश आहे. परंतु उपरोक्त कार्य करण्यासाठी अशा अनेकविध पध्दती आहेत की, ज्या विवेकशील पध्दतीपासून ते सूत्र आधारित आहेत. उपरोक्त पध्दतीमध्ये देखील पऱ्याय आहेत. i) CAS हस्तांतरणा संबंधात विविध राज्यांत समप्रमाणात कपात ii) कायदेशीर समर्थन प्राप्त/अधिकृत योजनांची कार्यवाही निश्चित करणे आणि पुन्हा उर्वरित समप्रमाणात कपात करणे iii) CAS हस्तांरतणाचे प्रतिव्यक्ति समाज वितरण iv) कायदेशीर समर्थन प्राप्त योजनांची कार्यवाही करणे आणि पुन्हा उर्वरित राशीचे वितरण, कर हस्तांतरणाशी संबंधित FFC पध्दतीनुसार करणे इत्यादी.

आर्थिक पाहणी २०१४-१५ मध्ये हा विषय सहजरित्या समजावा म्हणून केवळ CAS (Central Assistance to States) हस्तांतरणाशी संबंधित विविध राज्यांत सम प्रमाणात कपात या पर्यायाचा विचार करण्यात आला आहे. आर्थिक पाहणी २०१४-१५ मध्ये राज्यांना देण्यात आलेल्या निव्वळ आधिक्याचे मापन करण्यात आले आहे. अर्थात CAS हस्तांतरणातील कपातीमध्ये घट करून FFC हस्तांतरणातील वृध्दी दरम्यानची तफावत आणि हा परिणाम पुढील पत्रकात दर्शविला आहे.

**सीएएस हस्तांतरणानंतर एकुण अधिभार / किंवा तूट परंतु मध्यमर्ती राजकोषीय स्थान जतनासाठी निधी**

| राज्ये | सीएएस हस्तांतरणानंतर एकुण अधिभार | मध्यमर्ती राजकोषीय स्थान जतनासाठी निधी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रत्यक्ष कोटी रुपयांमध्ये | प्रती भाग भांडवल रुपयांमध्ये | एनएसडीपी | ओटीआर टक्केवारी |
| आंध्र प्रदेश | 5062 | 10134 | 1198 | 1.5 | 19.0 |
| अरुणाचल प्रदेश | 2555 | 4572 | 33038 | 41.8 | 1439.2 |
| आसाम | 5860 | 4378 | 1403 | 3.5 | 57.3 |
| बिहार | 6998 | 8783 | 844 | 3.2 | 69.6 |

| राज्ये | सीएएस हस्तांतरणानंतर एकुण अधिभार | मध्यमर्ती राजकोषीय स्थान जतनासाठी निधी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रत्यक्ष कोटी रुपयांमध्ये | प्रती भाग भांडवल रुपयांमध्ये | एनएसडीपी | ओटीआर टक्केवारी |
| छत्तीसगढ | 2673 | 5258 | 2058 | 3.8 | 49.1 |
| गोवा | 180 | 995 | 6820 | 2.7 | 39.6 |
| गुजरात | 4179 | 2454 | 406 | 0.4 | 5.5 |
| हरियाणा | 1509 | 714 | 282 | 0.2 | 3.5 |
| हिमाचल प्रदेश | 3593 | 6826 | 9944 | 11.7 | 166.2 |
| जम्मु आणि काशमिर | 8185 | 10679 | 8515 | 17.1 | 225.0 |
| झारखंड | 2870 | 4650 | 1410 | 3.6 | 66.9 |
| कर्णाटक | 4873 | 5300 | 867 | 1.1 | 11.4 |
| केरला | 2778 | 7834 | 2345 | 2.5 | 30.5 |
| मध्य प्रदेश | 7959 | 10389 | 1431 | 3.1 | 38.5 |
| महाराष्ट्र | 5365 | 7496 | 667 | 0.6 | 8.6 |
| मणीपुर | 2029 | 1250 | 4861 | 11.4 | 339.5 |
| मेघालय | 1536 | 661 | 2229 | 4.1 | 94.8 |
| मिजोरम | 1157 | 1967 | 17925 | 26.0 | 1100.7 |
| नागालॅंड | 2019 | 1839 | 9293 | 12.7 | 605.0 |
| ओरिसा | 6826 | 3497 | 833 | 1.7 | 26.0 |
| पंजाब | 1820 | 2478 | 893 | 1.0 | 13.2 |
| राजस्थान | 6618 | 2423 | 353 | 0.6 | 9.5 |
| सिककीम | 1415 | 489 | 8006 | 5.2 | 166.3 |
| तामिळनाडु | 2376 | 2644 | 366 | 0.4 | 4.4 |
| त्रिपुरा | 2139 | 458 | 1246 | 2.0 | 53.3 |
| उत्तर प्रदेश | 9110 | 18716 | 937 | 2.7 | 35.6 |
| उत्तराखंड | 3014 | -48 | -48 | -0.1 | -0.9 |
| पं. बंगाल | 8386 | 11365 | 1245 | 2.0 | 45.6 |
| **एकुण** | **113081** | **138198** | | | |

स्त्रेत - आर्थिक सर्वेक्षण २०१४-१५, वित्त मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली

वरील पत्रकामध्ये सन २०१५.१६ मध्ये FFC आणि CAS हस्तांतरणाद्वारे मिळणाऱ्या लाभाची राज्यनिहाय तुलना करण्यात आली आहे. स्तंभ .३ मध्ये दर्शविण्यात आलेल्या आधिक्याचे/ तुटीचे मुल्य हे सन २०१४.१५ च्या तुलनेत सन २०१५.१६ मधील थ्थ्ब् द्वारे प्राप्त एकूण लाभ आणि CAS मधील कपात या दोहोतील तफावतीचे मापन करून काढण्यात आले आहे. जर राज्ये ही केंद्राद्वारे पुरस्कृत योजनांचा स्वीकार करू इच्छित नसतील तर FFC हस्तांतरणाद्वारे घडून आलेली वाढ हे नवीन भाररहित (Unencumbered Money) मुद्रा आहे. FFC हस्तांतरण माध्यमातून CAS कपात घटविण्यात आली आहे. तरी देखील निव्वळ GCS (General Category States- GCS) राज्ये ही लाभ प्राप्त करीत आहेत. GCS अंतर्गत शीर्ष (Top) तीन राज्ये लाभप्राप्त करीत आहेत. यामध्ये उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि मध्यप्रदेश या राज्यांचा समावेश आहे. तर SCS (Special Cateory States - SCS) संबंधात जम्मू काश्मिर, हिमाचल प्रदेश आणि अरूणाचल प्रदेश ही राज्ये आहेत. आधिक्य/तुटीस मापन करण्याची अधिक योग्य पध्दती ही प्रतिव्यक्ति संदर्भातील राहील. गोवा, केरळ आणि छत्तीसगड ही राज्ये GCS चा मुख्य लाभ प्राप्त करणारी राज्ये आहेत आणि SCS संबंधात अरूणाचल प्रदेश, मिझोराम आणि हिमाचल प्रदेश ही राज्ये आहेत. वर्तमान बाजार मूल्यानुसार NSDP च्या टक्के स्वरूपात आधिक्य/ तूट वरील पत्रक स्तंभ.५ मध्ये दर्शविण्यात आली आहे. GCS संबंधात राजकोषीय संसाधनात महत्तम वृध्दी करणारी राज्ये छत्तीसगड, झारखंड, बिहार ही आहेत तर विशेष श्रेणी संबंधात अरूणाचल प्रदेश, मिझोराम, जम्मू आणि काश्मीर ही राज्ये आहेत. हे आधिक्य राज्यांच्या महसूलात उल्लेखनीय वाढ घडवून आणेल. सामान्य श्रेणी राज्यांसंदर्भात अशी नऊ राज्ये आहेत की, जी आपल्या स्वयं कर महसूलाच्या २५% पेक्षा अधिक प्राप्त करण्याची अपेक्षा आहे.

**समस्या :-** या कवायतीसंदर्भात काही समस्यांची नोंद घेतली जावी. १) ते २०१४.१५ आणि २०१५.१६ संदर्भात GDP मधील वृध्दी, महसूल आणि खर्चासंबंधातील अनुमानाबाबतीत पूर्वानुमानांप्रती संवेदनशील आहे. ii) २०१४.१५ मध्ये CAS राशीबाबतीत आणि २०१५.१६ मध्ये CAS अनुमानातील कपातीसंबंधात देखील अंदाज बांधण्यात आला आहे. त्यामुळे यास व्याख्यात्मक मोजमापन मानले पाहिजे उदा. आणखीन एक पऱ्याय असा राहील की, राज्य सूचीमध्ये समाविष्ट योजनांना पुन्हा राज्यांकडेच हस्तांतरित केले जावे. तसेच हा अंदाज केवळ सन २०१५.१६ साठीच व्यक्त करण्यात आला आहे. यानंतर वस्तू व सेवा कराची कार्यवाही आणि सातवा वेतन आयोग यासारखे घटक हे पुढील वर्षापासून यापुढील अनुमानांना प्रभावित करतील.

**समारोप :-** चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी केल्यामुळे कर हस्तांतरणात दूरगामी अशी परिवर्तने घडून येतील. या परिवर्तनांमुळे राज्यांना अधिक वित्तीय स्वायतत्ता मिळेल व देश उत्तम राजकोषीय संघीयवादाच्या दिशेने वाटचाल करेल. यामध्ये राज्यांकडे करण्यात येणाऱ्या इतर केंद्रिय हस्तांतरणांना कमी करण्यासाठी FFC द्वारे प्रेरित अनिवार्यतांमध्ये देखील वृध्दी घडून येईल. अर्थात राज्यांकडे महसूल आणि खर्च या बाबतीत अधिक स्वायत्तता राहील. आकडेवारीवरून स्पष्ट होते की, राजकोषीय संघवादाच्या दिशेने नव्याने देण्यात येणारे महत्व हे केंद्राच्या राजकोषीय क्षमतेस प्रतिकूल असण्याची आवश्यकता नाही. CAS ऐवजी FFC हस्तांतरण पध्दतीचा अवलंब केल्यामुळे समग्र प्रगतीमध्ये गतिमानता येऊ शकेल निश्चितच हस्तांतरणातील कपातीपासून काही संक्रमण खर्च देखील असतील. परंतु अर्थव्यवस्थेची सोय कमी करण्यात आली आहे. कारण अतिरिक्त FFC संसाधने ही केवळ अशाच राज्यांना दिली जाणार आहेत की, ज्यांच्या सर्वात मोठया CAS वित्तपोषित योजना आहेत. एकूणच FFC च्या दूरगामी प्रभाव टाकणाऱ्या शिफारशींबरोबरच निती आयोगाच्या स्थापनेने सरकारचे सहयोगी व स्पर्धात्मक संघराज्याचे स्वप्न साकारण्यात मदत होईल. शहरी आणि इतर स्थानिक संस्थांना सहयोगी व प्रतिस्पर्धात्मक संघराज्याच्या परिघात समाविष्ट करण्यासाठी याची

आवश्यकता आहे. परंतु हे महान कार्यच पुढील धोरणात्मक आव्हान आहे. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात हा प्रयोग कितपत यशस्वी ठरेल हे सांगणे अत्यंत कठीण काम आहे. काही क्षेत्रे ही प्रगतीत बरीच पुढे आहेत तर काही क्षेत्रे ही बरीच मागास आहेत. ही विषमता सामाजिक समुदायात देखील दिसून येते. वित्तीय संसाधनांच्या बाबतीत राज्यांना अधिक स्वायत्तता देण्याचा हा प्रयत्न बाजार अर्थव्यवस्थेबरोबर ताळमेळ घालून पुढे जाणाऱ्या राज्यांसाठी उपयुक्त आहे. परंतु विकास प्रक्रियेत मागे असणाऱ्या राज्यांना यामुळे काही नवीन समस्यांना सामोरे जावे लागणार आहे. करांमध्ये हिस्सा वाढल्याने राज्यांना फायदा होईल परंतु केंद्राच्या विशेष संरक्षणाची यानंतर देखील त्यांना आवश्यकता राहील. केंद्राची भूमिका मर्यादित राहिल्याने ही राज्ये आपल्या समस्यांचा निपटारा करण्यात एकटी पडण्याची भीती आहे. वित्त आयोगाने महसूलाचा तुटवडा असणाऱ्या राज्यांसाठी अतिरिक्त तरतूद केली आहे. परंतु या अतिरिक्त रक्कमेबरोबरच राज्यांच्या योजनांमधील केंद्राची मदत नष्ट होईल. राज्याच्या अधिकारवाढीमुळे केंद्रावरील अवलंबित्व कमी होईल. केंद्र सरकार सामाजिक योजनांची अधिक जबाबदारी राज्यांवर सोपवेल अन्नसुरक्षा, मनरेगा, आरोग्य-शिक्षण यासारख्या केंद्रिय योजनांमध्ये राज्यांना यापुढे अधिक निधी पुरवावा लागेल कदाचित पुढील कालावधीत केंद्राच्या सामाजिक योजना हया हळूहळू कमी होऊन राज्यांना त्यांच्या गरजेनुसार सामाजिक विकासांच्या योजना राबवाव्या लागतील.

References :


1) E x p l a n a t o r y Memorandum, Ministry of Finance Department of Economic Affairs, Government of India, New Delhi. (English and Hindi) pages No. 1 to 4

2) Fourteenth Finan ce Comission, Summary of Recommendation, Ministry of Finance, Government of India, Nw Delhi Chapter - 18

3) Economic Survey - 2015-15 (Hindi and English) Ministry of Finance, Government of India, New Delhi, Chapter No. 10, Page No. 129 to 137



***संजय महाजन*** *हे पनवेल ता. कळंबोळी येथिल शिक्षण महर्षि दादासाहेब लिमये महाविद्यालयात अर्थशास्त्र विभाग प्रमुख असुन त्यांची ग्रामीण भारत व जागतिक पर्यावरण संबंधात तीन पुस्तके प्रकाशित झाली आहेत. सातत्याने ग्रामीण, अर्थविषयक बाबींवर लिहीण्यात त्यांचा हातखंडा आहे.*



**प्रकाशन विभागाची नवी पुस्तके**

१. छत्रपती शिवाजी महाराज (हिंदी) ₹ ९५/-

**अन्य काही पुस्तके**

१. भारतेंदू हरिश्चंद्र (हिंदी) ₹ ११०/-

२. आपला राष्ट्रीय ध्वज (मराठी) ₹ ११०/-

**प्रकाशन विभागाची नवी पुस्तके (हिंदी)**

१. भारतीय दुर्ग- ₹ ४८५.००

२. जाने अपने जिगर की ₹ २०५/-

३. माऊंट एव्हरेस्ट की गाथा ₹ ११५/-

# गुंतवणुकीला चालना देणारा अर्थसंकल्प

- अरविंद जोशी



**''गुंतवणुकीला चालना देणारा अर्थसंकल्प'' - अंदाजपत्रकाचा अचुक आणि भविष्यकालीन गुंतवणुकीनूसार विचार केल्यास लेखकाने लेखाला दिलेले नाव सार्थ आहे. कारण भुतकाळात, वर्तमानात असलेल्या सेवांचा अभाव आणि त्या समस्या डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक क्षेत्रतील गुंतवणुकीतील वाढीसाठी करण्यात आलेली अंदाजपत्रकीय तरतूद लक्षात घेतल्यास हा अर्थसंकल्प म्हणजे वित्तमंत्र्यांनी सादर केलेला देशाच्या विकासाचा आराखडा, रोड मॅप आहे असे म्हणायला हरकत नाही. दिलेल्या तरतुदींचे योग्य विनियोजन आणि खर्च झाल्यास विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीतले अडथळे कमी होण्यास मदत होईल. यामुळे औद्योगिक विकासला चालना देणाऱ्या या अर्थसंकल्पातून भारत 'मॅन्युफॅक्चरींग हब' म्हणुन नावारुपास येईल.**

भारतात मुक्त अर्थव्यवस्थेचा अंमल सुरू होण्यापुर्वी विकास दर ३.५ टक्के होता. म्हणजे स्थुल राष्ट्रीय उत्पन्नात दरसाल सरासरी साडे तीन टक्के वाढ होत असे. तिला ''हिंदू रेट ऑफ डेव्हलपमेंट'' असे म्हटले जाई. १९९१ साली डॉ. मनमोहनसिंग यांनी मुक्त अर्थव्यवस्थेची सुरूवात करून परदेशी भांडवलासाठी आपले दरवाजे खुले केले तेव्हा त्यांनी आठ टक्के विकास दराचे उद्दिष्ट समोर असल्याचे जाहीर केले. आठ टक्के विकास दर हे उद्दिष्ट आणि दहा टक्के हे स्वप्न असे त्यांनी म्हटले होते. दहा टक्के स्वप्न अशासाठी की, ९० च्या दशकात चीनचा विकास दर दहा टक्के होता. खुल्या अर्थव्यवस्थेच्या पंचवीस वर्षात हे उद्दिष्ट काही अपवाद वगळता कधी साध्य झालेच नाही. २००३ आणि २००५ या दोन वर्षात हा दर अनुक्रमे ८.३ आणि ८.४ टक्के असा राहिला. २००६ आणि २००७ या दोन वर्षात तर तो ९ आणि ९.२ टक्के असा नोंदला गेला. बाकीच्या वर्षात दहा टक्के विकास दर हे तर स्वप्न होऊन बसलेच पण आठ टक्के हाही दर स्वप्नवत वाटायला लागला. गेल्या चार वर्षात तो सात टक्क्यांच्या आत आला. बऱ्याच वर्षांनंतर आता सरत्या वर्षात आपण आठ टक्क्यांना स्पर्श करीत आहोत आणि दहा टक्के विकास दराचे स्वप्न पहायला काही हरकत नाही असे वाटायला लागले आहे. किंबहुना अर्थमंत्र्यांनी २०१७ नंतर दहा टक्के विकास दर नोंदला जाईल अशी ग्वाही दिली आहे.

अर्थमंत्री अरुण जेटली यांच्या २०१५ -१६ सालच्या अर्थसंकल्पाने याबाबत काही अपेक्षाही निर्माण झाल्या आहेत. त्यांना येत्या दोन ते तीन वर्षात हे स्वप्न सत्यात उतरवता येईल का यावर आता चर्चा सुरू झाल्या आहेत. हे स्वप्न सत्यात उतरावे यासाठी परदेशी आणि स्वदेशी गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर होणे आवश्यक आहे हे काही वेगळे सांगण्याची गरज नाही. किंबहुना गुंतवणूक हा आज परवलीचा शब्द होणे गरजेचे आहे. अर्थसंकल्पात परदेशातल्या गुंतवणूकदारांना भारतात गुंतवणूक करण्यास कितपत प्रोत्साहन दिले जाते यावर सारे काही अवलंबून असल्यामुळे या संबंधात अर्थसंकल्पात काय आणि किती तरतुदी केलेल्या आहेत यावर नजर टाकली पाहिजे. अरुण जेटली यांनी तशी काही पावले टाकली आहेत हे पट्कन दृष्टीस पडते. या पावलातले सर्वात टीकेचा विषय झालेले पाऊल म्हणजे कॉर्पोरेट टॅक्स अर्थात कंपनी कर कमी करणे. सध्या हा कर ३० टक्के आहे. तो २०१७ पर्यंत क्रमाक्रमाने कमी करीत २५ टक्क्यांवर आणला जाईल असे अर्थमंत्र्यांनी जाहीर केले आहे. कंपन्यांना कर कमी केला जातो ही गोष्ट काही लोकांना भांडवलदारधार्जिणेपणाची वाटते. तसे निष्कर्षही काही तज्ञांनी काढले आहेत. सरकार मोठ्या कारखानदारांवर

मेहरबान झाले आहे असे त्यांचे म्हणणे आहे. पण अर्थमंत्र्यांनीच केलेल्या खुलाशानुसार हा कर कमी करणे गरजेचेच आहे. गुंतवणुकीबाबतची स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी आपल्याला आपल्या देशातला हा कर सर्वांपेक्षा कमी किंवा निदान सर्वांच्या बरोबरीचा असला पाहिजे. जगात तो कोठेही २५ टक्क्यांपेक्षा जास्त नाही. म्हणून आपणही तो कमी करीत आहोत असे जेटली यांनी प्रतिपादन केले आहे. भारतात हा कर ३० टक्के असला तरीही कंपन्यांना सरकार अनेक करसवलती देते. त्या करसवलती या ३० टक्क्यांतून वगळल्या तर सरकारच्या पदरात खरा कंपनी कर २३ टक्के एवढाच पडतो. म्हणून त्यांचा कर कमी करत असतानाच त्यांना दिल्या जाणाऱ्या सवलती क्रमाक्रमाने कमी केल्या जाणार आहेत. या तरतुदीचा लाभ आपल्याला नक्कीच होईल.

आपल्या देशात गरिबी आहे का? असा प्रश्न अनेकदा पडतो. ज्याच्या घरात अमाप सोने असते त्याला गरीब कसे म्हणणार? भारतात तर जगातला वैयक्तिक मालकीचा सर्वात अधिक सुवर्णसाठा आहे. याबाबत आपण चीन आणि अमेरिका या दोन महाशक्तींनाही मागे टाकतो. ज्याच्याकडे असे भरपूर सोने असते तो श्रीमंत असतो खरा पण ते सोने नुसतेच पडून असेल तर तेच त्याच्या गरिबीचे कारणही ठरत असते. अशा पडून राहणाऱ्या सोन्याला डेड इन्व्हेस्टमेंट असे म्हटले जाते. आपली शोकांतिका अशी की, आपल्या देशातला बहुसंख्य सुवर्णसाठा अनुत्पादक स्वरूपात पडून आहे. पडून असलेले हे सोने, उत्पादक कामाला लावणे आवश्यक आहे पण आजवर तसे होत नव्हते. उलट दरसाल ८०० ते एक हजार टन सोने आयात करून त्यावर देशातला डॉलर्सचा अनमोल साठा खर्च केला जात होता. २०१२-१३ या वर्षात भारतात ८४५ टन सोने आयात केले गेले. त्यामुळे परदेशी चलनाच्या गंगाजळीवर मोठा दबाव आला आणि भारताचा व्यापारी तोटा सकल घरेलू उत्पन्नाच्या ४.७ टक्के एवढा वाढला. परिणामी रुपयाची किंमत घसरली.

त्यावर उपाय म्हणून युपीए सरकारने सोन्याच्या आयातीवर निर्बंध जारी केले. सोन्यावरचा आयात कर २ टक्क्यांवरून वाढवून १० टक्के केला. त्यामुळे सोन्याची आयात २०१२ सालच्या ८४५ टनांवरून आताच्या १३८ टनांपर्यंत कमी झाली. याच काळात पेट्रोलचे दरही कोसळले आणि परदेशी चलनाच्या गंगाजळीवरचा दबाव आणखी कमी होऊन व्यापारी तोटा १.३ टक्के एवढा खाली आला. त्यामुळे गंगाजळी वाढली. रुपयाच्या किंमतीत वाढ झाली. युपीए सरकारच्या निर्बंधांचा असा फायदा झाला. त्या सरकारने सोन्याच्या निर्यातीवर आणखीही काही निर्बंध जारी केले होते. आयात केलेल्या सोन्यातल्या २० टक्के सोन्याचे दागिने निर्यात केले पाहिजेत असा नियम केला होता. तो आता रालोआ सरकारने रद्द केला आहे. सोन्याच्या निर्यातीवरचा आयात कर १० टक्के होता तो कायम ठेवला आहे आणि देशात असलेल्या अमाप सुवर्ण भांडाराचा उत्पादक वापर वाढावा अशा योजना जाहीर केल्या आहेत.

लोक सोने घरात तरी ठेवतात किंवा बँकांच्या लॉकर्समध्ये ठेवतात. त्याची किंमत वाढते किंवा घटते पण या सोन्याच्या रूपात पैसा गुंतून पडतो. म्हणून हेच सोने आता बँकांत ठेव म्हणून ठेवता येणार आहे आणि त्यावर ठेवीदारांना व्याज मिळणार आहे. याला अर्थमंत्र्यांनी सोन्याचे मोनोटायझेशन म्हटले आहे. अशा रितीने सोने बाळगणाऱ्यांना त्या बदल्यात पैसा मिळेल आणि तो व्यवहारात खेळत राहील. सरकारने सुवर्ण रोखे काढण्याचीही योजना जाहीर केली आहे. लोकांना प्रत्यक्षात सोने खरेदी करण्याऐवजी या रोख्यात पैसे गुंतवता येतील आणि प्रत्यक्षात सोने खरेदी न करताच व्याज मिळेल. अशोक चक्राचे चिन्ह छापलेले सुवर्ण नाणे तयार करून ते लोकांना उपलब्ध करून देण्याचाही सरकारचा प्रस्ताव आहे. या नाण्यामुळे परदेशी नाणी खरेदी करण्याचा मोह टळेल. अशा रितीने देशातला अनुत्पादक सुवर्ण साठा केवळ पडून न राहता त्याचा उत्पादक वापर होत रहावा आणि त्यातून गुंतवणूक वाढावी असा सरकारचा प्रयत्न आहे. हा सोन्याचा साठा वापरात आला तर त्यातून दागिन्यांची निर्यातही वाढू शकेल.

पंतप्रधानांनी **मेक इन इंडिया** चा नारा दिला आहे. भारताला मॅन्युफॅक्चरिंग हब बनवणे, त्यासाठी बऱ्याच सोयी निर्माण करणे, त्यातल्या त्यात या सोयींचा फायदा घेऊन देशातलीच गुंतवणूक वाढवणे आणि त्यातून रोजगार निर्मिती करणे असा हा कार्यक्रम आहे. पण या उत्पादनात संरक्षण सामग्रीच्या उत्पादनाला जादा महत्त्व दिले जात आहे. याला कारण आहे ती आपली या सामग्रीची प्रचंड आयात.

भारत हा संरक्षण सामग्रीची आयात करणारा आघाडीचा देश झाला आहे. आपल्या अर्थसंकल्पाचा मोठा हिस्सा संरक्षणावर खर्च होत असतो. चालू

वर्षात म्हणजे २०१४ -१५ या वर्षात संरक्षणासाठी २ लाख २९ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. अर्थसंकल्पीय वर्षात म्हणजे आगामी २०१५-१६ या वर्षात अर्थमंत्र्यांनी या तरतुदीत १०.९५ टक्क्यांची वाढ केली आहे. म्हणजे ही तरतूद आता २ लाख ४६ हजार ७२७ कोटी रुपये एवढी झाली आहे. यातला मोठा खर्च महसुली स्वरूपाचा आहे. पण सामग्रीच्या खरेदीवर पायदळ २६ हजार कोटी, हवाई दल ३३ हजार कोटी आणि नौदल २४ हजार कोटी रुपये खर्च करते. यातला मोठा हिस्सा आयातीवर खर्च होतो. आयात केली जाणारी सामग्री आयात करण्याऐवजी आपल्या देशातल्या कंपन्यांनी परदेशी कंपन्यांच्या सहाय्याने देशातच तयार केली तर त्यातून निर्माण होणारा रोजगार आपल्या देशातल्या लोकांना मिळेल. २००५ साली हा विचार प्रथम पुढे आला आणि संरक्षण सामग्रीच्या निर्मितीत २६ टक्के परदेशी गुंतवणूक करण्याची अनुमती देण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र या प्रस्तावाला म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही. आता मोदी सरकारने सत्तेवर येताच या क्षेत्रात १०० टक्के परदेशी गुंतवणुकीला अनुमती देण्याचा मनोदय जाहीर केला होता. संरक्षण क्षेत्रातल्या तज्ञांनी ही कल्पना उचलून धरली कारण सध्या आपण आयात करीत असलेली सामग्री १०० टक्के परदेशी कंपन्यांनीच तयार केलेली असते. ती त्यांच्या देशात तयार होते. त्याऐवजी त्यांनी भारतात येऊन ती तयार करावी असे म्हणण्यात काही गैर नाही. हा गुंतवणुकीच्या मर्यादेचा प्रश्न नाही तर कारखाना परदेशात असावा की, भारतात असावा एवढाच प्रश्न आहे पण एवढी साधी गोष्ट काही लोकांना समजत नाही. मुळात भारतात आजवर जी काही संरक्षण सामग्री तयार होत आली आहे ती सरकारी उद्योगात तयार होत आली आहे. खाजगी क्षेत्रात शस्त्रे तयार करणे हे लष्करासाठी घातक आहे अशी एक अनाठायी कल्पना तयार झाली आहे. म्हणून काही संघटनांनी विरोध केला. म्हणून सरकारने सबुरीचे धोरण स्वीकारून ही मर्यादा ४९ टक्के एवढी केली आहे. या क्षेत्रात १०० टक्के खाजगी गुंतवणुकीला मंजुरी मिळाली असती तर एवढ्या एका निर्णयाने देशात स्थुल राष्ट्रीय उत्पन्नात दोन टक्के वाढ झाली असती पण आता ४९ टक्के खाजगी गुंतवणुकीतूनही आपण बरेच काही साध्य करू शकतो कारण या गुंतवणुकीतून केवळ आपली संरक्षण सामग्रीची आयात कमी होणार नाही तर एकदा हे उद्योग भारतात उभे राहिले की, भारताची गरज पुरी होऊन अतिरिक्त उत्पादनही तयार होईल आणि आपल्या देशातून शस्त्रंची निर्यात मोठ्या प्रमाणावर होईल. आपले आयातीवर खर्च होणारे परकीय चलन वाचेल आणि आपल्याला निर्यातीतून मोठ्या प्रमाणावर नफा मिळेल. रोजगार निर्मिती तर फारच मोठ्या प्रमाणावर होईल. उद्योग व्यवसायाचे सारे चित्र बदलून जाईल. संरक्षण सामग्रीची भारतात निर्मिती करण्याचा निर्णय हा आर्थिक सुधारणा कार्यक्रमातला मास्टर स्ट्रोक आहे असे म्हटले जाते. तो स्ट्रोक सरकारने पूर्ण ताकदीनिशी मारलेला नाही. पण काहीच न करता केवळ ही सामग्री परदेशातून आयात करण्यापेक्षा हाही निम्मा प्रयत्न काही वाईट नाही.

इंधन तेलाचे दर कोसळल्याने पेट्रोलवर सरकारला द्यावी लागणारी अनुदाने कमी झाले आहे. २०१४-१५ या चालू वर्षात सरकारला खते, धान्य आणि पेट्रोल यावर २ लाख ५२ हजार कोटी रुपये एवढे अनुदान द्यावे लागत आहे. पण आगामी वर्षात पेट्रोलचे दर घसरल्याने ही सबसिडी २ लाख ४४ हजार कोटी रुपये पर्यंत खाली येणार आहे. या घटीत पेट्रोलचा मोठा वाटा आहे. चालू वर्षात पेट्रोलवर दिली जाणारी सबसिडी १ लाख २२ हजार कोटी रुपये आहे पण आगामी वर्षात ती केवळ ७३ हजार कोटी रुपये एवढी कमी होणार आहे. मोदी सरकार फार नशीबवान आहे असे अर्थतज्ञांचे मत आहे कारण सरकारच्या डोक्यावरचा तेलावर द्याव्या लागणाऱ्या सबसिडीचा भार असा जवळपास निम्म्याने कमी झाला आहे. अर्थात अर्थमंत्री अरुण जेटली यांचा अर्थसंकल्प सादर होण्याच्या आधीच या अर्थतज्ञांनी सरकार हा भार कमी होण्याचा फायदा कसा उठवणार असा सवाल करायला सुरूवात केली होती.

सबसिडी कमी झाल्याने वाचलेले पैसे सरकारने फारच सत्कारणी लावण्याचे ठरवले आहे. आपल्या देशातल्या परदेशी गुंतवणुकीतला फार मोठा अडथळा दूर करण्यासाठी हे पैसे वापरण्याची योजना अर्थमंत्र्यांनी जाहीर केली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या देशातली राज्य सरकारे रोजगार निर्मितीसाठी परदेशी गुंतवणुकीवर भर देत आहेत. मात्र परदेशी कंपन्यांना भारतात गुंतवणूक करण्यात पायाभूत सोयींचा अभाव ही मोठीच अडचण येत होती. वीज, पाणी, रस्ते या पायाभूत सोयी पुरेशा नसल्याने परदेशी गुंतवणुकीचा वेग म्हणावा तेवढा वाढत नव्हता. गतवर्षी तर उत्पादन क्षेत्रात

केवळ १० टक्के वाढ नोंदवली गेली होती. म्हणून अरुण जेटली यांनी पायाभूत सोयींवर ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचा मनोदय जाहीर केला आहे. सरकारने पेट्रोलवर चार टक्के इन्फ्रास्ट्रक्चर टॅक्स लावला आहे. त्यातून जमा होणाऱ्या पैशातून सरकार पायाभूत सोयींवर ७० हजार कोटी रुपये खर्च करणार आहे. या खर्चात रस्ते निर्मितीवर विशेष भर असेल, यातले ४५ हजार ५१ कोटी रुपये रस्त्यांना खर्च होतील अशी अपेक्षा आहे. चालू वर्षी ही रक्कम ३३ हजार ३०५ कोटी रुपये आहे. सरकार रस्त्यांसाठी जनतेचाही सहभाग घेणार आहे. सरकारने राष्ट्रीय महामार्ग प्राधीकरणाला इन्फ्रास्ट्रक्चर बाँड काढण्याची अनुमती दिलेली आहे. या मार्गाने हा प्राधीकरणाने ४२ हजार ७०० कोटी रुपये उभे करावेत अशी अपेक्षा आहे. या शिवाय नॅशनल इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर फंडाच्या माध्यमातून २० हजार कोटी रुपयांचे कर्ज उभारण्याचाही प्रस्ताव आहे. रस्त्यांच्या बाबतीत एक बाब चिंताजनक असते ती म्हणजे कामे रेंगाळणे. २०१३-१४ या आर्थिक वर्षात २८१९ किलोमीटर्स लांबीच्या महामार्गाची कामे मंजूर झाली. त्यानंतरच्या म्हणजे चालू वर्षी ३ हजार ७६० किलोमीटर्सची कामे सुरू करण्याचे आदेश दिले गेले. आगामी वर्षात ही कामे वाढतील पण अनेक कामे पर्यावरणाची अनुमती आणि जमीन अधिग्रहणाला दिली जाणारी आव्हाने यामुळे रेंगाळतात. त्यातली पर्यावरण खात्याची मंजुरी वेगाने देणे हे काम सरकार करू शकते पण जमीन अधिग्रहणाला दिली जाणारी आव्हाने निकाली काढणे हे न्यायालयाच्या हातात असते. या गोष्टी टाळल्या तरच रस्त्यांची कामे वेगाने होणार आहेत. एकुण काय तर भूमिअधिग्रहण कायदा दुरुस्त होऊन मंजूर होणे अगत्याचे आहे.

उद्योगांना खात्रीचा आणि दर्जेदार वीज पुरवठा हवा असतो. सरकारने देशभरात २४ तास वीज पुरवठा करण्यासाठी २०२२ सालची काल मर्यादा निश्चित केली आहे. त्यासाठी पाच अल्ट्रा मेगा पॉवर प्रोजेक्टस उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या शिवाय गैरपरंपरागत साधनांतून वीज निर्मिती स्रोतातून वीज निर्मिती करण्यावर भर दिला आहे. या दृष्टीने सरकारने टाकलेली पावले खरोखरच सकारात्मक आहेत. सौर आणि पवन ऊर्जा निर्मिती वाढावी यासाठी प्रयत्न आहेत. कारण ही ऊर्जा निर्मिती साधने प्रदूषण करीत नाहीत आणि ती अव्याहत सुरू असतात. त्यांच्या उभारणीत गुंतवणूक मोठी होत असली तरीही वारा आणि ऊन काही विकत आणावे लागत नसल्याने वीज निर्मिती स्वस्त आणि अखंड सुरू राहते. यावर सरकारची गुंतवणूक वाढवता यावी यासाठी कोळशावर टनामागे १०० रुपये असलेला क्लीन एनर्जी टॅक्स २०० रुपये करण्यात आला आहे. यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून या प्रकारच्या प्रकल्पांना गती देऊन २०२२ पर्यंत १ लागु ५ हजार मेगा वॉट वीज निर्मिती करण्याचे उद्दिष्ट सरकारने डोळ्यासमोर ठेवले आहे. या वीज निर्मितीत येत्या काही वर्षात २०० अब्ज डॉलर्स एवढी गुंतवणूक आकृष्ट करण्याचा सरकारचा मनोदय आहे. अनेक परदेशी कंपन्यांनी या गुंतवणुकी बाबत उत्सुकता दाखवली आहे.

पायाभूत सोयींमध्ये बंदरे, विमान वाहतूक आणि कुशल मनुष्यबळ यांचाही समावेश होतो. याही क्षेत्रात सरकारने या अर्थसंकल्पात मोठी तरतूद सूचित केली आहे. विमान वाहतूक गेल्या तीन वर्षांपासून ११ ते १२ टक्क्यांनी वाढत आहे. मात्र ती आणखी वाढावी यासाठी पर्यटन उद्योगाला चालना देणे आवश्यक ठरते. अर्थमंत्र्यांनी देशातल्या, २१ पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी तरतूद केली आहेच पण व्हिसा ऑन अरायव्हल ही सवलत आता व्यापक केली आहे. आजवर ही सोय ४३ देशांतल्या पर्यटकांना दिली जात होती. आता ती १५० देशांतल्या नागरिकांना बहाल करण्यात आली आहे.

एकंदरीत औद्योगिक विकासाला चालना देणारा हा अर्थसंकल्प आहे आणि येत्या काही वर्षात आपल्या देशाला मॅन्युफॅक्चरिंग हब करण्यास तो उपयुक्त ठरणार आहे.

*(**अरविंद जोशी** हे सोलापूर येथिल वरिष्ठ फ्री लान्सर असुन अनेक अर्थविषयक लेखांचे लिखाण त्यांनी विविध वृत्तपत्रांमधुन केले आहे. **संपर्कासाठी ई मेल** - achivers.joshi@gmail.com)*

# तेलाच्या आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत किंमत निश्चितीच्या प्रेरकशक्ती

- हिरण्मय रॉय, अनिल कुमार, विजय शेखावत



**वाढत्या आंतरराष्ट्रीय तेल किंमतीवर प्रकर्षाने चिंता व्यक्त करण्यात येत होती. सध्याच्या तेलाच्या किंमतीचे निरीक्षण केले तर १९७०, १९८० च्या कालावधीतील किंमतीचे साध्यर्म लक्षात येईल. १९९० ते २००० या कालावधीतील खनिज तेल किंमतीतील बदल हे मागणी - पुरवठा यांच्यातील संतुलनाशी संबंधित मुळतत्वांच्या आधारे स्पष्ट करणे कठीण आहे. कारण या क्षेत्रात असलेली तेलाची सट्टेबाजी प्रत्यक्ष तेल उत्पादन जागा, निर्यात जागा, या दोहोंमधिल अंतर, वायदे बाजारातील किंमतीतील बदल यामुळे होणारी दिर्घकालीन वाढ दर्शवितात.**

**सध्या भारतातील तेल क्षेत्रात स्पर्धेचे वातावरण असुन भारतातील तेल किंमतीतील बदल जागतिक किंमतीला अनुसरुन आहे. सरकारी धोरण, आंतरराष्ट्रीय राजकिय संबंध तेल पुरवठादार, नीती हे घटक कारणीभुत आहेत. तेल निश्चित धोरणाची वर्तमान सरकार कडून अपेक्षा होती.**

तेलाच्या किंमतीमध्ये सध्या होत असलेले बदल जुन्या काळाशी साधर्म्य दाखवून देणारे आहेत. १९७० च्या दशकाचा शेवट आणि १९८० च्या दशकाची सुरवात असा तो कालखंड असेल जेव्हा, तेलाच्या किंमती त्यापूर्वीच्या दशकात भरमसाठ वाढल्याने, पाश्चिमात्य देशांच्या तेल उत्पादनात प्रचंड वाढ झाली होती आणि कमी दरांचा विचार करता स्रोतांचा व क्षेत्रांचा विकास करणे तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक आणि व्यापारी दृष्टीकोनातून परवडणारे नव्हते. १९७० च्या दशकाच्या अखेरीला जेव्हापासून अलास्का आणि उत्तर समुद्रातील तेल जबरदस्तीने तेलाच्या बाजारपेठेत येऊ लागले, तेव्हापासून जागतिक स्तरावरील वाढती मागणी भागवण्यात येऊ लागली आणि त्याचा परिणाम म्हणून पुरवठ्यात प्रचंड वाढ झाली व आंतरराष्ट्रीय किंमतींमध्ये सातत्याने होणारी वाढ टप्प्याटप्प्याने कमी झाल्यामुळे बाजारपेठेत सुस्ती आली, जी सहस्त्रकाच्या अंतापर्यंत कायम होती.

१९७३ मध्ये तेलाच्या किंमती जेव्हा वाढल्या तेव्हा ओपेक ने बाजार नियंत्रकाची भूमिका बजावली. पेट्रोलियम निर्यात देशांच्या संघटनेने अर्थात ओपकेने आपली हजारो बॅरल्सची अतिरिक्त उत्पादनक्षमता प्रभावीपणे वापरली आणि गरज पडेल तेव्हा पुरवठा व मागणी यांमध्ये संतुलन साधले. १९७३ मध्ये तेलाच्या किंमती वाढल्यापासून १९८० च्या दशकाच्या सुरवातीपर्यंत जगाची अतिरिक्त उत्पादन क्षमता कमी-अधिक प्रमाणात ओपेकच्या अतिरिक्त उत्पादन क्षमतेइतकीच होती. संघटनेच्या बाहेरील अमेरिका, कॅनडा आणि रशिया यासारख्या उत्पादकांनी मात्र किंमतीचा विचार न करता त्यांची अतिरिक्त साठवणूक क्षमता जेवढी होती तेवढे तेलाचे उत्पादन केले.

बहुतांश अतिरिक्त उत्पादनक्षमता सौदी अरेबियाच्या ताब्यात आहे आणि किंमत टिकवून ठेवण्याच्या दृष्टीकोनातून १९७० च्या दशकाच्या अखेरीपासून त्याने आपली तेलाची निर्यात मोठ्या प्रमाणात कमी केली आहे. बाजारपेठ नियंत्रित ठेवण्याच्या सर्वोत्तम उपायावरून सौदी अरेबिया आणि ओपेक यांच्यात मतभेद आहेत. उत्पादनावर नियंत्रण ठेवून मान्य केलेल्या हिश्शानुसार त्यात वाढ किंवा घट करण्यास ओपेक प्राथमिकता देते तर सौदी अरेबियाचा या दृष्टीकोनाला विरोध असून पुरवठ्याच्या प्रमाणावर नियंत्रण ठेवण्यापेक्षा विशिष्ट किंमत कायम राखण्यास तो प्राथमिकता देतो. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास, सौदी अरेबिया त्याला योग्य वाटेल अशा किंमतीला आंतरराष्ट्रीय बाजारात तेल विकेल आणि त्याने ठरवलेल्या किंमतीवर आधारित मागणीप्रमाणे आपले तेल उत्पादन ठरवेल. त्यामुळे सौदी अरेबियाला आपले उत्पादन १९७० च्या दशकातील १० दशलक्ष बॅरल्सवरून १९८५ मध्ये ३ दशलक्ष बॅरलपर्यंत घटवावे लागले होते.

या दृष्टीने, खर्चिक तेल उत्खनन क्षेत्रापासून ते मागणी असलेल्या अतिदूर

उत्खनन क्षेत्रापर्यंत, उत्पादनात घट होण्यास सुरवात झाली. किंमतीत घसरण होण्यास निश्चित अशा मर्यादा आहेत. हे जेव्हा घडेल तेव्हा किंमतीचे गणित एकदम उलटेल आणि बाजारातील तणाव दूर होईल. त्यामुळेच काही तज्ज्ञांच्या मते, बाजाराला धक्के न देता आणि पश्चिमेतील ऊर्जा कंपन्यांना भिती न दाखवता पुरवठ्यावर मर्यादा आणता येईल अशा सुयोग्य पातळीवर तेलाच्या किंमती राखणे हे सौदी अरेबियाचे ध्येय आहे.

आजची परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे. सौदी अरेबियाकडे अतिरिक्त उत्पादनक्षमता नाही आणि अधिक प्रमाणात निर्यात करून तो बाजारात अतिरिक्त पुरवठा करू शकणार नाही. प्रत्यक्षात अनेक तज्ज्ञांच्या मते सौदी अरेबियाचे अलिकडील काही वर्षातील उत्पादन त्याच्या कमाल उत्पादन क्षमतेइतकेच किंवा त्याच्या जवळपासच आहे आणि कदाचित विशेषत: याच मुद्याच्या अवतीभोवती १९९० च्या दशकापासून तेलाच्या बाजारपेठेतील महत्वाच्या घडामोडी घडत आहेत. वास्तविक स्थिती अशी आहे की, निश्चित केलेल्या हिश्श्यावरून सदस्य देशांमधील अनेक वर्षांच्या वादामुळे आपल्या उत्पादनात एकेकाळी असलेली सुनियोजित अशी अधिकची राखीव क्षमता ओपेकने गमावली आहे. याचा अर्थ पुरवठ्याच्या बाबतीत हस्तक्षेप करण्याची ओपेकची ताकद किमान आहे. उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट करण्यासाठी आपल्या सदस्य देशांकडून मान्यता आणि बांधिलकी प्राप्त करणे अशक्य असल्याची चांगलीच जाणीव ओपेकला आहे.

अर्थव्यवस्थांना फार व्यापक प्रमाणात बसलेल्या धक्क्यांमुळेच १९८० च्या दशकाच्या मध्यापासून तेलाच्या वास्तविक किंमतीत मोठी वाढ झाल्याचे आम्हाला दिसून आले. नव्या सहस्त्रकाच्या प्रारंभापासून मोठ्या प्रमाणात आणि याच सहस्त्रकातील पहिल्या दशकाच्या मध्यापासून अतिशय मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान सोसावे लागल्यामुळे देखील त्यात भर पडली. २००४-२०१० या कालावधीत तेलाच्या वास्तविक किंमतीत झालेल्या ६५ टक्के वाढीपैकी ४४ टक्के वाढीमागे आर्थिक नुकसान हे कारण असले तरी तेलाच्या किंमतीला बसलेला तिसरा झटका हा व्यापक अशा आर्थिक स्वरूपातील होता, अर्थव्यवस्थांना व्यापक प्रमाणात बसलेले धक्के हे २००७-०८ मध्ये तेलाच्या किंमतीत झालेल्या चढ-उतारांसाठी प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणात कारणीभूत होते. आम्ही तेलाच्या वास्तविक किंमतीच्या निर्णयासंदर्भात मागणीच्या बाजूचे पुरस्कर्ते असलो तरी या लेखात यापूर्वी केलेल्या उल्लेखापेक्षा आर्थिक नुकसानाबाबत त्याची भूमिका फार मोठी असते असेही आम्हाला दिसून आले.

२००३ पासून होत असलेल्या किंमत वाढीचा परिणाम म्हणून यावेळी - बहुतांश अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांमधून, विशेषत: पातळ थरांच्या खडकातील (शेल) तेल आणि वायू, राळ आणि अन्य प्रकारचे खनिज तेल बाहेर काढणे, जे अगदी अलिकडच्या काळापर्यंत अशक्य किंवा आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य वाटत होते - पश्चिमेत होणाऱ्या उत्पादनात त्याच प्रमाणात प्रचंड वाढ झाली. या नव्या स्त्रोतांचा उपयोग करून - उच्च किंमतींच्या जोडीलाच - नव्या तंत्रज्ञांनामुळे जमिनीखालील खडकांमधील खनिज तेल बाहेर काढणे शक्य झाल्याने अमेरिकेतील तेल उत्पादनाचा कल उलट झाला. १९७० च्या दशकापासून अमेरिकेचे तेल उत्पादन सातत्याने घसरत जाऊन २००८ मध्ये दर दिवसाला ५० लाख बॅरल्सपर्यंत पोहोचले, तेच आज प्रतिदिन ८५ लाख बॅरल्सपेक्षा जास्त आहे. २०१६ मध्ये अमेरिकेचे तेल उत्पादन प्रतिदिन ९५ लाख बॅरल्सपेक्षा जास्त असू शकते असा अंदाज वर्तवण्यात येतो आणि बहुतांश अतिरिक्त उत्पादन हे अपांरपरिक तेलापासून असेल.

अमेरिकेच्या उत्पादनातील ही वाढ, त्याचबरोबर इराकमध्ये होणारे उत्पादन बाजारपेठेत पुन्हा येऊ लागल्याने आणि अंगोलासारखे आफ्रिकेतील नवे मोठे उत्पादक उदयाला आल्यामुळे, सोव्हिएट युनियनने आपल्या अखेरच्या वर्षात गाठलेल्या पातळीपर्यंत रशिया आपले उत्पादन वाढवित असल्याने बाजारपेठेत आज कोंडी झाली आहे.

तेलाची किंमत निश्चित करण्यामागे एक अतिशय गुंतागुंतीचे समीकरण आणि सीमारेषा आहे की, जी ओलांडली तर ते समीकरण उलटण्याची शक्यता असते याकडे राजकीय हेतूंवर लक्ष केंद्रीत करणारे विश्लेषक याकडे लक्ष देत नाहीत. तेलाच्या किंमतीत फार मोठ्या प्रमाणात चढ-उतार झाले तर किंमतीची एक सीमारेषा कायमच असते जी बाजारपेठेची संरचनात्मक दिशा पालटू शकते.

या घटकांपैकी बहुतेक महत्त्वाच्या घटकांचा संबंध खनिज तेलाच्या उत्खननाशी असतो. सौदी अरेबियातील एक बॅरल तेलाच्या उत्खननाचा खर्च ३ डॉलरपेक्षा जास्त होत नाही, जमिनीखालील खडकांमध्ये साठून राहिलेले तेल ढवळून किंवा राळेला उष्णता देऊन त्यांना द्रवरूप देणे या अत्यंत खर्चिक प्रक्रिया आहेत ज्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर स्त्रोत आणि ऊर्जा खर्ची पडते. त्यामुळे, तेलाच्या किंमतींमध्ये एकदम आणि सातत्याने घट

झाल्यास या प्रकारची तेले बाजारपेठेतून बाहेर फेकली जातात आणि ज्यांनी सर्वसामान्यपणे आपल्या कामकाजासाठी प्रति बॅरल शंभर डॉलरपेक्षा जास्त किंमत आधारभूत मानून कर्जाच्या माध्यमातून निधी उभा केलेला असतो अशा मोठ्या प्रमाणावरील ऊर्जा कंपन्यांना आपला गाशा गुंडाळावा लागतो.

ऊर्जाविषयक सल्लासेवा देणारी संस्था असलेल्या मॅकेन्झी अँड कंपनीच्या मते, अमेरिकेतील बहुतांश शेल तेल उत्पादकांना त्यांचे नफ्याचे प्रमाण कायम राखण्यासाठी प्रति बॅरल ७५ डॉलरपेक्षा जास्त किंमत मिळणे आवश्यक आहे. ऊर्जा क्षेत्रातील सूत्रांच्या म्हणण्याप्रमाणे, तेलाच्या किंमती ८५ डॉलरपेक्षा खाली घसरताच गुंतवणुकीचे प्रमाण कमी होऊ शकेल, त्याचबरोबर कमी उत्पादन असणाऱ्या विहीरी बंद होतील. पेचप्रसंगाचे हे परिणाम पहिल्यांदा अमेरिकेच्या अगोदर कॅनडातील खनिज तेलाबाबत जाणवू लागतील. कॅनेडातील अपारंपरिक तेलाची समस्या ही केवळ त्याच्या खूप जास्त उत्पादन खर्चाशी संबंधित नाही तर त्याच्या उत्पादनासाठी कराव्या लागणाऱ्या गुंतवणुकीशी देखील आहे - अरेबियातील आखातामधून तेलाची वाहतूक करण्यासाठी प्रति बॅरल ३ डॉलरपेक्षा जास्त खर्च करावा लागत नाही पण कॅनडाच्या पश्चिम किनाऱ्यापासून तेलाची वाहतूक करण्यासाठी १२ ते १५ डॉलर खर्च येतो.

याचे कारण किनारा आणि निर्यातीच्या केंद्रापासून दूरवरच्या अंतरावर असलेल्या भूभागावर तेलाचे उत्पादन घेतले जाते आणि त्याचबरोबर कॅनडातील तेलाचे उत्पादन राळ आणि अस्फाल्ट यातून घेतले जाते जे अतिशय जड असतात आणि त्यांची घनता जास्त असते त्यामुळे मेक्सिकोच्या आखातात किंवा अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावर हजारो मैल लांबीच्या पाईपलाईनद्वारे घेऊन जाण्यासाठी त्यांना खेचून नेण्याची फार मोठी क्षमता आवश्यक असते. अखेरीस, हे तेल अगोदरच सवलतीच्या किंमतीत विकलेले असते - कारण त्याचा अतिसामान्य दर्जा - जी बाजारपेठेत नरमाई येते आणि पुरवठा वाढतो तेव्हा फार मोठ्या प्रमाणात वाढते.

२००३-०८ आणि २०१०-११ या कालावधीत खनिज तेलाच्या जागेवरील (spot) किंमतीत झालेल्या अभूतपूर्व वाढीमुळे तेलाची किंमत निश्चित करणाऱ्या घटकांविषयी अतिशय तावातावाने सार्वजनिक चर्चा सुरू झाली होती. २००३-०८ आणि २०१०-११ या कालावधीत तेलाच्या किंमतीत झालेली प्रचंड वाढ आर्थिक सिद्धांताच्या आधारे स्पष्ट करता येणार नाही यावर बहुतेकांचे एकमत होते. त्याऐवजी, ज्याला सटोडिये हेच किंमत निश्चित करणारे महत्त्वाचे घटक असलेल्या तेलाच्या वायदे बाजारात ''वित्तीय भांडवलशाही वाढणे'' (financialization) म्हटले गेले, त्यामुळे ही वाढ झाली. असा अर्थ लावला गेल्याने राजकीय नेतृत्व तेलाच्या वायदे बाजाराचे नियमन करण्यासाठी पुढे आले.

सैद्धांतिकदृष्ट्या वायदे बाजारातील किंमतींमुळे, जिथे प्रत्यक्षात तेल आणून विकले जाते त्या स्पॉट मार्केटमधील किंमती वाढू शकतात. काही अभ्यास (Kaufmann and Ullman, २००९) अनेक वर्षांच्या निरिक्षणातून, स्पॉट आणि वायदे बाजार यांच्या संबंधांमधील बदल आणि सट्टेबाजीमुळे बिघडलेल्या बाजारात मूलभूत घडामोडींमुळे किंमतींमध्ये झालेली दीर्घकालीन वाढ दर्शवितात (किंवा निर्देश करतात किंवा पुरावे उपलब्ध करून देतात). सट्टेबाजी आणि डॉलर/युरो यांच्या विनिमय दरातील अनिश्चित कल यामुळे तेलाच्या किंमतीमधील तीव्र चढ-उताराबाबत ग्राहकांकडून व्यक्त करण्यात आलेल्या चिंतेवर Triulzi, D'Ecclesia, and Bencivenga, (२०१०) हे शिक्कामोर्तब करतात. याशिवाय, स्टीव्हन्स आणि सेशन्स (२००८) आणि आचार्य एट एल. (२००९) असे सिद्ध करतात की, ताब्यात असलेल्या खनिज तेलाची सविस्तर यादी आणि वायद्याच्या सौद्याची किंमत सकारात्मक परस्पर संबंध दर्शवितात आणि त्याचप्रमाणे स्पॉट मार्केटमधील किंमतीवर प्रभाव पाडतात. (२०११) ते निश्चितपणे असे सांगतात की, ''मूलभूत माहिती त्याचप्रमाणे हेज फंडांची वाढती उलाढाल आणि अन्य आर्थिक बाजारातील सहभागीदार हे नजिकच्या आणि दीर्घ कालावधीच्या वायदे करारांमधील मजबूत 'को-इंटिग्रेशन'साठी जबाबदार असतात.''

असे असले तरी, बहुतेक अभ्यास तेलाच्या किंमतवाढीचे कारण सट्टेबाजी असल्याचे मान्य करण्यास तयार नाहीत. फार मोठे प्रमाण आणि सातत्य असलेल्या मागणीला धक्क्यांच्या रूपाने बसणारे तेलाच्या किंमतीतील चढ-उतार हे पुरवठ्यावर मोठ्या प्रमाणात नियंत्रण असताना जागतिक स्तरावरील वास्तविक घडामोडींमधील वाढीशी संबंधित असतात असे अलक्विस्ट आणि जरवैस (२०११) स्पष्ट करतात. अर्थशास्त्रज्ञ लूट्झ कीलियन, बस्साम फट्टू आणि लवण महादेवा (२०१२) यांनी केलेल्या सर्वेक्षणाच्या अहवालात, वायदा आणि स्पॉटच्या किंमती या ''समान आर्थिक मूलतत्वे'' प्रतिबिंबीत करतात,

यावर भर देणात आला आहे. तेलाच्या वायदे बाजारातील वित्तीय भांडवलशाही वाढण्यापेक्षा स्पॉट आणि वायदा यांच्या किंमतींमधील परस्पर सहकाऱ्याच्या घडामोडी समान आर्थिक मूलतत्वे प्रतिबिंबीत करतात याचे भरभक्कम पुरावे आहेत. तेलाच्या वास्तविक किंमतींमध्ये केवळ २००५ सालापर्यंतच मोठ्या प्रमाणात वाढ झाली असे नाही. विकसनशील आशिया खंडातून खनिज तेलाची अनपेक्षितपणे वाढलेली मागणी यासारख्या मूलभूत आर्थिक क्षमता देखील कारणीभूत होत्या.

तेलाच्या किंमती निश्चित करणारे महत्वाचे घटक उदा. मागणीतील अनपेक्षित बदल, पुरवठ्यातील अनपेक्षित चढ-उतार, वायद्याच्या सौद्याच्या किंमती, विनिमयाचा दर आणि सट्टेबाजी यांचा परस्पर संबंध नसेलच असे नाही पण त्यांचा एकत्रित परिणाम होतो किंवा ते परस्परपूरक ठरू शकतात.

१९९७ ते २०११ या कालावधीत खनिज तेलाच्या किंमतीमध्ये झालेले बदल हे केवळ पुरवठा व मागणी यांच्यातील संतुलनाशी संबंधित मूलतत्वांच्या आधारे स्पष्ट करणे अवघड आहे. तेलाच्या किंमत वाढीत भर घातली असण्याची शक्यता असलेल्या अतिरिक्त घटकांचा या विश्लेषणात शोध घेण्यात आला आहे. आजपर्यंत झालेले विश्लेषण सट्टेबाजीमुळे तेलाच्या किंमतीत बदल झाले असतील हा तर्क मान्य करण्यास तयार नाही. सट्टेबाज हे तरलता उपलब्ध करून देत असल्याने आणि नेमकी किंमत ठरविण्यात सहाय्यभूत ठरत असल्याने महत्त्वाची भूमिका बजावत असले तरी सट्टेबाजांची वाढती भूमिका किंमतीला चालना देते असे म्हणण्यास वाव आहे. जानेवारी १९९७ ते डिसेंबर २०११ या कालावधीत तेलाच्या किंमतीत झालेले बदल हे पुरवठा आणि मागणी या मूलभूत घटकांमुळे झाले होते.

सध्या भारतातील तेल क्षेत्रात स्पर्धात्मक बाजार यंत्रणा अनुसरण्यात येत असल्याने भारतातील तेलाच्या किंमतीत होणारे बदल हे जागतिक किंमतीला अनुसरूनच असतात. त्यामुळे वरील सर्व घटक आंतरराष्ट्रीय बाजाराशी सुसंगत ठरत असल्याने भारतातील तेलाच्या किंमतीत होण्प्रया बदलांसाठी कारणीभूत ठरतात. असे असले तरी, एका पुरवठादाराकडून कोणतीही अडचण निर्माण झाली तर आपल्याला दुसरा नवा पुरवठादार शोधावा लागत असल्याने भारतात तेलाची किंमत ठरवण्यात पुरवठ्याशी संबंधित घटक अधिक सुसंगत ठरतात. अन्य महत्वाचे घटक म्हणजे सरकारचे धोरण आणि आंतरराष्ट्रीय राजकीय संबंध हे देखील भारतातील तेलाच्या किंमतीतील बदलाशी संबंधित असलेले महत्वाचे घटक आहेत. भारतातील बाजारपेठेतील सट्टेबाज प्रवृत्तींच्या उलाढालीचा प्रभाव किंमतीवर पडत असल्याचे पेट्रोलियम मंत्रालयाने अलिकडेच तेलाबाबत गुप्तचर खात्यामार्फत मिळवलेल्या माहितीतून दिसून आले आहे. त्यामुळेच, जीविका आणि वाढ यासाठी तेल ही अत्यावश्यक ऊर्जा असल्याने भारतीय अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण वाढीसाठी आणि विकासासाठी आवश्यक असलेली तेलाची प्रचंड गरज लक्षात घेऊन तेलाची किंमत निश्चित करण्यासाठी सरकारने शाश्वत धोरण स्वीकारावे अशी अपेक्षा २०१५ च्या अर्थसंकल्पाकडून तेल क्षेत्रासाठी करण्यात आली.

एका विशिष्ट कालावधीत तेलाची बाजारपेठ ही कार्यक्षम बाजारपेठेच्या गृहितकांच्या आधारे वर्तवण्यात आलेल्या पूर्वानुमानाप्रमाणे कार्यक्षम नसल्याचे या विश्लेषणातून प्रामुख्याने दिसून आले. त्याचबरोबर सट्टेबाजी, प्रमाणाबाहेर होणारे व्यवहार आणि किंमतींमधील वाढती अस्थिरता यासारख्या बाजारपेठेत घडणाऱ्या अनेकविध घटना बाजारात सट्टेबाजीला उधाण आल्याचे निदर्शक असल्याचे दर्शवतात. वर्तणुकविषयक सिद्धांताची सखोल अंमलबजावणी करून निरीक्षण करण्यात आलेल्या वर्तनाच्या मूलभूत घटकांची चर्चा करण्यात आली आहे. स्पष्टीकरण देण्याची या सिद्धांतांची ताकद फार मोठी असून गुंतवणूकदारांच्या वर्तनामागील कारणे समजून घेण्याबरोबरच दीर्घकाळापर्यंत अयोग्य किंमत निश्चित होत राहण्यामागचे कारण समजून घेण्यात त्याचे योगदान मोठे आहे यात आश्चर्यकारक काहीच नाही.

*__डॉ. हिरण्मय रॉय__ डेहराडून येथील युनिव्हर्सिटी ऑफ पेट्रोलियम अँड एनर्जी स्टडीज् येथील अर्थशास्त्र आणि आंतरराष्ट्रीय व्यापार विभागामध्ये कार्यरत आहेत.*

*__प्रा. अनिल कुमार__ हे २०१० पासून डेहराडून येथील युनिव्हर्सिटी ऑफ पेट्रोलियम अँड एनर्जी स्टडीज् येथील ऊर्जा आणि पायाभूत सुविधा व्यवस्थापन विभागाचे प्रमुख आहेत.*

*__विजय शेखावत__ हे नवी दिल्लीमधील ऑस्ट्रेलियाच्या उच्चायुक्तालयात कार्यरत आहेत.*

*संपर्कासाठी इमेल -*
anil_3016@rediffmaiul.com

# दृष्टीक्षेपात रेल्वे अर्थसंकल्प



केंद्रीय रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांनी आज संसदेत वर्ष २०१५-१६ साठीचा रेल्वे अर्थसंकल्प सादर केला. यंदाच्या या रेल्वे अर्थसंकल्पात कुठलीही प्रवासी भाडेवाढ करण्यात आलेली नाही त्याचप्रमाणे कुठल्याही नवीन गाडयांची घोषणाही करण्यात आलेली नाही. याउलट भारतीय रेल्वेच्या सुधारणेसाठी रेल्वे अर्थसंकल्पात पाच कलमी धोरण आखण्यात आले आहे.

रेल्वे अर्थसंकल्प २०१५-१६ ची प्रमुख वैशिष्टये - योजना, दूरदृष्टी आणि धोरणांची अंमलबजावणी आगामी पाच वर्षात भारतीय रेल्वेत बदल घडवून आणण्यासाठी या अर्थसंकल्पात चार उद्दिष्ट ठेवण्यात आली आहेत.

प्रवाशांच्या साधन सुविधांमध्ये दीर्घकालीन आणि भरीव सुधारणा.

सुरक्षित प्रवासाचे साधन म्हणून रेल्वेला विकसित करणे.

**क्षमतेत भरीव वाढ करणे.**

पायाभूत सुविधांचे अत्याधुनिकीकरण आणि रेल्वेला आर्थिकदृष्टया स्वावलंबी बनवणे.

या उद्दिष्टांच्या यशस्वीततेसाठी अर्थसंकल्पात पाच चालक ठरवण्यात आले आहेत.

श्वेतपत्रिका, व्हिजन २०३० डॉक्युमेंट आणि पंचवार्षिक कृती आराखडयासह मध्यावधी योजनांचा स्वीकार करणे.

दीर्घकालीन आर्थिक सहाय्य आणि परदेशी तंत्रज्ञानासाठी प्रमुख हितधारकांबरोबर भागिदारी करणे.

अंतिम मैलापर्यंत रेल्वेचे जाळे पसरवणे.

स्थानकांच्या पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण.

भारतीय रेल्वेत येत्या पाच वर्षात ८,५०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून त्यासाठी बहुउद्देशीय विकास बँका, निवृत्ती वेतन निधी आदी क्षेत्रातून निधी प्राप्त होणार आहे. यापैकी निम्मा पैसा विद्युतीकरण आणि रेल्वेमार्ग दुप्पट करणे आदी माध्यमातून रेल्वेच्या जाळयाची व्याप्ती वाढवण्यासाठी खर्च केला जाणार आहे.

यंदाचा रेल्वे अर्थसंकल्प १००,०११ कोटी रुपयांचा असून त्यात गेल्यावर्षीच्या तुलनेत ५२ टक्के वाढ झाली आहे. वर्ष २०१४-१५ साठीच्या अर्थसंकल्प ६५,७९८ कोटी रुपये इतका होता. यंदाच्या एकूण रेल्वे अर्थसंकल्पात केंद्र सरकारचा ४१.६ टक्के वाटा असून १७.८ टक्के अंतर्गत निर्मितीतून उपलब्ध करण्यात येत आहे.


## रेल्वे प्रकल्प आणि कार्यान्वयन

मंजूरी मिळालेल्या ७००० किलोमीटरच्या दुस्रया/तिस्रया/चौथ्या मार्गाचे काम रेल्वे जलद गतीने करणार आहे. तसेच वर्ष २०१५-१६ मध्ये ८६८६ कोटी रुपये गुंतवणूकीतून १२०० किमीचा मार्ग सुरु करणार आहे.

याशिवाय नारगोळ, छरा, दिघी, रेवस आणि तुना या बंदरांबरोबर भागिदारी करत किनारपट्टी जोडणी कार्यक्रम सुरु करण्याचा प्रस्ताव या अर्थसंकल्पात करण्यात आला आहे. तसेच २५०० कोटी रुपयांचे प्रकल्प बीओटी ?न्युईटीतत्त्वावर राबवले जाणार आहे.

यामध्ये वर्धा-नागपूर तिसरा मार्ग, काझिपत-विजयवाडा तिसरा मार्ग, भद्रक-नरगुंडी तिसरा मार्ग आणि भुज-नलिया गेज रुपांतर यांचा समावेश आहे.





नईदुनिया

# रेल बजट की खास बातें

## सुखद यात्रा के लिए 11 सौगातें

1. साफ-सफाई – स्वच्छ भारत अभियान के तहत स्वच्छ रेल बनाने के कार्यक्रम पर जोर, 120 स्टेशनों की तुलना में 650 अतिरिक्त स्टेशनों पर नए शौचालय।

2. बिस्तर-बिस्तरों के डिजाइन के लिए निफ्ट दिल्ली से संपर्क किया जाएगा। चुनिंदा स्टेशनों पर डिस्पोजेबल बिस्तर की ऑनलाइन सुविधा मिलेगी।

3. हेल्प लाइन – यात्रियों की समस्याओं का वास्तविक समय के आधार पर निराकरण के लिए देशभर में 24×7 हैल्प लाइन नं. 138 की शुरुआत होगी।

4. टिकट – अनारक्षित यात्रा करने वाले यात्रियों के लिए पांच मिनट के भीतर टिकट खरीद सुनिश्चित करने के लिए ऑपरेशन फाइव मिनट।

नऊ रेल्वे कॉरिडॉरचा वेग ताशी ११० वरुन १६० तर १३० वरुन २०० किलोमीटर इतका केला जाणार आहे. यामुळे दिल्ली-कोलकात्ता आणि दिल्ली-मुंबई प्रवास एका रात्रीत पूर्ण होणे शक्य होणार आहे.

रेल्वे मालगाडयांचा सरासरी वेगही वाढवण्यात येणार आहे. रिकाम्या मालगाडयांचा वेग ताशी १०० किलोमीटर तर माल असलेल्या रेल्वेचा वेग ताशी ७५ किलोमीटर इतका असेल. भारतीय रेल्वेच्या सर्व प्रमुख मार्गावर मालवाहतूक क्षमतेत वृध्दी करुन ती २२.८२ टन एक्सेल इतकी केली जाणार आहे.

## प्रवासी सेवा आणि सुरक्षा उपाययोजना

३४३८ रेल्वे फाटके बंद करण्यासाठी ९७० ओव्हर ब्रिज/भुयारी मार्ग तसेच अन्य सुरक्षेसंबंधी कामांसाठी ६,५८१ कोटी रुपयांची तरतूद

समस्यांचे निराकरण करण्यासाठी संपूर्ण देशभरात १३८ हा हेल्पलाईन क्रमांक सुरु राहणार.

ठऑपरेशन फाईव्ह मिनिटठ विना आरक्षण प्रवास करणाऱ्या प्रवाशांना पाच मिनिटात तिकीट खरेदी करता येईल. सुधारित ठहॉट बटणठ, कॉईन व्हेंडिंग मशीन्स, ठसिंगल डेस्टिनेशन टेलरठ विंडोज या सुविधांमुळे वेळेची बचत होईल.

अपंग प्रवाशांसाठी विशेष उपक्रम सुरु करण्यात आला आहे. एकदा नोंदणी केल्यानंतर ते सवलतीच्या दरात ई-तिकीट खरेदी करु शकतील. तसेच बहु भाषिक ई-तिकिटिंग पोर्टल विकसित करण्याचा प्रस्ताव आहे.

प्रवाशांना वेळे अगोदर गाडी सुटण्याची/येण्याची वेळ कळवण्याकरिता ठएसएमएस ?लरठ सेवा सुरु करण्यात येणार आहे. तसेच गाडी येण्यापूर्वी १५ ते ३० मिनिटे अगोदर एसएमएस अलर्ट पाठवला जाणार आहे.

जम्मू-श्रीनगर मार्गावरील रेल-कम-रस्ते तिकिटाच्या धर्तीवर एकात्मिक तिकिट प्रणालीचा विस्तार करण्यात येणार.

महिलांच्या सुरक्षेसाठी काही निवडक प्रमुख डब्यांमध्ये आणि उपनगरी गाडयांच्या महिला डब्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार.

शताब्दी गाडयांमध्ये मनोरंजनाची सुविधा उपलब्ध करण्याचा प्रस्ताव, सामान्य श्रेणीच्या डब्यांमध्ये तसेच स्लीपर श्रेणीच्या डब्यांमध्ये मोबाईल फोन चार्जगची सुविधा पुरवणार.

स्वच्छ रेल्वे स्वच्छ भारतठ अभियान सुरु करणार, पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी कोकण रेल्वेच्या धर्तीवर ऑटो रिक्शा आणि टॅक्सीचालकांना प्रशिक्षण देणार.

सहा महिन्यात चादरींचा दर्जा आणि स्वच्छता सुधारण्यासाठी कार्यक्रम करणार, दिल्लीच्या ठनॅशनल इन्स्टिटयूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजीठसंस्थेला चादरींच्या डिझायनिंगचे काम देण्यात आले आहे.

त्यांच्या आवडीचे जेवण निवडता यावे यासाठी १०८ गाडयांमध्ये प्रायोगिक तत्त्वांवर ई-कॅटरिंग सुविधा सुरु करणार, तिकीटांचे आरक्षण करतानाच आयआरसीटीसीच्या संकेतस्थळाच्या माध्यमातून जेवणाची ऑर्डर देता येणार. या प्रकल्पासाठी देशातील उत्तम खानपान सेवा एकत्रित आणण्याचा रेल्वेचा प्रयत्न.

## स्वच्छता

स्थानके आणि गाडया स्वच्छ ठेवण्यासाठी नवीन विभाग सुरु करण्याचा रेल्वेचा प्रस्ताव. एकात्मिक स्वच्छतेसाठी व्यावसायिक स्वच्छता एजन्सीची मदत घेणार.

१२० स्थानकांच्या तुलनेत यंदा आणखी ६५० स्थानकांवर नवीन शौचालये बांधणार. डब्यांमध्ये १७ हजार बायो टॉयलेट बसवणार.

स्नेही पध्दतीने कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रमुख कोचिंग टर्मिनलजवळ कचऱ्यातून ऊर्जा निर्मितीचा प्रकल्प उभारण्याचा रेल्वेचा विचार. त्यासाठी एक प्रायोगिक प्रकल्प आधी स्थापन केला जाईल आणि त्यानंतर टप्प्याटप्प्याने आणखी प्रकल्प उभारणार

## संशोधन आणि विकास

तंत्रज्ञान पोर्टल व्यतिरिक्त रेल्वेमध्ये अभिनवतेला प्रोत्साहन देण्यासाठी ''कायाकल्प'' स्थापन करणार, देशातील चार विद्यापीठांमध्ये रेल्वे संशोधन केंद्र सुरु करणार, आयआयटी वाराणसी येथे पंडित मदनमोहन मालवीय यांच्या नावाने रेल्वेचे अध्यासन केंद्र सुरु होणार.

रेल्वेला पर्यावरण स्नेही बनवण्यासाठी १०० गाडया सीएनजी आणि डिझेल अशा दुहेरी इंधनावर रुपांतरित करणार, एलएनजीवर चालणाऱ्या गाडयांचा देखील विकास सुरु आहे. या गाडयांच्या आवाजाची पातळी आंतरराष्ट्रीय निकषांनुसार असेल.

## अन्य उपाययोजना

अतिक्रमण टाळण्यासाठी जमिनींचे डिजिटाईज्ड मॅपिंग करणार, अतिक्रमण झाल्यास अधिकाऱ्यांना जबाबदार धरणार.

# कृषीप्रधान भारतात स्वतंत्र कृषी अर्थसंकल्पाची गरज

- डॉ.दीपक भुसारे




**भारत हा कृषी प्रधान देश होता परंतु उदारमतवादी धोरणानंतर भारतात इतर क्षेत्रांचा विकास झपाटयाने झाला, भारताचे कृषी क्षेत्रात ६५% अवलंबित्व कमी होऊन ते ५०% पर्यंत आले. औद्योगिक विकासाची कास धरली तरी कृषी क्षेत्राकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. शेतकऱ्यांच्या समस्यांबरोबर 'शिक्षित शेतकरी' ही काळाची गरज बनली आहे. सरकारने विविध तालुक्यांच्या ठिकाणी कृषी विद्यापीठे स्थापन केली असली तरी या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रातील निधीचे प्रमाण कमी केल्याने कृषी क्षेत्र विकासाला खीळ बसली आहे.**

**प्रस्तावना-**

भारत हा कृषी प्रधान देश होता. देशातील ६५-७० टक्के लोक प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष कृषी क्षेत्रावर अवलंबून होते भारतात अनेक राज्यात दुष्काळजन्य परिस्थिती आहे पिण्याचे पाणी मिळविण्यासाठी लोकांना वणवण भटकंती करावी लागत आहे. स्वातंत्र्या नंतर ६८ वर्ष होवून देखील अजूनही भारतातील मुलभूत सुविधा सर्वांपर्यंत पोहचल्या नाही. सध्या देशात शेतकरी कर्जबाजारीपणा, दुष्काळ यामुळे मोठ्या प्रमाणात आत्महत्या करत आहे. २००५ पर्यंत भारतात १,६६,२०४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहे. महाराष्ट्र, मध्यप्रदेश, कर्नाटक व आंध्रप्रदेश या राज्यात आत्महत्यांचे प्रमाण जास्त आहे. यामध्ये सर्वाधिक आत्महत्या पुरोगामी महाराष्ट्रात २८,९११ शेतकऱ्यांनी (१९९७-२००५) केल्यात. सध्या महाराष्ट्रात अनेक भागात दुष्काळ पडला आहे. मराठवाड्यात मागील ३६५ दिवसात ५१२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या देशातील सर्व समस्यांचा फटका सर्वाधिक शेतकऱ्यांना बसतो त्यामुळे आजचा शेतकरी हवालदिल झाला आहे. चालु वर्षी दुष्काळामुळे राज्यातील अनेक भागातील शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च देखील भरुन निघाला नाही.

भारत २०२० साली आर्थिक महासत्ता बनण्याचे स्वप्न बघत आहे हे अत्यंत भ्रामक आहे. भारता सारख्या कृषीप्रधान देशात विकासाचा केंद्रबिंदू कृषीक्षेत्र व शेतकरीच असला पाहिजे मात्र तशी परिस्थिती आमच्या देशात नाही. भारत आणि इंडीया अशा दोन भागात आमच्या देशाची विभागणी झाली आहे भारत या वर्गात राहणारा शेतकरी अजुन विकासाच्या प्रक्रियेत इंडीयातील लोकांपेक्षा पाठीमागे आहे. स्वातंत्र्यानंतर भारतात आर्थिक विकासा सोबत प्रचंड प्रमाणात आर्थिक विषमता निर्माण झाली आहे.

- **केंद्रीय अर्थसंकल्प (Central Budget)**

एखाद्या देशाचा अर्थसंकल्प म्हणजे पुढील वर्षी कोणत्या मार्गाने उत्पन्न जमा करावयाचे आणि जमा झालेले उत्पन्न कोणत्या पध्दतीने खर्च करावयाचे याचा सविस्तर आराखडा. अर्थसंकल्पाचा महत्वाचा उद्देश असा असतो की, देशात उपलब्ध असलेल्या भौतिक व वित्तीय साधनांचे समान प्रमाणात वितरण करणे तसेच राष्ट्रीय उत्पन्नाचे विवेकी वाटप व आपल्या अर्थव्यवस्थेला स्थैर्य प्राप्त करुन देणे हे सर्वात महत्त्वाचे उद्दीष्टे अर्थसंकल्प मांडण्या पाठीमागे आहे.

१९९१ नंतर नवीन आर्थिक धोरणामुळे उद्योग व सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रगती झाली. मात्र कृषी क्षेत्रात म्हणावा तसा बदल घडून आला

नाही.१९५०-५१ मध्ये कृषी क्षेत्राचा सकल अंतर्गत उत्पन्नामध्ये (GDP) ५३.१ टक्के वाटा होता. सध्या कृषी क्षेत्राचा GDP मधील हिस्सा १३.९ टक्के झाला आहे. म्हणजे गेल्या ६८ वर्षात GDP मधील कृषी क्षेत्राच्या वाट्यात ४ पटीने घट झाली आहे. याचा अर्थ कृषी क्षेत्रावर आधारीत ६५ टक्के लोकांचा सकल अंतर्गत उत्पादीतामध्ये GDP वाय १३.९ टक्के आणि उर्वरीत ३५ टक्के उच्च उत्पन्न गटातील लोकांचा GDP मधील वाटा ८६ टक्के आहे. यावरुन भारतात किती मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता निर्माण झाली आहे हे लक्षात येईल.

- **कृषी क्षेत्रासाठी स्वतंत्र अर्थसंकल्पाची गरज**

भारतासारख्या कृषीप्रधान देशात कृषी क्षेत्रासाठी स्वतंत्र कृषी अर्थसंकल्प' (Agricultural Budget) मांडण्याची गरज आहे. ज्या प्रमाणे रेल्वेसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प सादर केला जातो त्याचप्रमाणे कृषी क्षेत्रासाठी देखील स्वतंत्र अर्थसंकल्प मांडला जावा ही सध्या काळाची गरज आहे. भारतातील १२५ कोटी पैकी ६५ टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष शेतीशी निगडीत आहे. त्यामुळे कृषी क्षेत्र केंद्रबिंदू मानून त्यासाठी स्वतंत्र अर्थसंकल्प मांडण्याची आवश्यकता आहे. कृषी क्षेत्राच्या वृध्दी दरात सातत्याने घट होत आहे. यासाठी कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आवश्यक आहे. ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, सिंचन क्षमता, वीजनिर्मीती धान्य साठविण्याचे गोदामे शीतगृहे, खते, बी-बियाणे, शेतीवर आधारीत उद्योग या सगळ्या सुविधामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यासाठी **'स्वतंत्र कृषी अर्थसंकल्प'** मांडण्याची गरज आहे. यासाठी देशातील शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते व राजकीय पुढाऱ्यांनी हा प्रश्न लावून धरला पाहिजे.

भारतातील हरितक्रांतीचे प्रणेते डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांनी देखील शेतीसाठी स्वतंत्र अर्थसंकल्पाची शिफारस केली आहे. शेतीतील अनिश्चित उत्पन्नामुळे अर्थसंकल्पाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात स्थैर्य प्राप्त होऊ शकते तसेच कृषी अर्थसंकल्पात शेती व्यतिरिक्त ग्रामीण विकास, पशुपालन, मासेमारी, वनीकरण, फळबाग, इ. देखील समावेश होतो, मात्र कृषी अर्थसंकल्प मांडण्यासाठी काही तांत्रिक अडचणी आहे. कारण कृषी हा विषय राज्य सरकारच्या अखत्यारित आहे. त्यामुळे केंद्र सरकारला स्वतंत्र **'कृषी अर्थसंकल्प'** मांडण्यास घटनात्मक अडचण आहे. भारतात सर्वात पहिल्यांदा कर्नाटक सरकारने **'कृषी अर्थ संकल्प'** सादर केला होता केंद्राने 'कृषी अर्थसंकल्प' मांडण्यासाठी कृषी हा विषय केंद्र व राज्य यांच्या समवर्ती सूचीमध्ये समाविष्ट करावा अशी शिफारस डॉ. एम.एस.स्वामीनाथन यांनी केली आहे. ह्यासाठी संसदेत चर्चा करुन सर्व सदस्यांनी एकमताने कृषी व विषय समवर्ती सूचीत समाविष्ट करण्यासाठी पुढाकार घ्यावा. **'सर्व समावेशक वृध्दी'** हे १२ व्या पंचवार्षीक योजनेचे उद्दिष्टे पुर्ण होईल. कृषी अर्थसंकल्पाचा माध्यमातून देशातील शेवटचा लहान शेतकरी व शेतमजूर यास लाभ होईल. त्यामुळे देशातील आर्थिक विषमता, दारिद्र्य, बेरोजगारी, कुपोषण, शेतकरी आत्महत्या, बालमजुर, ग्रामीण पायाभूत सुविधा या सर्व समस्या ग्रामीण भागांतील शेतकऱ्यांशी निगडीत आहे.

जो पर्यंत आमच्या विकासाचा केंद्रबिंदू तळागळातील अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर, होत नाही तो पर्यंत सर्वसमावेशक विकास होऊ शकत नाही. सध्या असलेल्या किमान आधारभूत किंमतीमध्ये शेतकऱ्यांना भाव ठरविण्याचा अधिकार नाही. **'कृषी अर्थसंकल्प'** माध्यमातून थेट शेतकरी ते ग्राहक अशी रचना निर्माण होऊ शकते.

- **केंद्रीय अर्थसंकल्प आणि कृषी क्षेत्र**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारतात ६५ टक्के लोकांचा व्यवसाय शेती आहे. २८ फेब्रुवारी २०१५ रोजी मा.केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी संसदेत केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला. यामुळे कृषी क्षेत्रासाठी अर्थसंकल्पातील तरतुदी पुढील प्रमाणे आहेत.

१. शेतकऱ्यांसाठी कृषी कर्जाची मर्यादा रु. ८.५० लाख कोटी करण्यात आली.
२. नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधीसाठी रु. २५,००० कोटी तरतूद करण्यात आली.
३. दीर्घकालीन ग्रामीण पतपुरवठा निधीसाठी रु. १५,००० कोटी तर अल्प मुदतीच्या सहकारी ग्रामीण पतपुनर्सहाय निधीसाठी रु. ४५,००० कोटी आणि अल्पमुदतीच्या कर्जासाठी प्रादेशीक ग्रामीण बँकाना रु. १५,०००

कोटीची तरतूद केली आहे.

४. कृषी उत्पादन वाढविण्यासाठी सूक्ष्मसिंचन व जलसंधारण यावर सरकारने भर दिला आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना यासाठी रु.५,३०० कोटीची तरतूद केली आहे. यामध्ये १,८०० कोटी रु. सूक्ष्म कृषी विकास, १,५०० कोटी रु. एकीकृत जलसंधारण विकास कार्यक्रम आणि रु.२,००० प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनासाठी तरतूद केली आहे.

५. कृषी उन्नती योजनेसाठी रु.१२,२५७ कोटीची तरतूद करण्यात आली यामध्ये रु.४,५०० कोटी राष्ट्रीय कृषी योजनासाठी रु.२,८२३ कोटी राष्ट्रीय पीक विमासाठी रु.१,३०० कोटी राष्ट्रीय खाद्य सुरक्षा मिशनसाठी आणि रु.८३५ कोटी राष्ट्रीय स्थायी कृषी विकास यासाठी या निधीची तरतूद केली आहे.

६. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी राज्यांनी राष्ट्रीय कृषी बाजारपेठेच्या निर्मितीसाठी प्रयत्न करावेत म्हणून राष्ट्रीय कृषी बाजार संकल्पना मांडण्यात आली आहे.

७. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायम ठेवत त्यासाठी रु. ३४,६९९ कोटीची तरतूद करण्यात आली.

८. किसान टि.व्ही. साठी रु.१०० कोटीची तरतूद करण्यात आली.

९. ग्रामीण भागात २४ तास वीज देण्याची घोषणा करण्यात आली.

१०.चार कोटी निवासस्थाने बांधण्यासाठी घोषणा केल्यामुळे स्थानिक भागात रोजगार निर्मितीला चालना मिळेल.

११.वातावरण बदलांशी राष्ट्रीय पातळी जुळुन घेण्यासाठी रु. १०० कोटी तरतुद केली.

१२.पाणलोट साठी २०१४ मध्ये रु. २,१४२ कोटी तरतुद केली होती या कार्यक्रमाला चालना देण्यासाठी निधी दिला जाईल.

१३.खतांवरील अनुदानासाठी रु. ७२,९६८,५६ कोटीची तरतूद करण्यात आली. त्यापैकी देशांतर्गत युरिया उत्पादनासाठी रु.३८,२०० कोटी रुपयाचे अनुदान राखून ठेवण्यात आले. तसेच फॉस्फेट आणि पोटॅश खताच्या अनुदानासाठी रु.२२,४६८.५६ कोटी अनुदान देण्यात येईल.

१४.पंतप्रधान कृषी सिंचन योजनेसाठी रु.३००० कोटीची तरतुद केली आहे.

- **क्षेत्रनिहाय गुंतवणूकीचे वितरण-**

कोणत्याही क्षेत्राचा विकास करण्यासाठी त्यामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणे आवश्यक आहे त्याशिवाय कोणत्याच क्षेत्राचा सर्वांगीण विकास होऊ शकत नाही. खालील तक्त्यात क्षेत्रनिहाय गुंतवणूक दर्शविली आहे.

**तक्ता क्र.१ क्षेत्रनिहाय गुंतवणूक (GDP %)**

| अ.क्र. | क्षेत्र | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ |
|---|---|---|---|---|
| १ | कृषी | ३.१ | २.६ | २.५ |
| २ | उद्योग | १३.५ | १२.९ | ११.७ |
| ३ | सेवा | १९.५ | १८.० | १७.१ |

Source- Economic Survey of India- 2014-15 P.No.11

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, सकल भांडवल निर्मितीचे प्रमाण (Gross Capital Formation-GCF) क्षेत्रनिहाय GDP च्या कृषीक्षेत्राचे २०११-१२ मध्ये ३.१ टक्के ते २०१३-१४ मध्ये २.५ टक्के पर्यंत कमी झाले आहे. उद्योग क्षेत्राचे प्रमाण २०१३-१४ मध्ये ११.७ टक्के सेवा क्षेत्रातील गुंतवणूकीचे प्रमाण १७.१ टक्के एवढे आहे. याचा अर्थ कृषी क्षेत्र वगळता इतर सर्व क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली जाते. मात्र त्या तुलनेत कृषी क्षेत्रात तेवढी गुंतवणूक केली जात नाही. म्हणून कृषीचा जीडीपी मधील वाटा देखील १४ टक्के पर्यंतच आहे.

- सकल अंतर्गत उत्पादीतामध्ये क्षेत्रनिहाय वाटा-

सकल अंतर्गत उत्पादीतामध्ये कृषी, उद्योग व सेवा क्षेत्राचा वाटा किती आहे हे खालील तक्त्यात दर्शविले आहे.

**तक्ता क्र.२ क्षेत्रनिहाय GDP मध्ये वाटा (GDP %)**

| वर्ष | कृषी | उद्योग | सेवा |
|---|---|---|---|
| १९५०-५१ | ५३.१ | १६.६ | ३०.३ |
| १९६०-६१ | ४८.७ | २०.५ | ३०.८ |
| १९७०-७१ | ४२.३ | २४.० | ३३.८ |
| १९८०-८१ | ३६.१ | २५.९ | ३८.० |
| १९९०-९१ | २९.६ | २७.७ | ४२.७ |
| २०००-०१ | २२.३ | २७.३ | ५०.४ |
| २०१०-११ | १४.५ | २७.८ | ५७.७ |
| २०११-१२ | १३.९ | २७.० | ५९.० |
| २०१२-१३ | १४.१ | २९.० | ५७.० |

**Source-**Economic Survery of Indian- 2013-14

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, सकल अंतर्गत उत्पादीतामध्ये सर्वाधिक हिस्सा हा सेवा क्षेत्राचा आहे तर सर्वाधिक कमी हिस्सा हा कृषी क्षेत्राचा आहे. कृषी क्षेत्रामध्ये कमी भांडवली गुंतवणूक केल्यामुळे कृषीचा पाहीजे त्या प्रमाणात विकास होवू शकला नाही. २०११-१२ च्या किंमतीनुसार कृषी क्षेत्राचा वार्षीक वृध्दीदर २०१२-१३ मध्ये १.२ टक्के, २०१३-१४ मध्ये ३.७ टक्के आणि २०१४-१५ मध्ये १.१ टक्के असा होता. मागील दोन वर्षापासून सातत्याने दुष्काळ पडत असल्यामुळे कृषी क्षेत्राचा वृध्दीदर सातत्याने कमी होत आहे.

- **अन्नधान्य उत्पादन**

अन्नधान्याचे उत्पादन हे अत्यंत आवश्यक आहे. १२५ कोटी लोकसंख्या असलेल्या भारतात अन्नधान्य उत्पादन मोठ्याप्रमाणात करुन त्यांची साठवणुक करणे आवश्यक आहे. वर्ष निहाय अन्नधान्याचे उत्पादन खालील तक्त्यात दर्शविले आहे.

**तक्ता ३ अन्नधान्य उत्पादन**

| वर्ष | अन्नधान्य (मिलीयन टनामध्ये) |
|---|---|
| २००९-१० | २१८.११ |
| २०१०-११ | २४४.४९ |
| २०११-१२ | २५९.३२ |
| २०१२-१३ | २५७.१३ |
| २०१३-१४ | २६४.८ |

**स्त्रोत- प्रतियोगिता दर्पण भारतीय अर्थव्यवस्था**

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, भारतात अन्नधान्याचे जरी मोठ्या प्रमाणात उत्पादन होत असले तरी त्याचे वितरण व्यवस्थित होत नाही. भारतातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेत (PDS) अमुलाग्र बदल करणे आवश्यक आहे.

- कृषी क्षेत्रासाठी कर्ज पुरवठा

भारतासारख्या कृषीप्रधान देशात मोठ्या प्रमाणात लोक शेती करतात. शेतीसाठी भांडवलाची गरज असते. दरवर्षी सरकार कृषीसाठी कर्ज पुरवठ्याचे लक्ष ठरवित असते. आणि त्याप्रमाणे कर्जाचे वितरण बँकां मार्फत केले जाते. कृषीसाठी केलेला कर्ज पुरवठा खालील तक्त्यात दर्शविला आहे.

**तक्ता क्र.४- कृषीक्षेत्रासाठी केलेला कर्ज पुरवठा (कोटी रु.)**

| वर्ष | लक्ष | प्रत्यक्षात वितरण |
|---|---|---|
| २००९-१० | ३२५००० | ३८४५१४ |
| २०१०-१० | ३७५००० | ४६८२९१ |
| २०११-१२ | ४७५००० | ५११०२९ |
| २०१२-१३ | ५७५००० | ६०७३७५ |
| २०१३-१४ | ७००००० | ७३०७६५ |
| २०१४-१५ | ८५०००० | ३७०८२८.६० (सप्टें.२०१४ पर्यंत) |

**Source-Economic Survey of India-2014-15**

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, सरकारने मोठ्या प्रमाणात कर्ज पुरवठा वाढविला असला तरी सर्व सामान्य शेतकऱ्यांपर्यंत हे कर्ज पोहचत नाही. त्याला सावकाराच्या दारातच जावे लागते म्हणून कर्ज वाटपाची पध्दत सोपी करणे आवश्यक आहे. २०१४-१५ या वर्षात सप्टेंबर २०१४ पर्यंत बँकांनी फक्त ३,७०,८२६.६० कोटी रु. कर्ज वितरण केले आहे त्यामुळे हे वितरण आणखी जास्त होणे आवश्यक आहे.

- कृषी क्षेत्र आणि आधुनिक तंत्रज्ञान

जागतिकीकरणाच्या युगात पारंपारिक पध्दतीने शेती न करता आधुनिक पध्दतीने शेती करणे आवश्यक आहे. परंतु भारतात मोठ्या प्रमाणात पारंपारिक पध्दतीने शेती केली जाते. भाजीपाल्याची, औषधी वनस्पतीची वेगवेगळ्या फळांची शेती करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे दांडाने मोकळे पाणी शेतीला न देता ठिबक सिंचन, तुषार सिचंन अशा आधुनिक पध्दतीचा वापर करावा जेणे करुन कमी पाण्यामध्ये पीके घेता येईल. देशातील कृषी विद्यापीठांनी कृषी क्षेत्रातील संशोधनावर अधिक भर द्यावा. त्याच प्रमाणे भारतीय कृषी संशोधन परिषद (Indian Concil of Agricultural Research-ICAR) या संस्थांनी देखील कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी भर द्यावा. २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात आसाम व झारखंड या राज्यात कृषी तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी दोन संस्था स्थापन करण्यासाठी रु.१०० कोटीची तरतूद केली आहे. तसेच किसान टि.व्ही. साठी रु.१०० कोटी ची तरतुद आहे. माती परिक्षणासाठी ठसॉईल हेल्थ कार्ड' योजनासाठी १०० कोटी रु. तरतुद केली आहे या सगळ्यांचा एक उद्देश आहे की, भारतात आधुनिक पध्दतीने शेती केली जावी. म्हणून आज तरुण शेतकऱ्यांनी प्रशिक्षण घेऊन आपली शेती आधुनिक पध्दतीने करावी. तसेच रासायनिक खताऐवजी सेंद्रीय खताचा वापर करावा जेणेकरुन जमिनीचा पोत खालवणार नाही. एकुण निऱ्यातीत कृषी मालाच्या निऱ्यातीचे प्रमाण २०१३-१४ मध्ये २.६९ टक्के एवढे तर आयातीचे प्रमाण १.३१ टक्के ऐवढे होते. आधुनिक पध्दतीने शेती करण्यासाठी सरकारने शेतीसाठी, कृषी संशोधन यासाठी आधिक गुंतवणुक करणे आवश्यक आहे. असे झाल्यास शेतमालाच्या निऱ्यातीत मोठ्या प्रमाणात वाढ होवू शकेल.

- अन्नधान्यासाठी अनुदान (Food Subsidies)

सरकारने अन्न सुरक्षा विधेयक पास केल्यापासून अन्नधान्यासाठी अनुदानामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ केली आहे. खालील तक्त्यात मागील पाच वर्षातील अन्नधान्यावरील अनुदानाची आकडेवारी दर्शविली आहे त्यामध्ये २०१३-१४ या वर्षी रु.८९,७४०.०२ कोटी अन्नधान्यासाठी अनुदान दिले आहे. तर २०१४-१५ मध्ये १,०७,८२३.७५ कोटी रु. अनुदान सरकारने दिले आहे. तसेच ह्या अनुदान देण्याचा वार्षीक वृध्दीदर देखील वाढत आहे.

**तक्ता क्र. ५ अन्नधान्य अनुदान (कोटी रु.)**

| वर्ष | अन्नधान्यासाठी अनुदान | वार्षिक वृध्दी टक्के |
|---|---|---|
| २०१०-११ | ६२९२९.५६ | ८.०५ |
| २०११-१२ | ७२३७०.९० | १५.०० |
| २०१२-१३ | ८४५५४.०० | १६.८३ |
| २०१३-१४ | ८९७४०.०२ | ६.१३ |
| २०१४-१५ * | १०७८२३.७५ | २०.१५ |

**Source- Department of food and public distribution**
**Note- * Figures up to 9 Jan.2015**

थोडक्यात वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, सरकार अन्नधान्यासाठी मोठ्या प्रमाणात अनुदान देत आहे. मात्र अन्नधान्याचे वितरण सर्वापर्यंत समान प्रमाणात होत नाही.

अर्थमंत्री श्री.अरुण जेटली यांनी मांडलेला हा अर्थसंकल्प शेती व सिंचन क्षेत्रासाठी निराशाजनक आहे आज देशात वेगवेगळ्या राज्यात दुष्काळ पडला आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकरी आत्महत्या करत आहे. हा सर्व विचार करुन अर्थसंकल्पाची मांडणी करणे आवश्यक होते. आज बेमोसमी पाऊस, गारपीट व दुष्काळ अशा नैसर्गिक आपत्तीला तोंड देता-देता शेतकऱ्यांचा जीव मेटाकुटीला आला आहे. अशापरिस्थितीत मोदी सरकारने शेतकऱ्यांना दिलासा देणे आवश्यक होते. आज खते, बी-बीयाणे यांच्या किंमती गगनाला भिडल्या मात्र शेतकऱ्यांच्या मालाला पुरेसा भाव नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. शेती मालाच्या किमान आधारभूत किंमती (MSP) या उद्योजकांप्रमाणे

शेतकऱ्यांनाच ठरविण्याचा अधिकार दिला पाहिजे तसेच या अर्थसंकल्पात कृषीउद्योगांना चालना देण्यासाठी काहीही तरतूद नाही. आज जलसिंचनासाठी किमान १,००,००० कोटी रु. आवश्यकता असतांना फक्त रु.३००० कोटीची तरतूद करुन सरकारने शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्याचे काम केले आहे. आज कोणत्याही राज्यात जा ग्रामीण भागात पायाभूत सुविधांची दुरावस्था झाली आहे. महाराष्ट्र राज्यातील रस्ते, पाणी व वीज या समस्या फार ऐरणीवर असतांना यासाठी वेगळी तरतूद केली नाही. कृषी क्षेत्राचा वृध्दी अजूनही ४ टक्के पर्यंत पोहचू शकला नाही त्यासाठी कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणे आवश्यक आहे. कर्जमर्यादा वाढविण्यापेक्षा कर्जवितरण प्रणालीचे सुलभीकरण करावे जेणेकरुन शेतकऱ्यांना एका दिवसात कर्ज मिळेल. मात्र तसे होत नाही म्हणून शेतकरी सावकारांकडून कर्ज घेतो.

सन २००४-०५ ते २००८-०९ या काळात उद्योगपतींना वेगवेगळ्या करामधील सवलती पोटी सरकारने १५ लाख ३० हजार ८०१ कोटी रु. माफ केले. मात्र गेल्या १० वर्षात २,१५,००० शेतकऱ्यांना आत्महत्या केल्यानंतर त्यांना फक्त ६०००० कोटी रु कर्ज माफ केले तर सरकारने मोठा गाजावाजा केला. चालु बजेटमध्ये उद्योगपतीवरील निगमकर ३० टक्के वरुन २५ टक्के केला ज्यातून हजारो कोटी रु. सवलत उद्योगपतींना दिली. मात्र शेतीच्या शाश्वत विकासासाठी सरकारने विशेष सवलती दिल्या नाही. आज शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा (उञ्इ) १४ टक्के आहे. त्यामुळे एकूण अर्थसंकल्पाच्या १४ टक्के खर्च शेतीवर होणे अपेक्षित असायला हवे मात्र फक्त ३ टक्के ते ४ टक्के खर्च शेतीवर करण्यात आला.

शेतकऱ्यांसाठी 'कृषी आपत्तीफंड' निर्माण करुन त्यातून दुष्काळ, पूर, गारपीट, या आपत्तीत मदत करता येईल असा फंड तयार करणे आवश्यक होते. तशी तरतूद केली नाही नैसर्गिक आपत्ती येण्या अगोदर त्याची सुचना अगोदर होण्यासाठी आमच्याकडे तशी अद्यावत यंत्रणा नाही. अमेरिकेत पाऊस पडण्या अगोदर शेतकऱ्यांना तशा संदेश येतो मात्र आपल्याकडे तशी यंत्रणा नाही त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करणे आवश्यक होते. कारण नुकताच झालेल्या बेमोसमी पावसामुळे शेतकऱ्यांचे हजारो कोटी रु. नुकसान झाले. त्यामुळे मोदी सरकारने अच्छे दिन म्हणत आज शेतकऱ्यांना रडवायला लावले. म्हणून खऱ्या अर्थाने आता भारता सारख्या कृषीप्रधान देशात, की ज्या देशात ६५ टक्के लोक शेतीवर उदरनिर्वाह करतात अशा देशात **कृषी अर्थसंकल्प** हा स्वतंत्र मांडण्याची गरज निर्माण झाली आहे. त्याखेरीज आपण वर उल्लेख केलेल्या शेतकरी हिताच्या योजना पुर्ण होवू शकत नाही. शेतकरी आत्महत्या, दुष्काळ, कर्जबाजारीपणा, गारपीट, यासमस्या सोडवायच्या असतील तर शेतीमध्ये आज आपल्याला मोठी गुंतवणूक करणे आवश्यक आहे. तात्पुरती मलमपट्टी करुन ही जखम भरुन निघणार नाही म्हणून देशातील सर्व शेतकरी बांधव, सामाजिक कार्यकर्ते, राज्यकर्ते यांनी रस्त्यावर उतरुन स्वतंत्र कृषी अर्थसंकल्पाची मागणी करावी. नुकताच केंद्रसरकारने **भूमि अधिग्रहण विधेयक** संसदेत मांडण्याची तयारी सुरु केली आहे. म्हणजे विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमीनी उद्योगपतींच्या घश्यात घालण्याचा डाव सरकार करत आहे. हे विधेयक पास झाल्यास आमचा शेतकरी भूमिहीन झाल्याशिवाय राहणार नाही म्हणून सरकारने अशा स्वरुपाचे कायदे पास करु नये. तसेच कृषी क्षेत्राच्या हितासाठी स्वतंत्र **कृषी अर्थसंकल्प** मांडण्याचा विचार राजकीय पक्षांनी करावा. असे झाल्यास आमच्या देशात बळीचे राज्य येणार नाही मात्र ते राज्य निर्माण करण्याच्या दृष्टीने एक पाऊल पडेल असे मला वाटते.

***डॉ. दिपक भुसारे*** *हे औरंगाबाद ता. पैठण येथिल प्रतिष्ठान महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागात सहाय्यक प्राध्यापक तसेचं संशोधक मार्गदर्शक म्हणुन कार्यरत आहेत. संपर्कासाठी ईमेल -dr.deepak. bhusare@gmail.com*

## लेखक / वाचकांसाठी नम्र सूचना

प्रकाशन विभागाच्या 'इंडिया' (इंग्रजी) व 'भारत' (हिंदी) या वार्षिक संदर्भ ग्रंथांच्या प्रती केन्द्रीय सदन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, पिन ४००६१४ येथील कार्यालयात उपलब्ध आहेत. या प्रती संग्रही ठेवू इच्छिणाऱ्या लेखक वाचकांनी आपली मागणी myojanadpd@gmail.com या संकेतस्थळावर कृपया नोंदवावी.

इथेच होते करिअरची स्वप्नपूर्ती...

# राजपथ ॲकॅडमी

MPSC ★ UPSC

Login to Excellence & Success

**प्रा. मीता चौधरी**

(संस्थापक-संचालिका, राजपथ ॲकॅडमी, पुणे )

- CAREER GUIDANCE
- CREATION
- PUBLICATION
- DISTRIBUTION

# UPSC • MPSC

## IAS/IPS/IFS/ IRS/DC/Dy.SP/ ACP/ DDR/Dy.CEO/ACST

| UPSC | MPSC | PSI/STI/ASST | UPSC/MPSC (फाऊंडेशन कोर्स) |
|---|---|---|---|
| • फाऊंडेशन कोर्स<br>• पूर्व व मुख्य परीक्षा<br>• सामान्य अध्ययन व निबंध<br>• वैकल्पिक विषय-भूगोल, राज्यशास्त्र, इतिहास<br>• बॅच सुरू: २५ मार्च, ६ एप्रिल,२५ एप्रिल, ११ मे | • राज्यसेवा एकत्रित बॅच<br>• पूर्व, मुख्य, मुलाखत<br>• सामान्य अध्ययन, CSAT, इंग्रजी,मराठी, सामान्य अध्ययन पेपर क्र.१ ते ४<br>• बॅच सुरू: ६ एप्रिल, १५ एप्रिल, ११ मे | • एकत्रित बॅच<br>• पूर्व, मुख्य, मुलाखत, शारीरिक चाचणी<br>• इंग्रजी, मराठी व सामान्य अध्ययन<br>• बॅच सुरू: २५ मार्च, ६ एप्रिल, २५ एप्रिल, ११ मे | • कालावधी - १ महिना<br>• विविध स्पर्धा परीक्षांची बेसिक तयारी कशी करावी, याचे दिशादर्शन देणारा कोर्स<br>• १२ वी व पदवीला असणाऱ्यांना उपयुक्त कोर्स<br>• बॅच सुरू: २५ मार्च, ४ मे |

## राजपथ ॲकॅडमीची वैशिष्ट्ये

१. प्रा.मीता चौधरी मॅडम (संस्थापक-संचालिका, राजपथ ॲकॅडमी) यांची लेक्चर्स व प्रत्येक विद्यार्थ्यांशी सुसंवाद.
२. अनुभवी, तज्ज्ञ, तळमळीने शिकविणारे विषय प्राध्यापक.
३. दर्जेदार छापील व क्लासरूम नोट्स.
४. नियमित सराव परीक्षा.
५. विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन दोन भागात करणे.
६. विद्यार्थ्यांसाठी अभिरूप मुलाखतींच्या चर्चासत्राचे नियोजन.
७. विद्यार्थ्यांचे प्रगती पुस्तक व त्याचा पालकांना अहवाल.
८. गृहपाठासह शाळेच्या शिस्तीत विद्यार्थ्यांचा अभ्यास.
९. विविध दर्जेदार संदर्भ ग्रंथ व मासिकांचे परिपूर्ण वाचनालय.
१०. स्वच्छ, हवेशीर व शांत अभ्यासिका.

## ✻ 'राजपथ ॲकॅडमी' प्रकाशनाची परीक्षाभिमुख, दर्जेदार पुस्तके ✻




## आगामी पुस्तके:

✻ संपूर्ण भूगोल ✻ संपूर्ण इंग्रजी ✻ अंकगणित


**राजपथ ॲकॅडमी**

MPSC ★ UPSC — Login to Excellence & Success

**मुख्य कार्यालय :**
२६, आप्पा बळवंत चौक,
अनमोल पुस्तकालयासमोर, पुणे.

**शाखा :**
लोकमान्य टिळकभवन, बी-विंग दुसरा मजला,
५६८ नारायण पेठ, केसरीवाड्याजवळ, पुणे.

**फोन नं. :**
०२०-३२४२ २२२१,
०२०-३०२० ८८०३/८००७९०९१६०

www.rajpathacademy.com Email : info@rajpathacademy.com Joint with facebook - rajpath academy

**Yojana Marathi** (Monthly) **March 2015**
**RNI No. MAHMAR/2009/32156**
Reg No. G/NMD/137/2013-15
Published Date : 12th Mar., 2015
Date of Posting : 16th Mar., 2015




Editior **Bhavana Gokhale**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Additional Director General (I/C), on behalf of Publication Division
and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.